सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, ३० सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १८८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# ऑरीक बिडकीन औद्योगिक प्रकल्पाचे पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण

## औद्योगिक क्षेत्राच्या गुंतवणूकीतून मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होइल : पंतप्रधान नरेंद्र मोदी

छत्रपती संभाजीनगर दि.२९(जिमाका)- ऑरीक –बिडकीन औद्योगिक प्रकल्पातील औद्योगिक गुंतवणूकीच्या माध्यमातुन मराठवाड्यातील तरुणांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध विकास कामांच्या लोकार्पण सोहळ्यात केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बिडकीन औद्योगिक क्षेत्राचा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता.






दूरदृश्य प्रणाली द्वारे बिडकीन औद्योगिक प्रकल्पाच्या लोकार्पण सोहळ्यात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, पुणे येथून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, लोकसभेचे खासदार मुरलीधर मोहोळ, छत्रपती संभाजीनगर येथील ऑरिक हॉल, डीएमआयसी प्रकल्प, शेंद्रा येथून गृहनिर्माण मंत्री अतुल सावे. राज्यसभेचे खासदार डॉ. भागवत कराड, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, अप्पर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे ,डीएमआयसी सह व्यवस्थापकीय संचालक दत्ता भडकवाड, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी चेतन गिरासे महाराष्ट्र औद्योगिक विकास एमआयडीसीचे प्रकल्प व्यवस्थापक अरुण दुबे, महेश पाटील यांच्यासह विविध उद्योग समूहाचे प्रतिनिधी, उद्योजक उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, शासनाने ऑरिक सिटीच्या उद्घाटनापासून ते प्रकल्प पूर्ती करण्याचे काम केले आहे. ८ हजार एकरवर या औद्योगिक वसाहतीचा विस्तार असून यामधून मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक विविध उद्योगाच्या मार्फत करण्यात आली आहे. बिडकीन प्रकल्पाच्या माध्यमातून युवकांना रोजगार उपलब्धतेबरोबरच पायाभूत सुविधांचाही विकास होत आहे.

ऑरिक बिडकीन प्रकल्पाविषयी माहिती

ऑरिक हे भारतातील अत्यंत नियोजनबध्द पध्दतीने विकसित केलेले औद्योगिक शहर हे केंद्र (४९%) आणि चखऊ (५१%) संयुक्त विद्यमानातून छत्रपती संभाजीनगर येथे १० हजार एकरवर दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर च्या माध्यमातून विकसित होत आहे.

ऑरिक औद्योगिक क्षेत्रामध्ये शेंद्रा आणि बिडकीन या दोन औद्योगिक क्षेत्रांचा समावेश आहे.

बिडकीन औद्योगिक शहर हे ७ हजार ८५५ एकर क्षेत्रामध्ये वसलेले असून रेल्वे व रस्ते मार्गाने जोडले गेलेले आहे.या क्षेत्रापासून ३५ किलोमीटरच्या अंतरावर आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे, तसेच जेएनपीटी अवघ्या ३२० किलोमीटर अंतरावर आहे. यामुळे भारतातील सर्वात मोठ्या बंदरासाठी सुलभ दळणवळण सुविधा उपलब्ध होत आहे. बिडकीन औद्योगिक क्षेत्र हे बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गापासून अवघ्या ३५ किलोमीटर अंतरावर आहे.

बिडकीन औद्योगिक क्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधामध्ये

१. प्लग अँड प्ले इन्फ्रास्ट्रक्चर, २. २४÷७ मुबलक विद्युत व पाणी पुरवठा, ३. पर्यावरण विषयक परवानगी (एउ), ४. योग्य क्षमतेचं उएझढ डढझ प्रकल्प, ५. अद्यावत खछढएठछएढ सुविधा, ६. थरश्रज्ञ ींिझ लेपलशर्ीिं,

७. एक खिडकी योजनाव्दारे सर्व परवाने उपलब्ध या सुविधांमूळे हे क्षेत्र बहुराष्ट्र कंपन्यांना महाराष्ट्रामध्ये कारखाना उभारण्यासाठी एक आदर्श ठिकाण ठरले आहे.

ऑरिक बिडकीन औद्योगिक क्षेत्राच्या प्रकल्पाचा अंदाजीत खर्च ९ हजार १२२ कोटी पेक्षा जास्त आहे. या क्षेत्रामधून सुमारे ६० हजार कोटी रुपये इतकी गुंतवणूक निर्माण होणार असून त्याव्दारे सुमारे ३५ हजार प्रत्यक्ष व ७५ हजार अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

बिडकीन औद्योगिक क्षेत्र हे पुढच्या भविष्याची एक नांदी आहे. या औद्योगिक क्षेत्रांमध्ये इलेक्ट्रिकल व्हेईकल, ऑटोमोबाईल्स आणि ऑटो कंपोनंट्स, औषध निर्माण व जैव तंत्रज्ञान, फूड प्रोसेसिंग, अवजड अभियांत्रिक उद्योग आणि कपडे उद्योग यांना मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

आतापर्यंत ऑरिक बिडकीन औद्योगिक क्षेत्रामध्ये गुंतवणूक केलेल्या प्रमुख कंपन्यांमध्ये

१. भारतातील इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादक कंपनी अथर एनर्जी, २. औषध निर्माण क्षेत्रातील कंपनी पिरामल फार्मा, ३. विशेष पॅकेजिंग कंपनी असलेले कॉस्मो फिल्म आणि, ४. ऑटोमोबाईल्स आणि औद्योगिक कंपन्यांसाठी वंगण निर्माण करणारी लुब्रीझॉल या कंपन्याचा समावेश झालेला आहे. बिडकीन औद्योगिक क्षेत्रामध्ये टोयाटो किर्लोस्कर मोटर इलेक्ट्रिक व हायब्रीड व्हेईकल विकसित करणार आहे. या संदर्भात महाराष्ट्र शासन आणि किर्लोस्कर मोटर्स यांच्यामध्ये ३१ जुलै २०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. या कंपनीतर्फे प्रकल्पामध्ये वीस हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचे नियोजन असून यामधून ८ हजार पेक्षा जास्त रोजगार निर्मिती होणार आहे.

# पुण्याची वाहतूक कोंडी सोडविणे ही राज्य सरकारची जबाबदारी-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

पुणे, दि.२९: प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईनप्रणालीद्वारे पुणे मेट्रो टप्पा १ चा दक्षिणी विस्तार स्वारगेट ते कात्रज मार्गिकेचे भूमिपूजन आणि पुणे मेट्रोच्या जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रो स्थानक मार्गावरील प्रवासी सेवेचा हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला. तसेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची पहिली मुलींची शाळा भिडेवाडा येथील स्मारकाचे तसेच सोलापूर विमानतळाचे उद्घाटन, बिडकीन औद्योगिक क्षेत्र राष्ट्राला अर्पण करण्याचा कार्यक्रम स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित करण्यात आला.

पुण्याचा चहूबाजूनी विस्तार होत असताना माहिती तंत्रज्ञान क्षेत्र, उद्योग, शैक्षणिक संस्थेचे जाळे वाढत आहेत. याचा वाहतूक व्यवस्थेवर ताण येत असून प्रदूषणातही वाढ होत आहे, त्यामुळे पुण्याची वाहतूक कोंडी सोडविणे ही राज्य सरकारची जबाबदारी असून याकरीता मेट्रोसारखे प्रकल्प महत्वाचे आहेत, आगामी काळात मेट्रोचे जाळे वाढविणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

याकार्यक्रमास राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन दूरदृष्यप्रणालीद्वारे तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, केंद्रीय विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, योगेश टिळेकर, माधुरी मिसाळ, भिमराव तापकीर, सुनील कांबळे, सिद्धार्थ शिरोळे, आश्विनी जगताप, आदी मान्यवर प्रत्यक्ष उपस्थित होते.

उद्योग आणि पायाभूत सुविधेत महाराष्ट्र देशात अग्रेसर

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्याच्या सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने केंद्र शासनाच्या मदतीने विविध प्रकल्प राबविण्यात येत आहे. आज राज्यात विविध उद्योग येत असून उद्योगाला चालना देण्याकरीता राज्य शासन सहकार्य करीत आहेत. राज्यात ५२ टक्के परदेशी गुंतवणूक झाली आहे, विविध क्षेत्रातील उद्योजक राज्याकडे आकर्षित होऊन उद्योगाला चालना देत आहेत.

# एमजीएम विद्यापीठामध्ये राष्ट्रीय स्तरावरील आयडीई बुटकॅम्प यशस्वीपणे संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. २९ : केंद्रीय शिक्षण विभाग आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (एआयसीटीई) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आयडीई बुटकॅम्पचा सांगता समारंभ शुक्रवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी विद्यापीठाच्या आर्यभट्ट सभागृहात यशस्वीपणे संपन्न झाला. या पाच दिवसीय बूटकॅम्पमध्ये भारताच्या विविध राज्यांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. इनोवेशन, डिझाईन, आणि उद्योजकता या विषयांवरील विविध व्याख्याने या पाच दिवसांच्या बूटकॅम्पमध्ये वाधवाणी फाउंडेशनमधील तज्ञांद्वारे घेण्यात आली. या समारोप सत्रासाठी केंद्रीय शिक्षण विभागाचे उमेश राठोड, सौरभ निर्माले यांची उपस्थिती होती तर एमजीएम विद्यापीठाकडून कुलपती



अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, संचालक डॉ.रनित किशोर, प्राध्यापक व सर्व संबंधित उपस्थित होते.

अशाप्रकारचे बुटकॅम्पचे भारतात ९ ठिकाणी एकाच वेळी आयोजन करण्यात आले होते.महाराष्ट्रातील एकूण महाविद्यालयांपैकी एमजीएम इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेट अँड रिसर्चची निवड या रहिवासी बुटकॅम्पसाठी केली गेली होती. बुटकॅम्पच्या शेवटच्या दिवशी केंद्रीय शिक्षण विभागाच्या उमेश राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आपल्या नावीन्यपूर्ण कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी लागणारे भांडवल कसे उभारावे तसेच गुंतवणूकदारांना आपल्या व्यवसायात गुंतवणूक करण्यासाठी कशाप्रकारे आकर्षित करावे, यासाठी एकूण ८३ टीम बनविण्यात आल्या होत्या. त्यांनी आपापल्या कल्पना ज्यूरीमेंबर्ससमोर सादर केल्या. औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना यावेळी महत्वपूर्ण सल्ले देऊन त्यांच्या कल्पना प्रत्यक्षात कशा उतरवल्या जातील, याबद्दल सविस्तरपणे माहिती दिली.

एकूण ८३ नविण्यातापूर्ण कल्पनांपैकी १० उत्कृष्ट कल्पनांना एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, संचालक डॉ.रनित किशोर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे या पाच दिवसांच्या कॅम्पमध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना यावेळी प्रमाणपत्रे देण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.भक्ती बनवसकर यांनी केले. प्रा.डॉ.घोसिया इमाम यांनी पाच दिवसीय कार्यक्रमाचा आढावा घेतला तर प्रा.ऋषिकेश काकडे यांनी आभार प्रदर्शन केले.

# नेपाळमध्ये पूरस्थितीमुळे 100हून अधिकांचा मृत्यू

काठमांडू : महाराष्ट्रासह इतर राज्यातही परतीच्या पावसाने चांगलाच धुमाकूळ घातल्याचं दिसत आहे. अनेक ठिकाणी पाणी साचल्यामुळे नागरिकांसह शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अशातच नेपाळमध्ये पडणाऱ्या परतीच्या पावसाने कहर (छशरिश्र ऋश्रेव) केला आहे. नेपाळमध्ये सततच्या मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. यामध्ये १००हून अधिक जणांचा मृत्यू झाला. तर काही जण अडकल्याची शक्यता असून बचावकार्याकडून शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या दोन-तीन दिवसांपासून नेपाळमध्ये संततधार कोसळत आहे. यामुळे अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली असून भूस्खलनाच्या घटनाही घडत आहेत.

# सोयगाव येथे मा.मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण रोजगार मेळावा संपन्न

## मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांमध्ये युवकांना मिळाला रोजगार

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२९ सप्टेंबर

अजिंठा शिक्षण संस्थेचे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय व औद्योगिक प्रशिक्षण संस्था सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मा.मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण रोजगार मेळावा दि.२६ व २७ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आला होता. तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान व एम.सी.व्ही.सी,आयटीआय डिप्लोमा (पदविका), बी.ए.बी कॉम,बीएससी,बीसीएस या पदवी उत्तीर्ण झालेल्या २४७ विद्यार्थ्यांनी या रोजगार मिळाव्यात सहभाग नोंदविला.छत्रपती संभाजीनगर येथील टाटास्ट्रीव्ह, वॉर्नर इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड,लक्ष्मी एजी प्रायव्हेट लिमिटेड या नामांकित कंपन्यांसह इतर कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली. सोयगाव तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेतला.अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे, सचिव प्रकाश काळे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.या कार्यक्रमासाठी पंडितराव मस्के (प्राचार्य) औद्योगिक प्रशिक्षण संस्था सोयगाव,प्राचार्य डॉ. शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.आर.के.बारोटे,कनिष्ठ महाविद्यालय विभागप्रमुख डॉ. उल्हास पाटील,टाटास्ट्रीव्हचे अनिल कुलकर्णी,शुभम खरात.लक्ष्मी एनजी प्रायव्हेट लिमिटेडचे कैलास कानोले,वार्नर इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेडचे चेतन जैन,यांनी इयत्ता १०वी,१२वीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या यामध्ये ६३ उमेदवार निवडण्यात आले.प्रा.डी.पी लिंबे यांनी सूत्रसंचालन केले व एस.बी.उगले यांनी आभार मानले.मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्रा.सय्यद ए.ए.प्रा. कानडे. एस.के.प्रा.चव्हाण व्ही. आर, प्रा.बुटोले एस.बी,प्रा एस.एल पाटील,प्रा.भारती पाटील,प्रा.स्वाती देशमुख, प्रा.आर.टी.जाधव,प्रा. तोफिक शेख,प्रा.ए.टी.मानकर, प्रा.कल्याणकर,एस.आर वाघ,राजाराम राठोड,सुनील साळुंखे,बबलू उसरे तसेच आयटीआयचे बागुल डी.एम., पी.बी.रावते,एम.एम. नेहाते,एस.ए.लोखंडे आदींनी परिश्रम घेतले.

# मानव सेवा हीच ईश्वर सेवा - मनोज पवारांनी व्यक्त केली भावना

## मोफत आरोग्य तपासणी शिबिरात १०५७ रुग्णांची मोफत तपासणी

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२९ सप्टेंबर - मानव सेवा हीच ईश्वरिय सेवा असून, तालुक्यातील एकाही व्यक्तीला आजारी राहू नये,सगळे सुदृढ रहावे., या साठी आणि मला पुन्हा पुन्हा रोग निदान शिबिर आयोजित करण्यास भाग पाडू असे प्रतिपादन उद्योजक मनोज पवार यांनी (दि. २९) रोजी केले.

कन्नड शहरातील पिशोर नाका येथील जैन कॉम्प्लेक्स येथे उद्योजक -समाजसेवक मनोज पवार यांच्या वतीने भव्य रोग निदान शिबिर आयोजित करण्यात आला होते या प्रसंगी ते बोलत होते. आरोग्य शिबीराचे पुष्पाबाई पवार, प्रसिद्ध वक्ते प्रदीप सोळुंके, मनोज पवार उर्मिलाताई पवार, यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. या शिबिरात विविध आजारांवरील तब्बल १०५७ रुग्णांची तपासणी करण्यात येऊन औषधी वाटप करण्यात आली.

आरोग्य शिबारात एम्स हॉस्पिटल अँड ट्रॉमा सेंटरचे डॉ. दिपाली राठोड, बाबासाहेब फलके, सन शाईन हॉस्पिटल डॉ.आनंद गोयका, डॉ.मदस्सीर अली, परिचारिका संगीता



झाल्टे, कृपामाई हॉस्पिटलचे डॉ.महेश चव्हाण, डॉ.अजय गावंडे, परिचारिका अर्चना साखरे, हृदयम हार्ट केअर सेंटरचे डॉ.श्रेयश रुणवाल, डॉ.स्नेहल म्पेरे, परिचारिका कावेरी धोत्रे, शाहिबाज शेख, बुधरानी हॉस्पिटल पुणे डॉ.प्रकाश धर्माधिकारी, कर्मचारी मनीषा कोरडे, विशाल भिंगारदिवे, सुधाकर कावरखे, सुश्रुत हॉस्पिटल कन्नड स्त्रीरोग तज्ञ डॉ.नयना तायडे आदींनी तपासणी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेश सोनवणे ,प्रवीण घाडगे ,रुपेश भारुका, शुभम नागरे, दिनेश शेजवळ,संदीप शिंदे ,पवन ठाकूर ,मनोज देशमुख, शंकर राऊत, योगेश त्रिभुवन, केतन त्रिभुवन यांनी परिश्रम घेतले

# भरघाव पिक अपने दुचाकीस्वारांना उडविले; एक ठार एक गंभीर

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२९ सप्टेंबर

चाळीसगांव कडून येणाऱ्या भरधाव पिक अप गाडीने दुचाकीस्वाराला दिलेल्या जोरदार धडकेत एक ठार तर दुसरा गंभीर जखमी.झाल्याची घटना शनिवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास बनोटी-चाळीसगांव रस्त्यावर मुखेड गावाजवळ घडली आहे दरम्यान अपघातातील गंभीर अवस्थेत असलेल्या एकाचा जळगाव येथील सामान्य रुग्णालयात उपचार दरम्यान मृत्यू झाला आहे.मृत तरुणाचे नाव जगदीश संजय सोनवणे (वय १९)रा.शिदोंळ वडगाव ता.सोयगांव जिल्हा छत्रपती संभाजीनगर असे आहे.

बनोटी नागद रस्त्यावरील मुखेड गावाजवळ शनिवारी (दि. २८ )दुपारी एक वाजेच्या सुमारास घडली असुन घटस्थळावरुन धडक देऊन फरार झालेली पीकप गाडी ग्रामस्थांनी पुढील गावांना दुरध्वनीद्वारे संपर्क करुन घाटनांद्रा (ता.सिल्लोड) येथुन अपघातग्रस्त पीक अप गाडी ताब्यात घेण्यात आली आहे..

शिंदोळ वडगाव येथील



जगदीश सोनवणे हा जळगाव येथे आयटीआय कॉलेजला शिक्षण घेत असुन शिक्षणाकरीता लागणारी कागदपत्रे काढण्यासाठी तो गावाकडे आला होता.बनोटी येथुन कागदपत्रे काढुन जगदीश सोनवणे व त्याचा मित्र अतुल गोवर्धन मोरे हे दोघे डीसक्कर गाडी क्रमांक एम.एच.२० डी.झेड.३९६३ ह्या दुचाकीने बनोटी कडुन शिदोंळ वडगाव कडे जात असताना नागद कडुन बैलाने भरलेली महींद्रा पिकअप एम.एच.४६ ई.३२९६ ह्या गाडीने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोराची धडक दिली. या धडकेत जगदिश सोनवणे आणि अतुल मोरे दोघे गंभीर जखमी झाले.मुखेड येथील ग्रामस्थांनी बनोटी रुग्णवाहिका बोलवून गंभीर दोघा तरुणांना उपचारासाठी जळगाव येथील रुग्णालयात नेण्यात आले.उपचारादरम्यान जगदिश सोनवणे याच्या डोक्याला गंभीर इजा झाल्याने त्याचा मृत्यू झाला.अतुल मोरे याच्यावर उपचार चालू आहेत. घटस्थळावरुन पीकप घेऊन फरार झालेला गाडीची, अपघाताची माहिती दुरध्वनी द्वारे नागरीकांना मिळाल्याने. पिक अप ला घाटनांद्रा येथे काही नागरिकांनी रोखुन ठेवले होते काही वेळाने पोलीस उपनिरीक्षक रज्जाक शेख, जमादार संदीप सुसर,राजेंद्र बर्डे यांनी घाटनांद्रा येथुन अपघातग्रस्त गाडी ताब्यात घेतली आहे सदरील अपघाताची नोंद बनोटी पोलीस चौकीत करण्यात आली आहे.मृत तरुण अत्यंत गरीबीच्या परिस्थितीत शिक्षण घेऊन घरची आर्थिक परिस्थिती सुधारण्याची स्वप्न पहात असतांना अपघातात मृत झाला.त्याच्या पश्चात आई वडील आणि दोन भाऊ असा परिवार आहे.

# मंत्री अब्दुल सत्तार यांच्या विरोधात भव्य मोर्चाचे आयोजन

सिल्लोड -सोयगाव तालुक्यात मंत्री अब्दुल सत्तारांविरोधात वातावरण तापताना दिसुन येत आहे.मा खा रावसाहेब दानवे यांच्या अजिंठा रास्ता रोको नंतर ,सिल्लोड येथे हिंदु कार्यकर्त्यांना पुढे करून अब्दुल सत्तार यांनी रावसाहेब दानवे याच्या विरोधात मोर्चा काढला,त्यानंतर त्याला प्रत्युत्तर म्हणुन व सिल्लोड ची पाकीस्तान सारखी परिस्थीती होतेच आहे ती वेळेत सुधरवण्यासाठी हजारो हिंदु अब्दुल सत्तार विरोधात मोर्चात सामील होणार असुन ,गावोगावी जाऊन प्रमुख लोकांकडुन तालुक्यातील जनतेला आवाहन करण्यात येत आहे, व जनतेचा प्रचंड प्रतिसाद बघायला मिळत आहे.या मोर्चावर पुर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागणार आहे.

कडकडीत बंद मागे

३० तारखेला सिल्लोड सोयगाव तालुक्यातील त्रस्त नागरिकांडुन होणार्या मोर्चात बंद चे आवाहन करण्यात येणार होते पण एकाच महिन्यात ३ वेळेस शहर बंद असल्याने व अब्दुल सत्तार यांची नगरपरिषदेवर सत्ता असल्यामुळें व्यापार्यांना त्यांच्या लोकांकडुन चालु ठेवण्यासाठी दबाव टाकण्याचा प्रयत्न सुरू होता. व्यापारी वर्ग नाराज होऊ नये म्हणुन बंद मागे घेऊन ,सर्व व्यापार्यांना मोर्चात सामील होण्याचे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले.

# आमदार प्रशांत बंब यांच्याकडून देवाभाऊंच्या लाडक्या बहिणींसाठी क्षण आनंदाचा खेळ पैठणीचा सोहळा

## गंगापुरात रंगला न्यू होम मिनिस्टर सोहळा, क्रांती नाना माळेगावकर यांच्या कार्यक्रमाला असंख्य महिलांची गर्दी

तभा वृत्तसेवा .

गंगापूर, दि.२९ सप्टेंबर: लाडक्या बहिणी देवाभाऊंच्या, क्षण आनंदाचा, खेळ पैठणीचा, आमदार प्रशांत बंब व मित्रमंडळ आयोजित सिने अभिनेता क्रांती नाना मळेगांवकर व बालगायीका टिव्ही स्टार सह्याद्री मळेगांवकर यांचा न्यू होम मिनिस्टरसोहळा पैठणीचा २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजता शहरातील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानात संपन्न झाला.

आमदार प्रशांत बंब आयोजित न्यूहोम मिनिस्टर सोहळा पैठणीचा याकार्यक्रमात महिलांसाठी शेकडो बक्षिसे देण्यात आले असुन पहिले



बक्षिस रेफ्रिजरेटर व मानाची पैठणी, दूसरे बक्षिस वॉशिंग मशीन, तिसरे बक्षिस टिव्ही, चौथे बक्षिस पिठाची गिरणी, पाचवे बक्षिस एअरकूलर, सहावे बक्षिस गॅस शेगडी, सातवे बक्षिस मिक्सर, आठवे बक्षिस ओव्हन,नववे बक्षिस इलेक्ट्रीकल शेगडी, दहावे बक्षिस कुकर, अकरावे बक्षिस डिनर सेट २०० भाग्यवान विजेत्यांना मिळणार पैठणीसाडी. खेळ पैठणीचा सन्मान नारीशत्तीचाहा कार्यक्रम गंगापूर व जामगाव सर्कल मधील महीला भगिनींसाठी आयोजित करण्यात आला होता.

यावेळी आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब पदार रामेश्वर मुंदडा ज्योतीताई गायकवाड मनीषाताई व्यवहारे दीपक बडे नगरसेवक प्रदीप पाटील दीपक साळवे मारुती खैरे प्रशांत मुळे कृष्णकांत व्यवहारे गोपाल वर्मा अतुल रासकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.




सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सरपंच काकांनी गावचे करण्याऐवजी केले स्वता:चेच कल्याण?

## आमदारकीचे स्वप्न पाहणारे कल्याणराव बोराडे यांनी आत्मपरिक्षण करण्याची गरज!

**तभा वृत्तसेवा**
**जालना/सुरेश कवडे पाटील**

दिवसेंदिवस जवळ येत असलेल्या आगामी विधानसभेची तयारी अनेक जण आपआपल्या परीने करू लागले आहेत, त्याचाच एक भाग म्हणून परतुर-मंठा येथेही अनेकांनी गुडघ्याला बांशिग बांधले असुन आकणी गावचे सरपंच तथा पुणे-मुंबईतील उद्योजक असणारे कल्याणराव बोराडे यांना देखील आमदारकीचे डोहाळे लागले आहेत, परंतु याभागातील जनता ही फसणारी नसुन योग्य उमेदवारालाच आपल्या भागाचा लोकप्रतिनिधी बनविते, हा आतापर्यंतचा इतिहास आहे. कल्याणराव बोराडे हे आपल्या गावाचा विकास करण्यामध्ये सपशेल अपयशी ठरले


काल परवा तुम्ही परतुर विधान सभा मतदार संघातील सोपारा वाहेगाव या गावाला भेट दिली आणि विकासाचे व्हिजण ईग्लीश मध्ये बोलत शोषल हॅन्डलेवर शेअर केले त्यात तुम्ही म्हणता की , या गावातील सर्वसामान्य माणूस हे घाण पाणी कसे पिणार पण काका दुसऱ्या बाजूला जो फोटो छायाचित्रात दिसत आहे तो तुमच्या आकणी गावचा आहे . ईथे तुमचा मतदार संघातील जण-तेप्रती असलेले प्रेम तुमच्या विकासाच्या चष्म्यातून दिसत आहे . तुमच्या गावातील महारवाडा , झोपडपट्टी भागात राहणाऱ्या लोकांच्या घरात सहा दिवस पाऊसाचे पाणी शिरले तेव्हा तुमचा विकासाचा चष्मा कुठे होता? तुमच्या गावाच्या वेशीवर पुलासह रस्ता वाहुण गेला गावात येण्यासाठी चांगला रस्ता तरी तुम्हाला करता आला का? असाहा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.


काकांची अवस्था स्वत:चे ठेवायचे झाकून अन् लोकांचे बघायचे वाकुन!

असुन ज्यांच्याकडून एका ग्रामपंचातीचा विकास होऊ शकला नाही ते मतदार संघाचा काय विकास करतील अशी चर्चा मतदार संघात होत असुन मात्र कल्याणराव बोराडे ह्यांना दिवसाच आमदारीचे स्वप्न पडत असुन त्यांनी अगोदर आपल्या गावाचा विकास करून गावाचे कल्याण करण्याऐवजी स्वता:चेच कल्याण केले असल्यामुळे मतदारच महणू लागले आहेत, की? आपण आपली पात्रता पाहुनच रिंगणात उतरावे अन्यथा आपले हसू होणार यात तिळमात्र शंका नाही.

जालना जिल्ह्यातील परतुर-मंठा विधानसभा मतदार संघात अनेक जण आप-आपल्या पक्षाकडून विधानसभेसाठी इच्छुक आहेत, यातच काँग्रेसचे कल्याणराव बोराडे ह्या तब्बल ४ वर्षानंतर आपला मतदार संघ आठवला आणि आमदारकीचे स्वप्न पडू लागले, आकणीचे सरपंच कल्याणराव बोराडे हे पुणे-मुंबई येथील मोठे उद्य-ोजक असुन त्यांच्याकडून गावाचे भले व्हावे यासाठी त्यांना गावकऱ्यांनी सरपंच पदाची संधी दिली मात्र त्यांनी गावाचे करण्याऐवजी आपले कल्याण करून पुन्हा पुणे-मुंबईला भुर्ररर झाले, त्यामुळे गावातील जनता तर त्यांच्यावर नाराज आहेच, गावासाठी एक रस्ता न करणारे कल्याणराव बोराडे हे मात्र निवडणुकीच्या तोंडावर मतदारांना भुलविण्याचा केविलवाणा प्रयत्न करतांना मतदार संघात दिसत आहेत, परंतु त्यांचा आता कुठेही निभाव लागणार नाही हे ही तेवढेच खरे.




ही अवस्था आहे, आकणीतील गोर-गरीब नागरीकांची?

## संक्षिप्त

### सराईत व खुनाच्या गुन्ह्यात फरार आरोपीस स्थानिक नागरिकांच्या मदतीने पकडले!


**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी/प्रतिनिधी**



जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बुटखेडा येथे २९. सप्टेंबर शनिवार रोजी मध्यरात्री २ वाजेच्या दरम्यान बुटखेडा गावात दोन संशयित शिरल्याचे माहितीवरून स्थानिक नागरिकांच्या मदतीने संदेश प्रभाकर पाटोळे रा. शिराळा यास पकडले असुन, त्याचा दुसरा साथीदार दिनेश पवार राहणार देऊळगाव राजा हा अंधाराचा फायदा घेवून पळून गेला आहे. सदर पकडलेल्या आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर देऊळगाव राजा येथील पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल असुन तो सदर गुन्ह्यात फरार होता. त्यांच्या ताब्यातील बुलेट मोटार सायकल ही देऊळगाव राजा येथील चोरुन आणल्याचे निष्पन्न झाले आहे. तर त्यांच्या साथीदारांनी आणलेली शाहीन मोटार सायकलची अजुन ओळख पटलेली नाही. या घटनेची माहिती मिळताच जाफराबाद पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री इंगळे, सहायक पोलिस निरीक्षक श्रीमती वैशाली पवार, पोउनि नेमाने, पोउनि रविंद्र देशमाने, पोलिस कर्मचारी प्रदिप धोंडगे, निवृत्ती सोनवणे यांनी सदर इसमास ताब्यात घेतलेले आहे. सद्या टेंभुर्णी परिसरात ड्रोन कॅमेऱ्याच्या रात्रीच्या वेळी घिरट्या घालत असल्याने, चोरच चोरी करण्यासाठी येत असल्याच्या बातम्या सर्वत्रच गावागावात पसरत असल्याने गावकरी रात्र जागून काढत आहे. अश्याच वेळी बुटखेडा येथील जागृत नागरिकांच्या मदतीने सदर आरोपी चोरीच्या उद्देशाने गावात आल्याचे असल्याने त्यांनी टेंभुर्णी पोलीसांना कळवून या इसमास पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. सदर कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल,अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, उपविभागीय पोलिस अधिकारी गणपत दराडे, यांच्या मार्गदर्शनाखाली जाफराबाद पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक इंगळे, श्रीमती वैशाली पवार, नेमाने, टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक रविंद्र देशमाने, पोलिस कर्मचारी प्रदिप धोंडगे, निवृत्ती सोनवणे यांनी केली आहे.


### नवरात्र उत्सवाच्या अगोदर अष्टमी तिथीला घोर मंचकी निद्रा प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**



सप्टेबर माहोरा येथुन जवळ असलेले श्री तुळजाभवानी संस्थान भायडी येथे विविध कार्यक्रम तुळजाभवानी ची मंचकी निद्रा सुरू.महिषासुर राक्षसाने देवतांना त्रासग्रस्त केल्यामुळे देवतांनी भगवान ब्रह्मा विष्णू महेश यांनी तुळजाभवानी मातेची आराधना केली भवानी माता प्रगट झाली परंतु देवी निद्रावस्थेत होती त्यानंतर देवतांनी स्तुती करून मातेला प्रसन्न करून जागवले नंतर तुळजाभवानी मातेने नऊ दिवस राक्षसांसोबत संघार युद्ध केले व विजय दशमीला महिषासुरणाचा राक्षसाचा वध केला.तेव्हापासून महिषासुरमर्दिनी मातेची नवरात्र उत्सवाच्या अगोदर अष्टमी तिथीला घोर मंचकी निद्रा प्रारंभ झाली. तुळजाभवानी मातेची घोर मंचकी निद्रा दिनांक-२४/०९/२०२४ रोजी रात्री ८.४५ मी. सुरू झालेली आहे. ही निद्रा दिनांक ०३/ऑक्टोंबर/२४ पर्यंत आहे त्या दिवशी नवरात्र उत्सवाचा पहिला दिवस आहे. तुळजाभवानी मातेची मंचकीनिद्रा भारतामध्ये तुळजापूर नंतर भायडी येथे होते.

### दादासाहेब गावडे यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

वडीगोद्री. दि २७सप्टेंबर अंबड तालुक्यातील वडीगोद्री येथील ज्येष्ठ नागरिक दादासाहेब शिवाजीराव गावडे यांचे वृद्धापकाळाने शुक्रवारी रात्री ९- ३० मिनिटांनी निधन झाले आहे.दादासाहेब गावडे हे वडीग-ोद्रीतील एक शांत संयमी व समाधानी व्यक्तिमत्व होते मृत्यू समयी त्यांचे वय सुमारे ९० वर्षे होते. त्यांच्या मागे तीन मुले दोन मुली व नातवंडे असा भला मोठा परिवार आहे त्यांच्या निधनाने परिसरामध्ये हळहळ व्यक्त लक्ष करण्यात येत आहे. श्री दादासाहेब गावडे हे मराठवाडा मुक्ती संग्रामाचे साक्षीदार होते.

### परतूरचे पोलीस निरीक्षक मच्छिन्द्र सुरवसे यांना बंधू शोक

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**



येथील पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक मच्छिन्द्र सुरवसे यांचे जेष्ठ बंधू गोरख तुकाराम सुरवसे यांचे दि २६ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. बीड जिल्ह्यातील चाकरवाडी त्यांच्या गावी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ते ६२ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी,भाऊ, दोन मुले, एक मुलगी,भावजई, सुना,जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## परतूरात काँग्रेसची परिवर्तन यात्रा

### जेथलियांच्या अनुपस्थितीने भुवया उंचावल्या!

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**



काँग्रेसचे बालासाहेब आकात यांच्या परतूर येथील परिवर्तन पदयात्रेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला.आमदार राजेश राठोड,अनवर देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर या यात्रेत सहभागी दिसले मात्र माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांची उप-स्थिती नसल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाकडून उमेदवारीसाठी इच्छुक असलेले , बालासाहेब आकात हे परिवर्तन पदयात्रेच्या माध्यमातून, मतदार संघातील प्रत्येक गाव वाडी वस्ती तांडा येथील नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधत आहेत. शनिवार (ता.२८) रोजी बालासाहेब आकात यांची परिवर्तन पदयात्रा परतूर येथे काढण्यात आली या परिवर्तन पदयात्रेला विधान परिषद आमदार राजेश राठोड, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनवर देशमुख, सोन-ाजी बोराडे, शरदराव बोराडे, प्रकाश घुले तसेच काँग्रेसचे पदाधिकारी ,कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील मुख्य रस्त्यावरून ही पदयात्रा काढण्यात आली. मतदार संघातील जनतेचे विविध प्रश्न जाणून घेण्यासाठी ही पदयात्रा सुरू असल्याचे बालासाहेब आकात यांनी पत्रकारांना सांगितले.

ग्रामीण भागात आकात यांच्या पदयात्रेला चांगला प्रतिसादही मिळत असताना परतूर शहरात ही मिळालेला भव्य प्रतिसाद पाहता काँग्रेस पक्षाकडून मराठा उमेदवार म्हणून आकात यांच्याकडे पाहिले जाते. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्यातील वातावरण तापलेले असताना काँग्रेसकडून उमेदवारीचा दावा करणाऱ्यामध्ये बालासाहेब आकात हे मराठा उमेदवार म्हणून प्रबळ दावेदार समजले जात आहेत. दुसरीकडे माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया हेसुध्दा काँग्रेस पक्षाच्या वतीने परत उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहेत. पण मराठा ओबीसी च्या वादळी गणितात त्यांचा तिकिटासाठी नंबर लागणार का हा मोठा प्रश्न आहे.त्यात ते पदयात्रेत सहभागी झाले नसल्याने अनेक चर्चांना तोंड फुटले आहे.

## ऑनलाईन थम घेणे बंद केल्याने कामगारांनी केला रास्ता रोको

**तभा वृत्तसेवा,**
**भोकरदन/प्रतिनिधी**



बांधकाम कल्याणकारी योजनेअंतर्गत महिला तसेच पुरुष कामगारांना साहित्य कीट देण्यात येते मात्र त्यासाठी अगोदर ऑनलाईन कामगार नोंदनी करावी लागते.व नंतर कामगार कार्यालयात थम (अंगठा ) द्यावा लागतो त्यानंतर ते साहित्याचे किट (पेटी ) कामगारांना दिल्या जाते.

मात्र,गेल्या अनेक दिवसांपासून कामगारांची थम सुविधा बंदच होती.

विशेष म्हणजे बाजार समितीच्या गोदामात या पेट्यांचे किट ठेवण्यात आलेले असून यापूर्वी त्याच गोदामात कामगारांचा थम घेतला जायचा.

नंतर माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनी नुकताच जालना येथे कामगार आक्रोश मोर्चा काढला.या वेळी या मोर्चाची दखल घेत कामगार आयुक्तांनी तात्काळ आदेश काढुन सिल्लोड रस्त्यावरील कामगार कार्यालयात हलविण्यात आली.व तेथे ता.२६ सप्टेंबर रोजी दिवसभर थम सुविधा सुरळीत सुरु होती.परंतु शुक्रवारी सकाळी पाच वाजेपासुन असंख्य कामगार थम देण्यासाठी लाईन लाऊन उभे होते.मात्र, सकाळी नऊ वाजले तरी मात्र थम घेण्यात येत नसल्याने लाभार्थी कामगारांनी आक्रमक होऊन सिल्लोड भोकरदन रस्त्यावर कामगार कार्यालया समोरच अचानक चक्काजाम आंदोलन सुरु केले होते.यावेळी हजारोंच्या संख्येने कामगार महिला पुरुषांची उपस्थिती पहायला मिळाली.यावेळी आंदोलन चिघळु नये म्हणुन पोलीसांचाही मोठा ताफा वेळीच दाखल झाला होता.हा एकुण प्रकार आणि सदर सुरळीत सुरू असलेली यंत्रणा बंद करण्यात आल्याने बांधकाम कामगारांनी आक्रमक होऊन रास्ता रोको आंदोलन केले.यात काही राजकीय पक्षाचे लोक राजकारण करत असल्याचे काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी आरोप केला.यावेळी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख,राहुल देशमुख,महेश पुरोहित व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे महेश औटी व कार्यकर्त्यांनी या रास्ता रोको आंदोलनास भेट दिली.

## मतदारसंघात कुठेही मंदिर बांधलं गेलं त्या ठिकाणी सभामंडप बांधण्याची जबाबदारी माझी -आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

महाराष्ट्र सर्व मराठवाडा ही संत महंतांची भूमी असून आपल्याकडे संतांची खूप मोठी परंपरा आहे संतांचा विचारधारेतूनच आपली संस्कृती आजपर्यंत टिकून आहे आणि संस्कृती टिकवण्यासाठी हजारो वर्षांपासून साधुसंतांनी देवदेवतांच्या मंदिरांची उभारणी केली आहे त्यामुळेच परतुर मतदार संघात कुठेही मंदिर बांधलं गेलं तर त्या ठिकाणी सभामंडप बांधण्याची जबाबदारी माझी असल्याचे मी समजतो असे प्रतिपादन माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले

आज नळडोह पेवा येथे माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह संत महंतांच्या उपस्थितीत टाळ मृदंगाच्या गजरात संत जनार्दन महाराज संस्थान नळडोह येथे १ कोटी रुपयांच्या सभागृहाचे आणि ४० लक्ष रुपयांच्या पेव्हर ब्लॉक कामाचे भूमिपूजन करण्यात आले यावेळी श्री लोणीकर बोलत होते यावेळी मंचावर हभप बबन महाराज हंडीकर हभप छगन महाराज टाकळीकर संस्थानचे सचिव आसेराव थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती आपण आयुष्यात कधी खोटं नारळ फोडलेले नसून दिलेला शब्द काय पाळण्याचा प्रयत्न केलेला आहे श्रावण मासाच्या निमित्ताने संत जनार्दन महाराजांच्या दरबारात दिलेल्या शब्द खोटा ठरवू नये याची मनोमन मला खूप चिंता होती त्यामुळे उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस व ग्राम विकास मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे पाठपुरावा करून या भव्यसभा मंडपासाठी १ कोटी रुपयांचा निधी खेचून आणला आहे मी या संतभूमीमध्ये दिलेला शब्द पाळण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली आता लवकरच भव्य सभा मंडपाची उभारणी केली जाणार आहे याचा मला मनस्वी आनंद आहे असेही यावेळी आमदार लोणीकर म्हणाले मतासाठी विरोधक लांगुलचालन करत गावात तेढ निर्माण करू शकतात अशीच परिस्थिती आज गावोगावी दिसत आहे ही परिस्थिती समजून घेत सुज्ञ नागरिकांनी सजग आणि जागृत राहण्याची गरज आहे आपण सर्वजण सर्वप्रथम भारतीय आहोत ही भावना प्रत्येकाच्या मनामध्ये रुजणे अत्यंत आवश्यक असून जातीपातीचे विष आपल्यामध्ये भिन्नता कामा नये त्यामुळे कुणाची ही भले होणार नाही उलट सुखदुः खात सर्व जाती-धर्माचे लोक एकमेकांसाठी धावून येतात हीच आपली खरी संस्कृती आहे त्यामुळे गाव पातळीवर मतासाठी लांगूलचालन करणाऱ्या लोकांपासून सावध राहण्याची गरज असून विकासाभिमुख व्यक्तीच्या पाठीशी ठामपणे उभे



राहण्याची गरज आहे असेही यावेळी आमदार लोणीकर म्हणाले यावेळी श्री गणेशराव खवणे श्याम सोनय्या स्वामी विलास घोडके जगदीश जाधव अमोल मोरे विठ्ठलराव काळे प्रसादराव गडदे गजानन देशमुख गोविंदराव देशमुख शरद पाटील अशोक आप्पा सोनटक्के कानोबा थोरात शेषनारायण दवणे राजेभाऊ खराबे नितीन सरकटे किशोर हनवते भागवत पोटे प्रकाश गबाळे नवनाथ चट्टे शिवशंकर डोईफोडे पांडुरंग काळे रामेश्वर देशमुख गुलाबराव राठोड प्रकाशराव गडदे प्रसादराव खरात आबासाहेब सरकटे सुनील कांगणे श्रीरंग देशमुख पंजाबराव पुणेकर पवन केंदळे मनोज देशमुख जानकीराम चव्हाण सचिन राठोड बाबाजी जाधव आनंद जाधव पंकज राठोड मधुकर आप्पा सोनटक्के संतोष लाकोळे उद्धवराव सोनकर ओंकारराव वरणकर भीमाअप्पा कौटकर रामभाऊ राठोड गोबरा राठोड ज्ञानेश्वर थोरात सुरेश काळे माणिक पवार भुजंग राठोड शंकर फड सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता श्री सोनी यांच्यासह लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते भक्त परिवार व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## सक्षम व खंबीर उमेदवारास उमेदवारी देण्याचे शर्मा यांचे मंठ्यात सुतोवाच



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/ प्रतिनिधी**

परतूर विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाचा चांगला प्रभाव असून महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन उमेदव-ारास पाठबळ दिल्यास काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराचा विजय निश्चित आहे.त्यामुळे इच्छुक उमेदवारांनी एकत्र येऊन पक्ष उमेदवारी देईल त्या उमेदवारास पाठबळ द्यावे असे आवाहन काँग्रेस पक्षाचे प्रभारी निरीक्षक महेश शर्मा यांनी केले. येथील माऊली मंगल कार्यालय येथे आयोजित काँग्रेस पक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा (ता.२७) शुक्रवार रोजी मेळावा घेण्यात आला. यावेळी व्यासपीठावर सहप्रभारी बाळासाहेब देशमुख, आ.राजेश राठोड, कल्याणराव बोराडे, बालासाहेब आकात, अँड अन्वर देशमुख, संतोष पवार, निळकंठ वायाळ, अविनाश राठोड, शरद बोराडे, प्रकाश घुले यांची उपस्थिती होती. यावेळी शर्मा यांनी मतदारसंघातील पक्षाच्या कार्याचा आढावा घेत सखोल मार्गदर्शन करत असताना मतदार संघाला सक्षम व खंबीर उमेदवार दिला जाणार असल्याचे सुतोवाच केले. यावेळी महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गोपाळराव बोराडे,अँड पंकज बोराडे यांच्यासह मतदार संघातील जि.प.सदस्य, प.स.सदस्य, बाजार समितीचे संचालक, नगरसेवक,विविध ग्रामपंचायतचे सरपंच, चेअरमन, महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## घनसावंगी बस्थानकाचे अपुऱ्या कामाचे उद्घाटन करुन श्रेय घेण्याचा टोपेंचा केवीलवाना प्रयत्न- अंकुशराव बोबडे

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**



अंबड घनसावंगी दि २७ सप्टेंबर बस्थानकाचे अपुरे कामाचे उद्घाटन राजेश टोपे यांनी घाई गरबडित उरकून घेतले,घनसावंगी तालुका या ठिकाणी शासनाने गोर गरीब जनतेला सोय करिता ७ कोटी रुपयाचे बस्थानक बांधण्यासाठी निधी दिला आहे.

परंतु गुत्तेदार यांनी अतिशय निकृष्ट दर्जेचे काम केले आहे.व राजेश टोपे यांच्याशी संगमत करून गुत्तेदार व राजेश टोपे यांनी आधुऱ्या कामाचे उद्घाटन केले जवळपास बस्थानकाचे ४०% काम बाकी त्या ठिकाणी स्वच्छालय बाधण्यात आले नाही,व इस्टीमेट प्रमाणे काम झाले.जे झाले ते निकृष्ट दर्जेने काम केले आहे. व त्या ठिकाणी कामाचे अंदाज फलक लावण्यात आला नाही तसेच बाधकाम मधील वीट न वापरता सिमेट गटू वापर केला आहे. पिण्याच्या पाण्याची सोय नाही लाईट चे काम आधुरे बऱ्याच ठिकाणी फरची बसवणे बाकी असे कामे अधुरे आहेत. व बस्थानकामधून बस बाहेर जाण्याकरिता व्यवस्थित रस्ता नाही.व इसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना विचारले असता.त्यांनी सांगितले कि आमचा आणि या उद्घाटनाचा काही संबध नाही आमचा कुठलाच अधिकारी त्या उद्घाटनाला उपस्थित नव्हता.व सर्व लोकप्रतिनिधी नावाचे बोर्ड बस्थानक या ठिकाणी लावला आहे.परंतु अपुरे काम असल्यामुळे राजेश टोपे सोडता संपूर्ण पुढारी यांनी पाठ फिरवली आहे.

कारण कि हे काम अर्धवट असल्यामुळे आम्ही त्या उद्घाटनाकाडे गेलो नाही,राजेश टोपे यांनी कोणलाण न बोलवता स्वतालाहा कामाचे श्रेय घेण्याकरिता कामाचे उद्घाटन उरुकून घेतले आहे.

तरी अपुऱ्या कामाचे उद्घाटन गुत्तेद-ारानी करून घेतल्यामुळे त्या गुत्तेद-ारावर्ती योग्य ती कारवाई करावी व एजन्सी काळ्या यादी टाकावी व अशी मागणी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन करण्यात आली अंकुशराव बोबडे किसान मोर्चा


# कें.प्रा.शा.बिडकीन येथे निरोप व स्वागत समारंभ संपन्न



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २९ सप्टेंबर – पैठण तालुक्यातील बिडकीन येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा.बिडकीन येथे दि २८ शनिवार रोजी केंद्रातील मुख्याध्यापक पदोन्नतीने केंद्रप्रमुख झालेले उमेश सोनवणे व दत्तात्रय दाणेकर सर व संगीता विद्यासागर यांचा निरोप समारंभ व सत्कार सोहळा पार पडला. तसेच बिडकीन केंद्रा साठी नव्याने नियुक्त झालेले केंद्र प्रमुख रमेश पवार यांचेही सत्कार करण्यात आले. तसेच बिडकीन केंद्रातील जेष्ठ मुख्याध्यापक अनिल चाबुकस्वार सर प्रा.शा. नांदलगाव, हे नियत वयोमानानुसार ३० सप्टेंबर रोजी सेवानिवृत्त होत आहेत त्यांचाही सेवापूर्ती सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. सदरील कार्यक्रमास बिडकीन बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी तथा प्रभारी गटशिक्षणाधिकारी मुश्ताक शेख, अध्यक्षस्थानी उपस्थीत होते तर प्रमुख पाहुणे म्हणून वरील सत्कारमूर्ती तथा शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष केदारनाथ गुंजाळ, उपाध्यक्ष नंदू भोगाडे, सदस्य सुरेश वडतल्ले ,यांची उपस्थिती होती.सदरील कार्यक्रमाची सुरूवात दिपप्रज्वलन तथा आद्यशिक्षिका सावित्रीबाई फुले प्रतिमापूजनाने झाली या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक .घेवंदे सर यांनी केले.यावेळी केंद्रातील शिक्षक व मुख्याध्यापक प्रतिनिधी यांनी सत्कारमूर्ती यांच्याबद्दल मनोगत व्यक्त करून आठवणींना उजाळा दिला.निरोपाचा कार्यक्रम म्हटलं की भावना अनावर होतात.कार्यक्रमाच्या वेळी भावनिक वातावरण तयार झाले परंतु त्यातूनही सावरून आनंददायी व उत्साही वातावरणात कार्यक्रम पार पडला.सर्व सत्कारमूर्ती यांना बिडकीन केंद्रातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांच्याकडून संस्नेह अशी भेटवस्तू देऊन यथोचीत सत्कार केला.सत्कारास उत्तर देतांना मान्यवरांनी मार्गदर्शन तथा सर्वाचे आभार मानले.मुश्ताक शेख यांनी अध्यक्षीय भाषणात सर्वांना अनमोल असे मार्गदर्शन केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी केंद्रातील सर्वच शिक्षकांचे सहकार्य लाभले.विशेष सहकार्य संगीता रिडला मडम,अझमत शेख मडम .गवारे सर व इमरान पठाण सर यांचे लाभले.सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तथा निवेदन कणसे सर तथा आभारप्रदर्शन जगदाळे सर यांनी केले.

## दुर्गा भवानी माता उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर, अध्यक्षपदी चौधरी तर उपाध्यक्षपदी चौधरी







तभा.वृत्तसेवा

सोयगाव, दि.२९ सप्टेंबर : सोयगांव शहरातील जागृत देवस्थान दुर्गा भवानी माता मंदीर उत्सव समितीच्या अध्यक्ष पदी संदीप चौधरी,उप अध्यक्ष पदी आंनद चौधरी,कार्य अध्यक्ष पदी देवेद्रं चौधरी यांची निवड करण्यात आली गेल्या दीडशे वर्षापासून चौधरी-जावळे परीवाराच्या वतीने हा उस्तव साजरा करण्यात येतो या ९ दिवसांत मंदीर समोर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते सोयगांव शहरातुन वाजत गाजत मिरवणूक काढण्यात येऊन मंदीरात घट स्थापना करण्यात येते सर्व दामपत्याचे हाताने पुजा करण्यात येते व आष्टमीला सर्व चौधरी परीवारातील दामपत्याच्या हाताने होमची पुजा करण्यात येते ह्या वर्षात नवरात्री उस्तावाचे आयोजन करण्यात आले असुन मंडाळाचे जेस्ट सदस्य रमेश चौधरी,शिवाजी चौधरी,गोविदा चौधरी,राजेद्रं चौधरी,यशवंत चौधरी यांच्या अध्यक्ष खाली निवड घेण्यात आली व पुढील कार्यकारणी जाहिर करण्यात आली.यावेळी अध्यक्ष संदीप चौधरी,उपअध्यक्ष आंनद चौधरी,कार्य अध्यक्ष देवेद्रं चौधरी,कोष अध्यक्ष यशवंत चौधरी,रवी चौधरी,सचीव पदी शंकर चौधरी,यांची निवड करण्यात आली.यावेळी उपस्थित सदस्य महेश चौधरी,बबन चौधारी,समाधान चौधरी,प्रकाश चौधरी,प्रदीप चौधरी,मनोज चौधरी,सचीन चौधरी,ज्ञानेश्वर चौधरी,सागर चौधरी,रुतीक चौधरी,शरद चौधरी,भास्कर चौधरी,आनिल चौधरी,विजय चौधरी,वैभव चौधरी,निखील पाटील,कार्तीक चौधरी यश चौधरी व चौधरी परीवारातील सगळे बांधव,उपस्थित होतो.

## जैन विश्व भारतीच्या विश्वस्तपदी सुभाष नहार यांची निवड



छत्रपती संभाजीनगर : तेरापंथ धर्माची राजधानी लाडुन येथे स्थित जैन विश्व भारती. नुकतेच सुरत येथे झालेल्या अधिवेशनात स्थानिक सुभाषचंद नहार यांची जैन विश्व भारतीच्या द्विवर्षीय अधिवेशनात विश्वस्त म्हणून निवड करण्यात आली आहे. जैन विश्व भारतीच्या वार्षिक अधिवेशनात झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत विविध पदांसाठी निवड करण्यात आली. त्यामुळे चेन्नईचे रहिवासी अमरचंद लुंकड यांची जैन विश्व भारतीच्या आगामी दोन वर्षांच्या अधिवेशनासाठी अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. स्थानिक विश्वस्त म्हणून त्यांची निवड झाली. जैन विश्व भारती ही गेल्या पन्नास वर्षांपासून स्थापन झालेली एक महत्त्वाची संस्था आहे, याची नोंद घ्यावी. जो शिक्षण, साहित्य, संशोधन, अध्यात्म साधना आणि सेवा क्षेत्रात कार्यरत आहे. निवडणूक प्रक्रियेनंतर नूतन अधिकाऱ्यांनी आचार्यश्री महाश्रमण यांचे आशीर्वाद घेतले नूतन विश्वस्त सुभाष नहार यांना सकल जैन समाज छ.संभाजीनगर यांनी शुभेच्छा दिल्या.

## ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मधील विद्यार्थीनी कबड्डी, खो-खो स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवत ट्रॉफी जिंकली



बिडकीन दि २९ सप्टेंबर : छत्रपती संभाजीनगर कबड्डी आणि खो-खो अकॅडमी व मिशन मार्शल आर्ट अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित जिल्हास्तरीय कबड्डी,स्पर्धा नक्षत्रवाडी देवगिरी कॉलोनी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित झाल्या होत्या यामध्ये ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मधील मुलांनी कबड्डी मध्ये प्रथम क्रमांक मिळवून (१७ वर्ष) वय गटांमध्ये विद्यार्थ्यांनी बाजी मारली तसेच खो-खो स्पर्धेमध्ये सुद्धा एक बाय व अंतिम सामन्यांमध्ये विद्यार्थ्यांनी विजय मिळवत ट्रॉफी जिंकली या सामन्याचा निकाल लागताच शाळेचे संस्थापक सतिश तोतला सर व शाळेच्या मुख्यध्यापिका सविता तोतला यांनी सर्व विद्यार्थीचे व शाळेचे क्रिडा शिक्षक पवन घुगे सर यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शाळेचे क्रिडा शिक्षक पवण घुगे सर यांनी विद्यार्थ्यांकडुन चांगल्या प्रकारे मेहनत घेवुन शाळेला हा सामना जिंकुन दिला. या सामन्यातिल विद्यार्थी विराज जैस्वाल,यशराज धरपळे, हेमंत राठोड, अर्शन शेख, नैतिक तोडकर, तनिश तोतला, स्वराज हाडे, आयुष खिल्लारी, यशोधन घुगे, पार्थ चव्हाण, यश सोळुंके, केतन जाजु, फरहान शेख, या सर्व विद्यार्थीचे शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पर्यटन स्थळे आणि जागतिक वारसा स्थळांचे जतन, संवर्धना बरोबरच पर्यटन स्थळांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी पुरातत्त्व विभाग कटिबद्ध : डॉ. शिवकुमार भगत

तभा वृत्तसेवा दि २८

खुलताबाद प्रतिनिधी संतोष करपे.वेरुळ पर्यटनस्थळे आणि जागतिक वारसा स्थळांचे जतन व संवर्धन करण्याबरोबरच पर्यटन स्थळांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन भारतीय पुरातत्व सर्वेक्षण अधीक्षक पुरातत्वविद, डॉ. शिवकुमार भगत यांनी केले. ते आज पत्र सूचना कार्यालय, मुंबईने वेरुळ, जि. छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित केलेल्या माध्यम कार्यशाळेत बोलत होते. पत्र सूचना कार्यालयाच्या उप संचालक जयदेवी पुजारी स्वामी, जिल्हा माहीती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, माहिती अधिकारी, डॉ. मिरा ढास, क्षेत्रीय प्रचार अधिकारी माधव जायभाये, भारत पर्यटन विभागाच्या सहायक संचालिका मालती दत्ता, भारतीय पुरातत्व सर्वेक्षणचे सहायक अधिक्षक पुरातत्वविद प्रशांत सोनवणे यांची या प्रसंगी उपस्थिती होती.

डॉ भगत म्हणाले की, मराठवाडयातील पर्यटनाला चालना देण्यासाठी पुरातत्व विभाग जागतिक पर्यटन स्थळांचा तसेच पर्यटन स्थळांचा विकास करण्याबरोबरच जागतिक स्थरावर ही पर्यटन स्थळे पोहचविण्यासाठी प्रचार करत आहे. जागतिक वारसा संवर्धनात स्थानिकांची भूमिका फार महत्त्वाची आहे, एकप्रकारे ते ब्रँड अम्बॅसेडर असल्याचं भगत म्हणाले. आपापल्या परिसरातील जास्त परिचीत नसलेल्या पर्यटन स्थळांना विविध माध्यमातून प्रसिद्धी देण्याची आवश्यकता भगत यांनी व्यक्त केली. तसेच वारसास्थळांचे जतन करण्यासाठी



गर्दीवर नियंत्रणही महत्त्वाचे असल्याचे भगत म्हणाले.

पर्यटनाचे अनेक आयाम सध्या निर्माण झाले आहेत. त्यामुळे पर्यटन संस्कृतीचा विकास होणे आवश्यक आहे, असे जिल्हा माहिती अधिकारी डॉ मिलिंद दुसाने म्हणाले. पर्यटक आणि स्थानिकांमध्ये पर्यटन संस्कृती विकसित करण्यासाठी स्थानिक माध्यमांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पायाभूत सुविधांसह पर्यटनस्थळावर पर्यटकांना मिळणारी वागणूक महत्वाची असून, स्थानिक पातळीवर सौहार्दपूर्ण वातावरण असले पाहिजे, असे दुसाने म्हणाले.

भारत पर्यटन विभागाच्या सहायक संचालक, मालती दत्ता यांनी 'शाश्वत पर्यटन-पर्यावरणपूरक पर्यटनासाठी नवोन्मेष' या विषयावर मार्गदर्शन केले.

पर्यटन स्थळे तसेच वारसा स्थळांच्या माध्यमातून स्थानिक युवकांना रोजगार निर्मिती शक्य आहे, त्यासाठी माध्यमांनी जागृती केली पाहिजे, अशी अपेक्षा मालती दत्ता यांनी व्यक्त केली. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळात छत्रपती संभाजीगनर येथील लेण्यांचा समावेश असल्याने या वारसा स्थळांच्या संवर्धनासाठी स्थानिकांची भूमिका महत्त्वाची असल्याचं त्या म्हणाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने मिशन लाइफ अंतर्गत पर्यावरण-अनुकूल वस्तूंचा वापर करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

पत्र सूचना कार्यालयाच्या उपसंचालक जयदेवी पुजारी स्वामी यांनी पत्र सूचना कार्यालयाच्या कामकाजाची माहिती तसेच वार्तालाप ग्रामीण माध्यम परिषद या कार्यक्रमाच्या अयोजनामागची भूमिका स्पष्ट केली.

यावेळी पत्रकार विजय चौधरी श्रीकांत कुलकर्णी देवदत्त कोठारे यांनी मनोगत व्यक्त केले.

जागतिक पर्यटन दिनानिमित्त माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या छत्रपती संभाजी नगर येथील केंद्रीय संचार ब्यूरो वेरुळ लेणी, जिल्हा संभाजीनगर येथे २७ व २८ सप्टेंबर असे दोन दिवसीय मल्टीमीडिया चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे आयोजन माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या छत्रपती संभाजी नगर येथील केंद्रीय संचार ब्यूरो, पत्र सूचना कार्यालय, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, आणि पर्यटन मंत्रालयाच्या सहकार्याने करण्यात आले आहे

# रांजणगावातील कमान पडण्याची भीती

वाळूज महानगर : रांजणगाव शेणपुंजी येथील श्री संत शिरोमणी सावता महाराज यांची मुख्य मार्गावरील कमान जुनी झाली आहे. जोराचा वारा, वादळाने ही कमान कोसळून मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ग्रामपंचायत प्रशासनाने याठिकाणची जुनी कमान हटवून नवीन कमान उभारावी, अशी मागणी अलीम सय्यद, कृष्णा लोहकरे यांनी केली आहे.

वाळूजच्या ई-सेक्टरमधील पथदिवे बंद

वाळूज महानगर : औद्योगिक परिसरातील ई-सेक्टरमधील बहुतांश पथदिवे बंद आहेत. पथदिवे बंद असल्याने अंधाराचा फायदा घेऊन भुरटे चोर कारखाना परिसरातील लोखंडी साहित्य, कच्चा व तयार माल आदींची चोरी करतात. एमआयडीसी प्रशासनाकडे पथदिवे सुरू करण्याची मागणी करूनही दुर्लक्ष होत आहे. प्रशासनाने ई-९५-२ याठिकाणी पथदिवे सुरू करावेत, अशी मागणी उद्योजक अरुणकुमार सेनगुप्ता यांनी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांकडे केली आहे.

साईनगरातील गतिरोधकाची उंची कमी करा

वाळूज महानगर : सिडको साईनगर येथील साईबाबा चौकातील दोन्ही बाजूच्या गतिरोधकांची उंची नियमापेक्षा अधिक आहे. त्यामुळे अनेक कार, दुचाकी खालच्या बाजूने गतिरोधकावर घासून नुकसान होत आहे. दुचाकीस्वारांचा वाहनावरील ताबा सुटून अपघात होत आहे. शनिवारी रात्री याच गतिरोधकावरून जाणाऱ्या दुचाकीस्वार गणेश चौधरी याचा अपघात झाला. त्याच्या मागे बसलेल्या पत्नीला किरकोळ दुखापत झाली. सचिन पाटील, रायभान जाधव यांनी तत्काळ धाव घेत त्यांना मदत केली. या ठिकाणी वारंवार अपघात होत असल्याने सिडको प्रशासनाने गतिरोधकांची उंची कमी करावी, अशी मागणी दीपक दाभाडे, दत्तात्रय वरपे, नामदेव पठाडे आदींनी केली आहे.

सिडकोत 'अंधेरा कायम'

वाळूज महानगर : सिडको वाळूज महानगर-१ येथील श्रीनिवास पार्क, पाण्याची टाकी ते तीसगाव मुख्य मार्ग या ठिकाणचे सर्व पथदिवे बंद आहेत. सिडको प्रशासनाने दोन दिवसांपूर्वी पथदिवे दुरुस्ती सुरू केली होती. परंतु ठराविक परिसरातील पथदिवे सुरू करून सिडकोची मोहीम ठप्प झाली, असा आरोप नागरिकांतून होत आहे. विशेष म्हणजे याच परिसरातून मागील वर्षभरात तीन महिलांचे मंगळसूत्र, तर दोघांचे मोबाइल हिसकावून चोरट्यांनी पळ काढलेला आहे. सर्व ठिकाणचे पथदिवे सुरू करावेत, अशी मागणी सिडको वाळूज महानगर बचाव कृती समितीचे अध्यक्ष नागेश कुठारे यांनी केली आहे.

## विकासाच्या मुद्द्यावर गंगापूर खुलताबाद विधानसभा निवडणूक लढणार : आ प्रशांत बंब

खुलताबाद प्रतिनिधी. गंगापूर खुलताबाद विधानसभा पंधरा वर्षात केलेल्या विकासात्मक कामाच्या माध्यमातूनच आपण विधानसभेची निवडणूक लढवणार असे भाजपा आमदार प्रशांत बंब यांनी सांगितले. मी एक वेळेस अपक्ष दोन वेळेस भारतीय जनता पार्टीच्या वतीने विधानसभा त जनता जनार्दनाच्या आशीर्वादाने माझ्या कुटुंबात कुठलीही राजकीय वारसा नसतानाही मी पक्ष . पक्षाचे पदाधिकारी मित्रपरिवार मुळेच आमदारकीची हॅट्रिक करू शकलो याचा मला अभिमान आहे याबाबतचे सर्व श्रेय गंगापूर खुलताबाद मतदार संघातील सर्व मतदारांना.व. पक्षाचे पदाधिकारी मित्रपरिवार. येणारी विधानसभा निवडणूक ची आचारसंहिता लागल्यानंतर आपण केलेल्या विकास कामाचे पुस्तक प्रत्येक गावच्या ग्रामपंचायत कार्यालयात देणार असून त्यातून केलेले काम विरोधकांना दिसून येईल .

## श्री.स.भु. बिडकीन च्या प्रचिता कळसकर हिची राज्यस्तरीय एकपात्री नाटक स्पर्धेसाठी निवड



बिडकीन दि २९ सप्टेंबर – जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर आयोजित माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कला उत्सव स्पर्धेत पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथील प्रचिता बाबासाहेब कळसकर हिची राज्यस्तरीय एकपात्री नाटक स्पर्धेसाठी निवड झाली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हास्तरीय स्पर्धेत तिने आपली दर्जेदार आणि उत्कृष्ट कला सादर करून उपस्थितांची मने जिंकली. सहा विविध कला प्रकारांमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून सतरा विद्यार्थ्यांची कला उत्सव राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. कु.प्रचिता कळसकर ही एकपात्री नाटक सादर करणार आहे.या स्पर्धेसाठी तिला प्रशालेतील सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती मालती बिरारे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या यशाबद्दल पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## नेहरुचौकात पिसाळलेल्या कुत्र्याचा आठ जणांना चावा

पैठण दि २९ :- पैठण शहरातील नेहरू चौक भागात मोकाट कुत्र्यांनी उच्छाद मांडला असून पिसाळलेल्या कुत्राने तब्बल आठ जणांना चावा घेतल्याने परिसरात भीतेचे वातावरण पसरले आहे. त्यात पैठण ग्रामीण आरोग्य केंद्रात रेबीजचे इंजेक्शन नसल्याचा कायमचा प्रश्न असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. शहरातील अनेक भागात मोकाट कुत्रे नागरिकांचे लचके तोडत असून पिसाळलेल्या कुत्राने एकामागून एक पुरुष, महिला आणि बालक असे आठ जणांचा चावा घेतल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# पौष्टिक आहार, नियमित व्यायाम आणि धूम्रपान टाळल्यास हृदयरोग टाळणे शक्य -डॉ.मिलिंद खर्चे



छत्रपती संभाजीनगर, २९ सप्टेंबर २०२४: लोकांनी पौष्टिक आहार व नियमित व्यायाम यांचा अंगीकार केला आणि धूम्रपान नाही केले तर जगभरातील हृदयरोगाच्या लाखो केसेस टाळता येऊ शकतात. असे छत्रपती संभाजीनगर येथील युनायटेड सिग्मा हॉस्पिटल चे चीफ इंटरवेशनल कार्डियोलोजिस्ट आणि विभाग प्रमुख डॉ. मिलिंद खर्चे यांचे हे म्हणणे आहे.

जागतिक पातळीवर हृदयरोग हा मृत्यूचे प्रमुख कारण असून जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारी नुसार, त्यामुळे २०१९ मध्ये १ कोटी ७९ लाख मृत्यू झाले आहेत. त्यातील तीन चतुर्थांश मृत्यू हे कमी व अल्प उत्पन्न गटातील देशांमध्ये झाले आहेत. हृदयरोगामुळे झालेल्या या मृत्यूंपैकी ८५ टक्के मृत्यू हृदयविकाराचा झटका किंवा आघात यामुळे झाले आहेत. निकृष्ट आहार, कमी शारीरिक हालचाल, धूम्रपान आणि प्रदूषण हे त्यासाठी धोक्याचे घटक आहेत. किमान दर पाच वर्षांनी आपल्या कोलेस्टेरॉलची तपासणी करून घ्यायला हवी आणि धोक्याची कारणे असतील तर अधिक वारंवार करावी. तसेच त्यांना मधुमेहाचा धोका आहे का, हे पाहण्यासाठी त्यांची रक्तातील साखर तपासायला हवी, कारण तेही हृदयविकारासाठी एक कारण ठरू शकते. महिलांमध्ये आम्ही ज्याला दहा वर्षांचा जेंडर गॅप म्हणतो अशी एक गोष्ट असते. पुरुषांना पन्नाशीमध्ये हृदय विकार होण्याचा धोका असतो. त्या तुलनेत एस्ट्रोजेनमुळे महिलांना साठीच्या घरात हृदयविकार होऊ शकतो. मात्र मधुमेहामुळे महिलांमधील हा फरक निघून जातो. गरोदरपणातील अति ताण किंवा मधुमेह हेसुद्धा महिलांना लवकर हृदयविकार होण्याचे मोठे कारण आहे.


### जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १४०/२०२४.

१. मिराबाई संजय गरुड, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, २. शालु कैलास इंगळे, वय ३० वर्षे, धंदा घरकाम. ३. संतोश संजय गरुड, वय ३३ वर्षे, धंदा मजुरी ४. रविंद्र संजय गरुड, वय ३७ वर्षे, धंदा मजुरी, सर्व रा. वेताळवाडी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. योगेश र. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत संजय काशिनाथ गरुड यांचा दिनांक १७-०६- २०२४ रोजी मौजे वेताळवाडी येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ४ वारस आहे. असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत संजय काशिनाथ गरुड यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र दंण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २७/०९/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. ११/११/२०२४

आदेशावरुन

---

जा.क्र .२०२४/विधी/ज.मृ. आदेश/प्र.क्र.३२७५/कावि-३३७५ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-१८.०९.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :- गीता नामदेव इंगळे, वय-३८ वर्ष व्यवसाय- मजुरी, रा.ह.मु. तिरुपती रो हाऊस, घर कं.३, विजय नगर देवलाली कॅम्प, नाशिक ता.जि. नाशिक.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय सावळदबारा, ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी गीता नामदेव इंगळे, रा.ह.मु.तिरुपती रो हाऊस, घर कं.३, विजय नगर देवलाली कॅम्प, नाशिक ता.जि. नाशिक यांनी त्यांचा दिनांक २५.०४.१९८५ रोजी मौजे सावळदबारा येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की गीता नामदेव इंगळे, यांचा दिनांक २५.०४.१९८५ रोजी मौजे सावळदबारा येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

---

जा.क्र .२०२४/विधी/ज.मृ. आदेश/प्र.क्र.२९८९/कावी-३१२७ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-२९.०८.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :- सना अंजुम इस्माईल पठाण, वय-२६ वर्ष, व्यवसाय- घरकाम, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी सना अंजुम इस्माईल पठाण, रा. सिल्लोड ता.सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक २८.०६.१९९८, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सना अंजुम इस्माईल पठाण, रा. सिल्लोड ता.सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक २८.०६.१९९८, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असल्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन - प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर / आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

---

जा.क्र .२०२४/विधी/ज.मृ. आदेश/प्र.क्र.२९८८/कावि-३१२६ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-१२.०९.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :- शेख शहेबाज शेख सलीम, वय-३० वर्ष, व्यवसाय- घरकाम, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म - मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी शेख शहेबाज शेख सलीम, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक १४.०७.१९९४, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, शेख शहेबाज शेख सलीम, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक १४.०७.१९९४, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असल्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झ गालेपासून ३० दिवसाच्या आत उजर / आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

---

जा.क्र .२०२४/विधी/ज.मृ. आदेश/प्र.क्र.२९८७/कावी-३१२५ १ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-१२.०९.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :- शबानाबी शेख अमिनोद्दीन, वय-४५वर्ष, व्यवसाय- घरकाम रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर. विरूध्द

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी सिल्लोड नगर परिषद सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी शबानाबी शेख अमिनोद्दीन, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०१.१९७९, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, शबानाबी शेख अमिनोद्दीन, रा. सिल्लोड ता. सिल्लोड, जि.छ.संभाजीनगर, यांचा दिनांक ०१.०१.१९७९, रोजी मौजे सिल्लोड येथे जन्म झाला असल्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर / आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर /आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

---

जा.क्र .२०२४/विधी/ज.मृ. आदेश/प्र.क्र.३१३५/कावि-३२४९ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-१२.०९.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :- हाजराबी अब्बास कलेसे, वय-४८ वर्ष व्यवसाय- घरकाम, रा.नानेगांव ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय नानेगांव, ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म - मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी हाजराबी अब्बास कलेसे रा.नानेगांव ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा दिनांक ०७.०५.१९७६ रोजी मौजे नानेगांव येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, हाजराबी अब्बास कलेसे, यांचा दिनांक ०७.०५.१९७६ रोजी मौजे नानेगांव येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भारत केंद्रित परराष्ट्र धोरण आणि क्वाड

विश्लेषण

पंकज जगन्नाथ जयस्वाल

२०१४ पूर्वीचे परराष्ट्र धोरण : भारताचे परराष्ट्र धोरण अनेक दशके अस्थिर राहिले. त्यावर महासत्ता, पाश्चिमात्य देश आणि इस्लामिक जगताचा अधिक प्रभाव होता. दुबळ्या आणि गुलामगिरीच्या मानसिकतेचा फायदा पाकिस्तानसारख्या देशालाही झाला. आंतरराष्ट्रीय दबावाला बळी पडण्याची मानसिकता सामान्य होती आणि आंतरराष्ट्रीय समुदायाला खूश ठेवण्यासाठी भारतीय मूल्यांशी तडजोड करणे हा परराष्ट्र धोरणाचा भाग होता. आत्मसन्मान गमावणे, चीनला जागतिक बाजारपेठेत झपाट्याने वाढ होऊ देणे, वाढती बेरोजगारी अशा धोरणाचा परिणाम म्हणून आपण आर्थिकदृष्ट्या मागास झालो आहोत. २०१४ पूर्वी थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) समान पातळीवर होत नव्हती, परंतु बहुराष्ट्रीय कंपन्या आणि त्यांचा मूळ देश या दोघांना जास्त फायदा झाला. दुसरीकडे इतर देशांमध्ये एफडीआय नेहमीच यजमान देश किंवा समान स्तरावर होते. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताची प्रतिष्ठा कमी होती, हे स्पष्ट आहे. भारताने उपस्थित केलेल्या अनेक मुद्यांना किंवा भारताशी संबंधित मुद्यांना अनेक देशांनी समर्थन दिले नाही; त्याऐवजी संयुक्त राष्ट्रांच्या असेंब्लीमध्ये आणि इतर व्यासपीठांवर देशाची प्रतिमा खराब करण्यासाठी अंतर्गत समस्यांवर प्रकाश टाकला जायचा. अनेक अंतर्गत समस्यांमध्ये अमेरिकन सरकारचा हस्तक्षेप हा परराष्ट्र धोरण आणि आर्थिक निर्णयांमध्ये मोठा अडथळा होता. याआधी परराष्ट्र धोरणात काही चांगले मुद्दे होते, पण ते आपल्या बाजूने नव्हते किंवा संतुलित कृती नव्हती. आपण भारतासोबत भेदभाव अनेक प्रकरणांमध्ये स्पष्टपणे पाहत होतो; विशेषतः भारतात लसीची उशिरा उपलब्धता, तंत्रज्ञान हस्तांतरण उशिरा किंवा त्याची उपयोगिता संपल्यावर तसेच भारताला अप्रचलित तंत्रज्ञान खरेदी करण्यासाठी कर्ज घेण्यास भाग पाडले जात होते.

**२०१४ नंतर** : २०१४ पासून परिस्थिती बदलली आहे, जेव्हा सरकारने परराष्ट्र धोरणासाठी नवीन दृष्टिकोन स्वीकारला, प्रत्येक देश, लहान किंवा मोठा, महत्त्वाचा आहे हे ओळखून त्यानुसार कार्य सुरू केले. पहिली पायरी म्हणजे सार्क देशांना शपथविधी सोहळ्यासाठी निमंत्रित करणे, त्यानंतर पंतप्रधानांचा पहिला परदेश दौरा नेपाळला, श्रीमंत किंवा संपन्न राष्ट्राचा नाही. भारताच्या मजबूत परराष्ट्र धोरणाच्या बाजूने मानसिकता आणि निर्णयांमध्ये झालेला बदल आपण सहजपणे बघू शकतो. भारताचे स्वावलंबन आणि स्थानिक प्रतिभा, कौशल्ये आणि ज्ञान ही घातांकीय वाढीची गुरुकिल्ली असेल. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी रायसीना डायलॉग २०२२ मध्ये सांगितल्याप्रमाणे परराष्ट्र धोरणातील बदल हा केवळ क्षमतेतच नव्हे तर मानसिकतेत आणि मोठ्या जबाबदारीचा स्वीकारण्यात स्वावलंबी असायला हवा. यासाठी नवीन भारताबद्दल विमर्श आवश्यक आहे. आपल्या विचारांसह जगाला योग्य मार्गाने एकत्र करणे हे तीन मुद्यांपैकी एक आहे; ज्यावर आपण आपले प्रयत्न केंद्रित केले पाहिजेत. दुसरी पायरी म्हणजे ऑपरेशनल रणनीती आयोजित करणे तसेच त्यास सामोरे जाण्यासाठी क्षमता आणि विमर्श विकसित करणे. व्यावहारिक संबंध त्या देशाच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक हितसंबंधांना धक्का न लावता जगाशी व्यवहार करण्याच्या अधिक संतुलित आणि भारत प्रथम दृष्टिकोनामुळे चीनकडून बहुतेक गोष्टी आयात करण्याची मानसिकता बदलली आहे.

पंतप्रधान मोदींची 'प्रभावी बहुपक्षीयता' ही संकल्पना, जी अनेक देशांचे वास्तव ओळखते व आदर करते आणि काही निवडक देशांनी प्रभुत्व न गाजवता जास्तीत जास्त देशांच्या सूचनांचा व विचारांचा आदर केला पाहिजे, तरच जागतिक अजेंडा खऱ्या अर्थाने आकाराला येईल. हे धोरण कोणत्याही एक किंवा दोन शक्तींचे वर्चस्व कमकुवत करते. या आधारावर भारताने धोरणात्मक पक्षाघातामुळे कमी लक्ष वेधणाऱ्या देशांशी संबंध विकसित करण्यास सुरुवात



केली. २०१५ मध्ये मंगोलियाला भेट देणारे ते पहिले पंतप्रधान बनले आणि सर्वसमावेशक भागीदारी धोरणात्मक भागीदारीत श्रेणी सुधारित करण्यात आली. मोदींनी २०१६ मध्ये व्हिएतनामसोबतच्या संबंधांना सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीचा दर्जा दिला. मोदींनी २०१७ मध्ये भारतीय पंतप्रधानांनी इस्रायलला पहिली भेट दिली; ज्या दरम्यान संबंध धोरणात्मक पातळीवर उंचावले गेले. १९८६ पासून कॅनडा आणि संयुक्त अरब अमिरातीला भेट देणारे ते पहिले पंतप्रधान होते आणि युद्धकाळात युक्रेनची भेट. भारत आपल्या प्रतिस्पर्ध्यांशी असलेल्या संबंधांवर कोणतेही वैचारिक व आर्थिक नियंत्रण सोडण्यास तयार नाही. दिल्ली मॉस्कोला अमेरिकेशी भारताच्या संबंधांची व्याख्या करू देणार नाही आणि वॉशिंग्टनला रशियाशी भारताच्या संबंधांचे स्वरूप मर्यादित करू देणार नाही. असे धोरण अगोदर होते का तर नाही. यापूर्वी मॉस्को आणि बीजिंगच्या संवेदना दुखावण्याच्या भीतीने भारत सरकार अनेकदा अमेरिका आणि युरोपशी आपले संबंध मर्यादित करण्याचा मोह झाला होता. हे एकतर वैचारिक कारणांमुळे किंवा रशिया आणि चीनच्या संबंधांमध्ये नकारात्मक परिणामांच्या भीतीने केले गेले होते. मोदी सरकार बचावात्मक आणि राजकीय संबंध आणि त्याच्या भूमिकेच्या पलीकडे गेले आहे. राजकीय फायद्यापेक्षा राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिल्याने भारतासाठी महत्त्वपूर्ण धोरणात्मक फायदे मिळाले आहेत.

**गुंतवणूक आणि सुरक्षा** : अलिकडच्या वर्षांत वैविध्यपूर्ण राजनयिक भेटी दिखाव्यासाठी नव्हता, तर परराष्ट्र धोरणाचा राष्ट्रीय विकास आणि पुनरुत्थान यांच्याशी एकरूप करण्याच्या सुनियोजित धोरणाचा भाग होता. भारताचे जागतिक प्रोफाईल उंचावण्याव्यतिरिक्त या व्यापक राजनैतिक सहभागामुळे मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत, स्किल इंडिया, डिजिटल इंडिया, नमामि गंगे आणि स्टार्ट-अप इंडिया यासारख्या प्रमुख राष्ट्रीय पुनर्जागरण उपक्रमांसाठी विदेशी सहयोग आणि आर्थिक सहाय्य मिळाले आहे. बाह्य भागीदारांसोबत भारताच्या वाढत्या संलग्नतेमुळे लोकांना परकीय गुंतवणूक आणि तंत्रज्ञान भागीदारीद्वारे मूर्त फायदे मिळाले आहेत, परिणामी कारखान्यांची स्थापना आणि नोकऱ्यांची निर्मिती झाली आहे. अमेरिका, फ्रान्स आणि डेन्मार्कसारख्या देशांसोबत हरित ऊर्जा भागीदारी स्थापन केल्याने भारतीय नागरिकांसाठी स्वच्छ, कमी कार्बनयुक्त जीवनाचा पाया घातला गेला आहे.

मोदींच्या परराष्ट्र धोरणाचे यश त्यांनी देशाच्या कट्टरपंथीयांना, चीन आणि पाकिस्तानला कसे हाताळले यावरून दिसून येते. सर्जिकल स्ट्राईकने मोदी सरकारने पाकिस्तानचा आण्विक धोका संपवला आणि देशाच्या सुरक्षेचे हित पूर्ववत केले. पाकिस्तानातून निर्माण होणाऱ्या दहशतवादाच्या धोक्याचा मुकाबला करणे असो किंवा संघर्ष क्षेत्रात अडकलेल्या आपल्या नागरिकांना वाचवणे, चिनी आक्रमणाचा प्रतिकार करणे किंवा युक्रेनमधील रशियाच्या युद्धानंतरच्या गुंतागुंतीच्या जागतिक संकटाचा सामना करणे असो, मोदी सरकारचे परराष्ट्र धोरण राष्ट्र प्रथम या तत्त्वावर कार्य करत आहे.

**क्वाड** : क्वाडमध्ये भारताचा सहभाग प्रादेशिक सहकार्यासाठी आणि चीनला सामरिक स्वायत्तता टिकवून ठेवण्याची परवानगी देऊन त्याच्याशी संतुलन साधण्यासाठी एक धोरणात्मक व्यासपीठ प्रदान करतो. समस्या-आधारित सरेखनाला प्राधान्य देऊन देशांतर्गत क्षमता मजबूत करून आणि क्वाडचा अजेंडा आक्रमकपणे परिभाषित करून भारत आपल्या भौगोलिक राजकीय हितसंबंधांवर प्रभावीपणे नेव्हिगेट करू शकतो. वैविध्यपूर्ण संबंध आणि निवडक सहकार्यामुळे भारताचे सार्वभौमत्व बळकट होईल आणि क्वाड उपक्रमांचा फायदा होईल.

**क्वाड इन्व्हेस्टर्स नेटवर्क (क्विन)** : आम्ही क्वाड इन्व्हेस्टर्स नेटवर्क (क्विन) सारख्या खाजगी क्षेत्रातील प्रयत्नांना समर्थन देतो, जे स्वच्छ ऊर्जा, अर्धसंवाहक, आवश्यक खनिजे आणि क्वांटम यांसारख्या धोरणात्मक तंत्रज्ञानामध्ये गुंतवणुकीला प्रोत्साहन देते. क्विन पुरवठा साखळी बळकट करण्यासाठी, संयुक्त संशोधन आणि विकास वाढीसाठी, नवीन नवकल्पनांचे व्यावसायिकीकरण करण्यासाठी आणि आमच्या भविष्यातील रोजगारांमध्ये अनेक वेगवेगळ्या प्रकारांची गुंतवणूक करत आहे. क्वाडमध्ये भारताच्या सहभागाचा द्विपक्षीय संबंध आणि धोरणात्मक सुरक्षा चर्चेवर महत्त्वपूर्ण परिणाम झाला आहे. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी सांगितले की, भारताचा सहभाग स्वतंत्र आणि मुक्त इंडो-पॅसिफिक, धोरणात्मक स्वायत्तता आणि प्रमुख लोकशाहींसोबत मजबूत भागीदारी याविषयीची वचनबद्धता दर्शवितो. क्वाडने भारताचे युनायटेड स्टेट्स, जपान आणि ऑस्ट्रेलियाशी धोरणात्मक संबंध वाढवले आहेत तसेच प्रादेशिक आणि जागतिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी एक मंच म्हणून काम केले आहे. चतुर्भुज आणि मोठ्या इंडो-पॅसिफिक देशातील बदलत्या गतिशील धोरणांवर भारताचा मोठा प्रभाव राहील. भारत अशा गुंतागुंतींच्या वातावरणात मार्गक्रमण करत असताना क्वाडमधील सहभाग हा त्याच्या परराष्ट्र धोरणाचा आणि राष्ट्रीय सुरक्षा फ्रेमवर्कचा महत्त्वाचा भाग राहील. हा नवा भारत सर्व राष्ट्रांना समान मानतो, मग तो महासत्ता असो, श्रीमंत असो किंवा गरीब असो. सनातन धर्माच्या आदर्शांवर आधारित नवीन भारताचे उद्दिष्ट सौहार्द, शांतता, सर्वसमावेशक वाढ आणि पर्यावरण संरक्षण हे आहे. भारतीय तरुणांनी ज्ञान आणि कौशल्य आत्मसात करून स्वत:वर विश्वास ठेवला पाहिजे. कारण स्वावलंबी भारताला सर्व क्षेत्रात भरभराटीच्या अनेक संधी असतील.

७८७५२१२१६१

# काश्मीरमध्ये 'जम्मू'रियत!

दखल

आरिफ शेख

अटलबिहारी वाजपेयी यांनी जम्मू-काश्मीरसाठी जम्मूरियत, काश्मिरियत आणि इन्सानियतची त्रिसूत्री दिली होती. तब्बल दहा वर्षांनंतर जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या पहिल्या दोन टप्प्यातील मतदानात जम्मूरियत प्रत्ययाला आली. सत्ता मिळवण्यासाठी शह-काटशह, व्यूहनीती झाली असली, तरी काश्मीरमध्ये लोकशाही रुजली, रुळली असल्याचे जगाला दाखवून देण्यात भारत यशस्वी झाला आहे.

काश्मीरमध्ये दहा वर्षांपूर्वी पीडीपी आणि भाजपाचे सरकार सत्तेवर आले होते. भाजपाने पीडीपीचा पाठिंबा काढून घेतल्यानंतर ते सरकार कोसळले. नंतर काश्मीरचा विशेष राज्याचा दर्जा काढून घेण्यात आला. या काळात फक्त लोकसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या; परंतु जम्मू-काश्मीरमध्ये दहा वर्षांनंतर प्रथमच विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. दहा वर्षांपूर्वी झालेल्या त्या निवडणुकीच्या तुलनेत पहिल्या दोन टप्प्यांमध्ये जास्त मतदान झाले. वयोवृद्ध, तरुणांनी रांगेत उभे राहून मतदानाचा हक्क बजावला. जम्मू-काश्मीरचे दोन प्रांतांत विभाजन झाल्यानंतरची ही पहिलीच निवडणूक. लडाख प्रांत केंद्रशासित करण्यात आला आहे. जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा नाही, तसेच दिल्लीसारखे अनेक अधिकार काढून घेण्यात आले असले, तरी राजकीय पक्ष आणि मतदारांमध्ये उत्साह कायम होता. पहिल्या दोन टप्प्यांमधील मतदानानंतर आता राजकीय अंदाज बांधायला सुरुवात झाली असली, तरी तो या लेखाचा विषय नाही. अटलबिहारी वाजपेयी यांच्या तीन सिद्धांतांपैकी एका सिद्धांतावर काश्मीरची वाटचाल सुरू आहे, हे यानिमित्ताने सिद्ध झाले. काश्मीरमध्ये काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सची युती आहे. पीडीपी, भाजपा, पीपल्स कॉन्फरन्स आदी पक्षही निवडणुकीच्या रिंगणात आहेत. गेल्या ३६ वर्षांपासून काश्मीरमधील मूळ गावापासून दूर वनवासात जगणारे विस्थापित काश्मिरी पंडित मातृभूमीत परतण्याचे स्वप्न पूर्ण होईल, या आशेने मतदान करत आहेत. आपली तरुण पिढी आपल्या मुळांशी जोडलेली राहावी, यासाठी पुनर्वसन व्हायला हवे अशी त्यांची अपेक्षा आहे. त्यामुळेच काश्मीरमध्ये जोशात मतदान प्रक्रिया पार पडत असून सरकार ही जबाबदारी पेलण्याच्या कामी यशस्वी ठरले आहे.

पनुन काश्मीर आणि इतर संघटनांनी केलेल्या मतदानावरच्या बहिष्काराच्या आवाहनाचा फारसा परिणाम काश्मीरमध्ये झालेला दिसत नाही. येथील ७० वर्षीय अवतार कृष्णा म्हणतात, काश्मीरमधील स्वत:च्या मातृभूमीवर हक्क मिळावा, हीच आमची मागणी आहे; ज्यासाठी आम्ही वर्षानुवर्षे सातत्याने मतदान करीत आहोत. या मागणीकडे दुर्लक्ष होत राहणे निराशाजनक आहे. दोन दशकांपूर्वी जाहीर केलेली वापसी आणि पुनर्वसनाबाबतची सरकारी धोरणे कधीही प्रभावीपणे राबवली गेली नाहीत. दरम्यान, प्रत्येक लहान-मोठी निवडणूक गांभीर्याने घेत आपली सर्व ताकद पणाला लावणारा भाजपा निवडणूक जिंकण्याची सर्वात मोठी यंत्रणा कामाला लावतो. अशा परिस्थितीमध्ये भाजपाने या विधानसभा निवडणुकीत पूर्ण यंत्रणा उतरवली नाही, अशी चर्चा आहे. खोऱ्यातील २८ जागा भाजपाने सोडल्या. याबाबत आता तर्क लढवले जात आहेत. भाजपा गंभीर नाही की त्याची ही रणनीती असून खोऱ्यात काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सच्या विरोधातील मतविभागणी टाळून आपले इप्सित साध्य करण्याचा प्रयत्न आहे, हे लवकरच कळणार आहे.

जम्मू-काश्मीरकडे केंद्र सरकारचे विशेष लक्ष आहे. कलम ३७० हटवणे असो, जम्मू-काश्मीर राज्याची पुनर्रचना असो किंवा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर जम्मू-काश्मीरची प्रतिमा सुधारणे असो; मोदी सरकारने खूप मेहनत घेतली आहे; मात्र निवडणूक लढवण्याची वेळ आली, तेव्हा भाजपाने ९० पैकी केवळ ६२ जागांवर उमेदवार उभे केले. खोऱ्यात कमी जागांवर निवडणूक लढवली. जम्मू विभागातील सर्व ४३ जागांवर भाजपा निवडणूक लढवत असला, तरी खोऱ्यातील ४७ पैकी केवळ १९ जागांवरच निवडणूक लढवत आहे. खोऱ्यात २८ जागा रिकाम्या ठेवल्या आहेत. भाजपाने काश्मीर खोऱ्यामध्ये उमेदवार न देण्याचे कारण काय? दोन मुद्दे तपासले असता या प्रश्नाचे उत्तर सापडते. पहिले म्हणजे भाजपाचे राजकारण आणि दुसरे म्हणजे खोऱ्यातील लोकसंख्या. एका विशिष्ट धर्माचे राजकारण करत असल्याचा आरोप भाजपावर नेहमीच केला जातो, तर खोऱ्याची लोकसंख्या भाजपाने तयार केलेल्या कथनापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. एका आकडेवारीनुसार, काश्मीर खोऱ्यातील सुमारे ९७ टक्के लोकसंख्या मुस्लिम आहे. जम्मू आणि काश्मीर दोन प्रदेशांमध्ये विभागले गेले आहे. भाजपाला काश्मीर खोऱ्यात मते मिळणे फार कठीण आहे तर हिंदू, शीख आणि बौद्ध मिळून लोकसंख्या तीन टक्क्यांहून कमी आहे. अशा स्थितीत खोऱ्यात भाजपाला मते मिळवणे अवघड आहे आणि हे पक्षाला चांगलेच ठाऊक आहे. त्यामुळेच नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीतही खोऱ्यातील तीन लोकसभा जागांपैकी एकाही जागेवर भाजपाने उमेदवार उभा केला नाही.

जम्मूमध्ये भाजपाने लोकसभेच्या दोन्ही जागांवर उमेदवार उभे केले. विजयही नोंदवला. त्यामुळे भाजपाचे संपूर्ण लक्ष केवळ जम्मूवर आहे. जम्मू-काश्मीरमध्ये सत्ता मिळवण्यासाठी कोणत्याही पक्षाला ४६ जागांची आवश्यकता आहे. त्यामुळे भाजपाने जम्मूवर आपले लक्ष केंद्रित केले आहे, तर खोऱ्यातून भाजपा अपक्ष आणि पीडीपी-नॅशनल कॉन्फरन्सच्या बंडखोरांचा पाठिंबा मिळवण्याची अपेक्षा आहे. अभियंता रशीद यांना भाजपची बी टीम म्हटले जाते. फारुख अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती हे वारंवार सांगत आहेत की, भाजपा त्यांच्या बंडखोरांना प्रोत्साहन देत आहे आणि भाजपाला पुढचा मुख्यमंत्री जम्मूचा आणि हिंदू असावा असे वाटते. अनंतनागमधील भाजपाचे उमेदवार रफिक वानी यांनी इंजिनीयर रशीद, सज्जाद लोन, अल्ताफ बुखारी आणि गुलाम नबी आझाद यांच्यासारख्या नेत्यांना स्वत:चे म्हणून घोषित केले होते. अब्दुल्ला आणि मेहबूबा हे दोघेही इंजिनीअर रशीदच्या जामिनावर नाराज आहेत, कारण त्यांना मिळणारी मते नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेसची किंवा पीडीपीची असतील. विजय असो वा पराजय; पक्षाने उमेदवार उभे केल्यासच खोऱ्यात जनाधार वाढेल, अशी भाजपाच्या जुन्या कार्यकर्त्यांची इच्छा होती. कलम ३७० हटवल्यानंतर आणि जम्मू-काश्मीरमधील परिस्थिती बदलल्यानंतर भाजपाला आपल्या जागा वाढण्याची अपेक्षा आहे, पण ती फक्त जम्मू भागात आहे. त्यामुळे जम्मूमध्ये ४३ पैकी ३२-३५ जागा मिळाल्या, तरी भाजपाचा खोऱ्यातील अपक्षांच्या मदतीने सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न असेल.

पहिल्या दोन टप्प्यांमधील मतदानाच्या टक्केवारीने जम्मू-काश्मीरमधील जनतेला या निवडणुकीत किती उत्सुकता आहे, हे दिसून आले. तुरुंगातून सुटका होऊन जमातशी युती केल्यामुळे इंजिनीयर रशीद यांच्यावर भाजपाचे प्रॉक्सी समर्थक असल्याचा आरोप होत आहे. रशीद यांच्या पक्षाला निधी कुठून दिला जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. इंजिनीअर रशीद यांचा पक्ष आणि जमात-ए-इस्लामीयांची युती ही प्रत्यक्षात काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपी विरुद्धची आघाडी असून त्यांची व्होट बँक फोडण्याचा प्रयत्न असू शकतो. स्थापनेपासून पीडीपी काश्मीरमध्ये फुटीरतावाद्यांच्या सहानुभूतीचे राजकारण करत आहे. रशीद आणि जमातदेखील त्याच स्वरात बोलतात. जमात-ए-इस्लामी आणि रशीद यांचे विचार सारखेच आहेत. जमात-ए-इस्लामीचे नेते १९८७ पासून सातत्याने निवडणुकीवर बहिष्कार घालत होते; मात्र या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत जमातच्या अनेक नेत्यांनी मतदान करून लोकांना आश्चर्याचा धक्का दिला. जमात-ए-इस्लामी ही धार्मिक-राजकीय संघटना आहे. या संघटनेचा काश्मीरमधील सोपोर, कुलगाम, शोपियान आणि पुलवामा येथे चांगला दबदबा आहे. काश्मीरच्या मुद्यावर भारत, पाकिस्तान आणि काश्मीरमधील जनतेने एकमेकांशी चर्चा करून तोडगा काढावा, असे जमातचे म्हणणे आहे.

२०१९ मध्ये केंद्र सरकारने जमात-ए-इस्लामीवर दहशतवादी निधी आणि देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या आरोपावरून पाच वर्षांसाठी बंदी घातली होती. गेल्या तीन वर्षांमध्ये सरकारने जमातच्या अनेक मालमत्ता जप्त केल्या आहेत. यावर्षी फेब्रुवारीमध्ये पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर सरकारने जमात-ए-इस्लामीवरील बंदी पुन्हा पाच वर्षांसाठी वाढवली. या काळात जमातचे अनेक नेते आणि कार्यकर्ते नजरकैदेत आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी जमातने आपल्या संघटनेवरील बंदी उठवावी, या अटीवर सरकारकडे निवडणुकीत भाग घेण्याची इच्छा व्यक्त केली होती; मात्र सरकारने बंदी उठवली नाही. या निर्बंधामुळे जमात-ए-इस्लामीला थेट निवडणूक लढवता आली नाही. त्यामुळे पक्षाने अपक्ष उमेदवारांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. जमातच्या नेत्यांचा दावा आहे की, २०१९ नंतर सरकारने त्यांच्या संघटनेवर आणि त्यांच्याशी संबंधित लोकांवर आपली पकड घट्ट केल्यामुळे पक्षाच्या समस्या वाढल्या. त्यामुळे ते लोकशाही पद्धतीने लढण्याचा प्रयत्न करत आहेत. वाद-विवाद, चर्चा काहीही असली, तरी या निवडणुकीच्या निमित्ताने लोकशाही प्रक्रियेला अप्रत्यक्ष बळकट करण्यासाठी सर्वांचा हातभार लागतो आहे, हे महत्त्वाचे.

# रविवारची पत्रे

## विरोधी पक्षांची भूमिका

'निंदकाचे घर असावे शेजारी' अशी एक प्रचलित म्हण आहे. लोकशाहीत सुदृढ विरोधी पक्ष असावा, अशी व्यवस्था भारतीय संविधानाने करून ठेवली आहे. गत १० वर्षांपासून ही भूमिका आधी ७० वर्षे सत्ता भोगलेली काँग्रेस आता वठवित आहे. केवळ आणि केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदींना बदनाम करण्यासाठी सर्व हातखंडे काँग्रेस अंमलात आणण्यासाठी प्रयत्नशील आहे, हे खेदाने नमूद करावेसे वाटते. मोदी सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांकडे गणपती पूजन करायला जातात, यात वावगे काय होते? त्याचे राजकारण करण्याची गरज नव्हती. तो त्यांचा व्यक्तिगत प्रश्न होता; पण वातावरण असे निर्माण करण्याचा प्रयत्न झाला; जणू न्याय व्यवस्था मोदींनी आपल्या खिशात घातली. लोकसभा निवडणुकीच्या वेळी असाच खोटा प्रचार केला गेला. संविधानात बदल करण्याचा इरादा ना भारतीय जनता पक्षाचा होता ना व्यक्तिशः नरेंद्र मोदींचा. पण भाजपा परत सत्तेत आला तर संविधान बदलणार. त्याकरिताच त्यांना ४०० जागा हव्या आहेत, असा प्रचार करण्यात आला. तसाच चुकीचा प्रचार आरक्षणाबाबत केला गेला. वास्तविकता तर ही आहे की, भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू हेच आरक्षणविरोधी होते. काँग्रेस नेते बाबू जगजीवनराम यांनी आरक्षण १० वर्षांकरिता लागू करावे, अशी शिफारस केली होती. पण आरक्षण अजूनही सुरू आहे. आता तर प्रत्येक जाती-जमातीला आरक्षण हवे आहे. मराठा आंदोलन त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. 'एक देश एक निवडणूक' हा विषय अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. त्याला आता केंद्रीय मंत्रिमंडळाने स्वीकृती दिली. याही निर्णयाला काँग्रेसचा विरोध आहे. काय तर म्हणे हा निर्णय मोदी घेत आहेत. कारण त्यांना संपूर्ण देशाचा कंट्रोल आपल्या हातात ठेवायचा आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील, ज्यात केवळ विरोधासाठी विरोध काँग्रेस करीत आहे. विरोधी पक्षाची भूमिका सकारात्मक असावी. देशाच्या सर्वांगीण विकासात त्यांनी हातभार लावावा. विरोध जरूर करावा, जर सरकारचा निर्णय देशविरोधी असेल तर. आज देशासमोर अनेक प्रश्न आहेत. आतंकवाद, भ्रष्टाचार, बेरोजगारी, गरिबी, वाढती महागाई, आंतरिक आणि बाह्य सुरक्षा आदी विषयांवर विरोधी पक्ष आपली भूमिका मांडू शकतो. त्यासाठी लोकसभा, राज्यसभा आहे. त्या ठिकाणी साधकबाधक चर्चा होऊ शकते. पण ते न करता सभागृहात गोंधळ करायचा, सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यास भाग पाडावे, हे जिवंत लोकशाहीचे लक्षण नव्हे. सत्ता येत राहील, जात राहील; पण देश सर्वतोपरी असला पाहिजे. आज भारत देश प्रगतिपथावर आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताने मानाचे स्थान प्राप्त केले आहे. एकीकडे शेजारी देश अस्तित्वाची लढाई लढत आहे तर भारत जागतिक स्तरावर मार्गदर्शकाची भूमिका वठवत आहे. अशा परिस्थितीत देशात आणि परदेशात जाऊन आपल्याच देशाची बदनामी करणे योग्य आहे का? याचा विचार काँग्रेसने केला पाहिजे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला ५४२ पैकी ९९ जागा जिंकता आल्यात. सर्व विरोधी पक्ष एकत्र आलेत. पण सर्व मिळून भाजपाला जेवढ्या जागा मिळाल्यात तेवढ्याही जागा मिळविता आल्या नाहीत, हे सत्य स्वीकारण्याची मानसिकता विरोधकांना करावी लागेल. तेव्हाच लोकसभा निवडणूक कुणी जिंकली आणि कोण हरले, याचे समर्पक उत्तर मिळू शकेल.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

## विभाजनाचे गलिच्छ षडयंत्र

१९०५ ची बंगालची फाळणी आणि त्यानंतर सतत या राष्ट्राला या ना त्या कारणाने विभाजनाचा सामना करावा लागला. उत्तुंग व्यक्तिमत्त्व, जिज्ञासू व अभ्यासू असे नेतेगण या राष्ट्राला लाभले असताना तेसुद्धा या विभाजनकारी नीतीचे समर्थक झाले असल्याचे दिसून येते किंवा त्यांनी यापासून स्वत:ला अलिप्त ठेवून मूकदर्शक राहणे पसंत केले. आपणा सर्वांना माहीत आहेच, बंगालची फाळणी अयशस्वी झाली असली, तरी या अखंड भारताचे धर्माच्या आधारावर दोन तुकडे हे झालेच. विडंबना अशी की जे नेते म्हणत होते की, देशाची फाळणी जर झाली तर ती माझ्या पार्थिव शरीरावर होईल; त्यांच्याच समर्थनाने या देशाचे विभाजन झाले. विभाजनाचे षडयंत्र एवढ्यावरच थांबले नाही; या संपूर्ण हिंदू समाजाला जातींमध्ये विभाजित करण्याचे षडयंत्र जे इंग्रजांनी १९०१ मध्ये सुरू केले; तेच षडयंत्र स्वातंत्र्यानंतर फक्त राजकारणासाठी व सत्तेच्या लालसेपोटी काही मंडळींनी सुरू ठेवले आहे. डॉ. हेडगेवारांनी देशाचे विभाजन होण्याआधीच भविष्यात उद्भवणाऱ्या परिस्थितींवर विचार मंथन सुरू केले होते; त्यातूनच संपूर्ण हिंदू समाज हा संघटित व्हावा या उद्देशाने रा. स्व. संघाची स्थापना केली. त्यांनी संपूर्ण हिंदू समाजापुढे एक विचार मांडला की, आपण स्वातंत्र्य तर मिळवून घेऊ; पण आपण पुन्हा पारतंत्र्यात जाणार नाही आणि स्वातंत्र्य आपल्याला टिकवता येईल, याची शाश्वती काय? तर, आपण गुलामच का झालो यावर संपूर्ण हिंदू समाजाने विचार करण्याची गरज आहे. आपल्या असे लक्षात येईल की, आपला इतका मोठा सनातन हिंदू समाज हा कधीच संघटित नव्हता. म्हणूनच आपण इतकी वर्षे गुलामगिरीत काढली आणि आजही परिस्थिती फारशी बदललेली दिसत नाही. त्याचे कारण म्हणजे आजही आम्ही गुलाम मानसिकतेतून आणि चाटूकार वृत्तीतून बाहेर आलेलो नाही. ते गर्वाने सांगतात की, ते मुसलमान आहेत; पण आम्ही आजही मी दलित, मी ओबीसी, मी आदिवासी, मी ब्राह्मण अशा जातींनी आपली ओळख करून देण्यात धन्यता मानतो. आपण कधी समग्र हिंदू म्हणून विचारच केला नाही. २०१४ नंतर या देशाचा सुवर्ण काळ सुरू झाला, असे वाटत होते. तसे प्रयत्नही झाले. हिंदू समाज संघटित व्हायला सुरुवात झाली. 'सबका साथ सबका विकास' हा विचार जातिगत राजकारणाच्या पलीकडे जाऊन मनामनांमध्ये घर करायला लागला. आता भारत पुन्हा सनातन होणार, विश्वगुरू होणार हे लक्षात येताच विभाजनकारी शक्ती जातिगत जनगणना नावाचं शस्त्र घेऊन मैदानात उतरल्या. २०२४ येता येता नेहमीप्रमाणे आपण पाहिलं हिंदू समाजाचं जे आजपर्यंत होत आलं तेच पुन्हा झालं. हिंदू हा विभाजनकारी शक्तींच्या आहारी गेला; त्याचा स्वार्थ मोठा झाला, जात महत्त्वाची वाटायला लागली, धर्म आणि देश गौण झाला. संपूर्ण विश्वाचं आमच्याकडे लक्ष लागलं आहे. संपूर्ण जगाला लक्षात यायला लागलं की भारतच एकमेव देश आहे ज्याच्याकडे प्रत्येक समस्येचे निराकरण करण्याची क्षमता आहे. पण सत्तेच्या लालसेपोटी अगदी समाजाला विघटित करण्याचे षडयंत्र भारतापासून ते विदेशी जमिनीवर जाऊन रचण्यापर्यंत विरोधक गेले, याचं आश्चर्य नाही, पण दु:ख आहे. आमच्या पूर्वजांनी आम्हाला हा देश सुजलाम् सुफलाम् करण्यासाठी दिलेला आहे. आता जर आम्ही फक्त तथाकथित स्व-स्वार्थासाठी देशाचे तुकडे होऊ दिले तर येणाऱ्या पिढ्या आम्हाला कधीच माफ करणार नाही. विभाजनाचे घाव कधीही न भरून निघणारे असतात; ते पिढ्यान्पिढ्या सलत राहतात. हे हिंदू समाजाने समजून घेतले पाहिजे.

**ॲड. वैभव शिपोरकर**/७२७६०७२७५६

## नवरात्री महोत्सवाचे महत्त्व



सनातन धर्म हा नेहमीच शक्तीचा उपासक राहिला आहे. वेदांमध्येही देवीची उपासना करताना तिला आदिमाया, आदिशक्ती, करुणेचा सागर असलेली वात्सल्यमयी, जगन्माता, चैतन्यशक्ती, आनंदमयी, जगदंबा अशा कित्येक नावांनी संबोधले आहे. देवीची मूळतत्त्व तम, रज, सत्त्व याप्रमाणे नवरात्रातील पहिले तीन दिवस तमोगुणानुसार महाकाली, मधले तीन दिवस रजोगुणानुसार महालक्ष्मी आणि शेवटचे तीन दिवस सत्त्वगुणानुसार महासरस्वती रूपात उपासना केली जाते. नवरात्रात घट बसवल्यावर रोज नवीन माळ बांधून, अखंड दिवा लावून पंचपक्वान्नाचा नैवेद्य करून पूजा-आरतीच्या माध्यमातून देवीची आराधना केली जाते. सार्वजनिक नवरात्र उत्सवाच्या वेळी २७ छिद्रांच्या मडक्यात दिवा लावून भोवती फेर धरून टिपऱ्यांच्या नादात गरबा नृत्य करून देवीचे सहस्रपटीने कार्यरत तत्त्व ग्रहण करण्याचा प्रयत्न केला जातो. आध्यात्मिकदृष्ट्या भगवंताने आमच्या देहरूपी मडक्यालादेखील ९ छिद्रे (९ गुणिले ३ = २७) देऊन मनरूपी दिवा लावून या जगात पाठविले आहे. नवविधा भक्तीच्या माध्यमातून अष्टांग साधना करून या जन्माचे कल्याण करणे हाच उद्देश आहे. पण आज समाज या सर्व उद्देशापासून भरकटत चालला आहे. गरबाच्या नावाने तरुण-तरुणी बीभत्स नृत्य करतात आणि चुकीच्या गोष्टींना, धर्मांतराला बळी पडतात. नऊ दिवसांच्या नऊ रंगांचे कपडे, साड्या आणि त्याला मॅच होणारे दागिने यांची जीवघेणी चढाओढ लागलेली दिसते. अशा प्रकारच्या भक्तीचे प्रदर्शन कुठेतरी थांबायला हवे. यासाठी धर्मशिक्षण अत्यंत आवश्यक आहे. खरं म्हणजे शृंगार करून देवीची उपासना करणं चुकीचे नाही. शास्त्राधार नसलेल्या गोष्टींच्या मागे धावन स्वत:चे नकसान करणे चकीचे आहे. नटन शृंगार करून ९ दिवसांच्या ९ रंगांचे अंगप्रदर्शन करणारे कपडे घालण्यापेक्षा आज आवश्यकता आहे ती देवीच्या १६ हातांमध्ये जे शस्त्र आहेत ते स्वसंरक्षणासाठी चालविणे, ज्युडो कराटे, लाठीकाठी तसेच अन्य शस्त्र चालवायला शिकले पाहिजे. स्त्रियांची आताची स्थिती पाहिली तर लव्ह जिहाद, सामूहिक बलात्कार, हत्या, छेड काढणे, फसवणूक, अपहरण अशा अनेक घटनांमध्ये सर्वच वयोगटातील महिला, मुलींना त्रास सहन करावा लागत आहे. काळाची आवश्यकता ओळखून तळागाळातील शहर, खेड्यापाड्यातील सर्वच महिलांना आपात्कालीन आणि आव्हानात्मक परिस्थितीला सामोरे जाऊन लढण्यासाठी सक्षम होणे अत्यंत आवश्यक आहे. या लढ्यात शारीरिक-मानसिक क्षमतेसोबत साधना करून अध्यात्माचे सामर्थ्य अंगी येणे महत्त्वाचे आहे. निडरता, निर्भयता हे दैवी गुण जेव्हा स्त्रियांमध्ये येतील तेव्हाच तिचे देवी संबोधन सार्थ ठरणार आहे.

**अंजली पाध्ये**/९९७५५३६९०६

## वारे स्मार्ट सिटी!

गेल्या १० वर्षांत भारताने बरीच प्रगती केली. केवळ शहरेच नव्हे तर खेड्यापाड्यांतदेखील सुधारणा झाल्या. याच धर्तीवर काही शहरं स्मार्ट सिटी करण्याचा निर्धार झाला. यात नागपूरचेही नाव आहे. त्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात कामे सुरू झाली. मात्र बऱ्याच ठिकाणी स्थानिक प्रशासनाचे पितळ उघडे पडल्याचे दिसून येते. खामला भागातील व्यंकटेशनगरचे नागरिक गेल्या नऊ महिन्यांपासून पिण्याच्या पाण्याच्या समस्येचा सामना करताहेत. जानेवारी महिन्यात पिण्याच्या पाण्यात ड्रेनेजचे पाणी मिसळत असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले. पाणी काळपट रंगाचे येत होते आणि त्याला दुर्गंधीही येत होती. अनेकदा तक्रारी केल्यावर मनपाने खोदकाम सुरू केले. नेमका दोष कुठे आहे, हे शोधून काढायला तब्बल २० दिवस लागले. त्यानंतर नवीन लाईन टाकण्याचा निर्णय झाला. मग काय शासनाच्या आवश्यक त्या परवानग्या आणि निधी मंजूर होऊन प्रत्यक्ष काम सुरू होऊन नळाला शुद्ध पाणी येण्यास तब्बल दोन महिन्यांहून अधिक काळ गेला. या दरम्यान नागरिकांनी बाहेरून पाणी विकत आणून तहान भागविली. तत्पूर्वी सगळ्यांच्या सम्पमध्ये घाण पाणी गेल्यामुळे नागरिकांनी खाजगी एजन्सीजकडून स्वखर्चाने टाक्या स्वच्छ करून घेतल्या. पुढे खोदलेले खड्डे बुजविण्यासाठी एक महिना गेला. बुजविलेले खड्डे वरकरणी जरी समतल दिसत असले, तरी ऑगस्ट महिन्यात त्यावरून ट्रक जाण्याचे निमित्त झाले आणि बुजविलेला खड्डा खचला. पुन्हा घाण पाणी. पुन्हा तक्रारी, पुन्हा खोदकाम. खड्डा खणून झाल्यावर लक्षात आले की, नवीन टाकलेल्या पाईपलाईनचे नटबोल्ट ढिले झाले होते. मग घाण पाणी येते कुठून तर फुटलेल्या चेंबरमधले पाणी ढिल्या झालेल्या नटबोल्टमधून आत शिरते. नागरिकांनी विनंती केली की, पहिले जी ड्रेनेजलाईन फुटली आहे ती दुरुस्त करा म्हणजे कायमस्वरूपी प्रश्न मिटेल. तर, अधिकारी म्हणाले, ते काम आमचं नाहीये. ते आरोग्य विभागाचे आहे, असे सांगून ढिले झालेले नटबोल्ट टाईट करून खड्डे बुजवून टाकले. नागरिकांनी पुन्हा एकदा सम्प आणि गच्चीवरील टाकी स्वखर्चाने साफ करून घेतली. पुन्हा आठच दिवसांनी तीच समस्या. पुन्हा फोनाफोनी केल्यावर माणसं आली. पुन्हा खड्डे खोदले. आज या गोष्टीला १८ दिवस होऊन गेले अद्याप समस्या जैसे थे आहे. अधिकारी म्हणाले, दुरुस्ती झाली, मात्र पाईपमधील आधीचे घाण पाणी सोडून द्यावे लागेल. त्याकरिता सतत दोन दिवस पाणी रस्त्यावर सोडून द्या. प्रश्न असा आहे की, दोन दिवस सतत पाणी रस्त्यावर सोडून देताना मीटर तर फिरणारच...! शासनाच्या भोंगळ कारभाराचा भुर्दंड नागरिकांना का? नागरिकांना रोज बाहेरून पाणी विकत घ्यावं लागतंय. मनपा नागरिकांकडून दरवर्षी कर घेते. मात्र देखभाल व दुरुस्ती करण्याची वेळ आली की प्रत्येक विभाग आपापली जबाबदारी झटकताना दिसतो. व्यंकटेशनगरचे नागरिक इतके वैतागले आहेत की, ते आता उपोषणाला बसण्याच्या तयारीत आहेत.

**मकरंद कुलकर्णी**/नागपूर

## अगं आई गं म्हणा!

हे शीर्षक वाचून वाचक दचकले असतील, काही हसतीलही. थोडा धीर धरा सगळे सांगतो. सध्या आपला देश पश्चिम बंगाल, महाराष्ट्र येथील दुर्दैवी माणुसकीला काळिमा फासणाऱ्या भीषण घटनांनी हादरून गेला असताना अमेरिकन शास्त्रज्ञांना जणू काही वरील घटनांवरून दुसरीकडे लक्ष वळविण्यासाठी एका वेगळ्याच प्रयोगाच्या चिंतेने ग्रासले आहे. विज्ञान प्रयोग शाळेतील 'क, ख' न समजण्याची मती तर त्यामुळे एकदमच गुंग झाली.

मूळ मुद्दा असा की, आईच्या गर्भात वाढणाऱ्या अर्भकाचे लिंग हे गुणसूत्र ठरवतात. स्त्रीच्या शरीरात दोन 'एक्स' गुणसूत्र व पुरुषाच्या शरीरात एक 'एक्स' आणि एक 'वाय' गुणसूत्र असतात. पुरुषाच्या जन्मास कारणीभूत असणारे 'वाय' गुणसूत्र आक्रस कमी वा लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. परंतु घाबरून 'अरे, बापरे!' म्हणू नका. थोडा धीर धरून 'अगं, आई ग!' म्हणू शकता. कारण, हजारो नव्हे, तर कित्येक लक्ष वर्षे 'वाय' गुणसूत्र कमी व्हायला लागतील. परंतु, एखाद्या वाचकाने अथवा जेमतेम साक्षर झालेल्या व्यक्तीने हे नीट समजून न घेता वाचले तर चांगलाच तमाशा वा गोंधळ निर्माण होईल. पुरुषांची मुलांची संख्या कमी झाली की, लग्नप्रसंगी मुलांचे व मुलांकडे मंडळीचे भाव चांगलेच वधारातील. मुलींकडील बापडे-बिचारे घाबरून चिंतातुर होतील, कपाळावरचा घाम पुसता-पुसता ते घाईस येतील. शिक्षकांचा बीपी कमी किंवा जास्त होईल. कित्येक जण हाय-हाय! करीत बसतील. नाही तरीच, हे बिलंदर शास्त्रज्ञ (लेकाचे) जगाची चिंता करता-करता उलट जगाची चिंता वाढवून जगाला घाबरून सोडतील. अशा शास्त्रज्ञांना कोणती शिक्षा द्यावी बरे! त्यांना त्यांच्याच प्रयोगाशाळेत बंद करून कित्येक दिवस उपाशी ठेवले पाहिजे. म्हणजे त्यांना 'दाल-आट्याचे भाव' कळतील. म्हणून वाचकहो! (विशेषतः मुलींच्या आई-वडिलांनो) तुम्ही बिलकुल घाबरू नका, चिंता करू नका. आणि पोटभर जेवा व भरल्या पोटाने अशा शास्त्रज्ञांना दोन-चार शिव्या हासडा. परंतु, कमी आवाजात वा मनातल्या मनात परंतु जरा जपून. कारण तुमच्या शिव्या कदाचित वॉशिंग्टन वा न्यूयॉर्कपर्यंत पोहोचू शकतात. आपल्या देशात देशद्रोही वा विदेशी हितचिंतक भारताची निंदा-नालस्ती करून इतर देशांचे गुणगान करणाऱ्यांची संख्या भरपूर व जागोजागी आहे.

**प्रा. नरेंद्र भुरे**/आकोट, जि. भंडारा

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आमदार महोदयांनी 'वक्फ'च्या मालकी हक्काबद्दल भूमिका स्पष्ट करावी-वरपूडकर

**परभणी,/प्रतिनिधी:** मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्याबद्दल रामगिरी महाराजांविरुध्द कठोर कारवाई करण्याची मागणी करतेवेळी स्थानिक आमदार डॉ. राहुल पाटील यांनी स्वतःच्या कार्यक्षेत्रात म्हणजे परभणीत राज्य वक्फ मंडळाने ६२१ मालमत्तांवर मालकी हक्क दाखवून त्याा हिंदु व मुस्लिम समाजाच्या मालमत्ताधारकांना बेदखल करीत कारवाईच्या नोटीसा बजावल्याबद्दल सोयीनुसार मौन बाळगण्याऐवजी आधी भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे नेते विजय वरपुडकर यांनी एका निवेदनाद्वारे केली.

परभणी शहरातील मध्यवस्तीतील सर्वे नंबर १ तीन एक्कर ३६ गुंठे, सर्वे नंबर-२ क्षेत्र चार एक्कर १६ गुंठे व सर्वे नंबर-३ क्षेत्र १ एक्कर ११ गुंठेची नोंद शासनाच्या राजपत्रात २ मे १९७४ हा क्रमांक क च्या अनक्रमांक १३ वर वक्फ म्हणून अधिसूचित करीत मालमत्ता वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ३६ अन्वये नोंद करीत वक्फ मालमत्तेची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात नोंद करीत जिल्हा वक्फ अधिकारी यांच्या अहवालानुसार आसूरखाना नाले हैदर मस्जिद-ए-महेताब मस्जिद-ए-महेताब अलि शाह ॲन्ड क्रबस्थान व नख्खार खाना बारादरी ता. जि. परभणी संबंधित वक्फ मिळकत सर्वे नंबर १, २ व ३ मध्ये अनाधिकृत ताबा करुन बसलेल्या, व्यवसाय करणाऱ्या ६२१ व्यक्तींविरुध्द वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५२-अ प्रमाणे कारवाई प्रस्तावित केली, असे वरपुडकर यांनी या निवेदनातून निदर्शनास आणून या मालमत्ताधारकांना १ ऑगस्ट व त्याा आधीच्या महिन्यातील तारखांन्वये नोटीसा बजावून फौजदारी कारवाईची धमकी दिली. त्याामुळे संबंधित मालमत्ताधारकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली. मालकी हक्का संबंधीची संपूर्ण कागदपत्रे असतांना व पिढ्यानपिढ्यापासून वास्तव्य असतांनासुध्दा या मालमत्ताधारकांच्या मालमत्तांवर औरंगाबादच्या राज्य वक्फ मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी जूनेद सय्यद यांनी नोटीसा बजावून केलेल्या खळबळजनक कृतीवर शहरवासीयांनी, विशेषतः स्थानिक आमदार म्हणून डॉ. पाटील यांनी तात्काळ निषेधाची प्रतिक्रिया व्यक्त करीत तीव्रपणे आवाज उठवून लेखी निवेदनाद्वारे त्याास स्थगिती मिळविणे गरजेचे होते. या मालमत्ता धारकात हिंदुबरोबर मुस्लिम समाजातील मालमत्ताधारकांचाही समावेश आहे. परंतु, स्वतःच्या या कार्यक्षेत्रातील शेकडो कुटूंबियांच्या मालमत्तांवर गंडांतर आले असतांनासुध्दा आमदार पाटील यांना या हिंदु व मुस्लिम समाजाच्या कुटूंबियांचा कळवळा का येवू नये? केवळ मुस्लिम समाजाच्या मतांच्या वोट बँकेवर डोळा ठेवून वक्फ बोर्डाच्या विरोधात चार ओळीच्या निषेधाचेसुध्दा निवेदन का काढता येवू नये? असा सवाल वरपुडकर यांनी केला.

परभणी शहरातील हा संवेदनशील विषय गाजत असतांना आमदार महोदयांनी मुस्लिम समाजाचे प्रेषित मोहम्मद पैगंबर साहेब यांच्याविषयी वक्तव्य करीत मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्याबद्दल व सामाजिक शांतता भंग केल्याबद्दल रामगिरी महाराज यांच्या विरोधात कठोर कारवाई करावी, अशा मागणीचे निवेदन मात्र मोठ्या तडकाफडकीने काढल्याबद्दल वरपुडकर यांनी आश्चर्य व्यक्त केले. यातून आमदार डॉ. पाटील यांची मुस्लिमधार्जिण्य भूमिका, वागण्यातील दुटप्पीपणा स्पष्ट होतो, अशी टिका करतेवेळी वरपुडकर यांनी केवळ हिंदुत्वाच्या मतावर दोनवेळा विधानसभेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या डॉ. पाटील यांनी या कृतीद्वारे हिंदुत्ववादी मतदारांचा विश्वासघात करीत गद्दारी केली आहे, अशी जहरी टिका केली.

परभणी मतदारसंघातील जागरुक हिंदुत्ववादी मतदार आमदार डॉ. पाटील यांच्या या दुहेरी व तुष्टीकरणाच्या धोरणाचा आगामी विधानसभा निवडणूकीतून निश्चित बदला घेतील, असा विश्वास वरपुडकर यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असणाऱ्या मालमत्ताधारकांवर आणलेल्या गंडांतराविरोधात आपण प्रखरपणे उभे राहु, संघर्ष करु व मालमत्ता धारकांना निश्चितच दिलासा मिळवून देवू, असा विश्वास वरपुडकर यांनी व्यक्त केला.

## संक्षिप्त वृत्त...

### अप्पाराव वावरे यांचे मोटारसायकल रॅलीव्दारे परभणीत जंगी स्वागत

**परभणी,/प्रतिनिधी-** युवासेनेच्या जिल्हाप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल आप्पाराव वावरे यांचे शनिवारी परभणीतून भव्य मोटारसायकल रॅलीद्वारे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

काही दिवसांपूर्वीच वावरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबईत शिवसेनेत प्रवेश केला. त्याा पाठोपाठ वावरे यांची युवा सेनेच्या जिल्हाप्रमुखपदी निवड करण्यात आली. या निवडीचे वावरे यांच्या समर्थकांनी जोरदार स्वागत केले. वावरे यांच्या निवडीबद्दल शनिवारी परभणीत भव्य मोटारसायकल रॅली काढून जल्लोष साजरा करण्यात आला. विसावा फाटा या ठिकाणी जेसीबीच्या सहाय्याने मोठा हार घालून कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले. जिंतूर रस्ता व वसमत रस्त्याावरील खानापूर फाट्यापर्यंत मोठी रॅली काढण्यात आली. या रॅली दरम्यान ठिकठिकाणी त्यांचे स्वागत करण्यात आले.

### बालकांनी लुटला आठवडी बाजाराचा आनंद मराठवाडा प्राथमिक शाळा : आनंददायी शनिवार उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी-** नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा प्राथमिक शाळेच्या इयत्ता तीसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी शनिवारी (दि.२८) 'आनंददायी शनिवार' या उपक्रमातून आठवडी बाजाराचा आनंद लुटला.

प्राथमिक शाळेच्या प्रांगणात या विद्यार्थ्यांनी आठवडी बाजाराचे हुबेहुब असे प्रत्याक्षचित्र उभे केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी फळ व पाले भाज्यांची ओळख, भाज्यांचा ताजेपणा, भाव, खरेदी-विक्रीचे व्यवहाराचा अनुभव घेतला. यावेळी अनेकांनी प्रश्न उपस्थित केले. त्याची उत्तरेही शोधली. या आगळ्यावेगळ्या उपक्रमातून हे विद्यार्थी दंग झाले, आनंदी झाले होते.

नूतन विद्या समितीचे सहसचिव तथा हायस्कूलचे प्राचार्य अनंत पांडे यांनी या उपक्रमाचे निरिक्षण केले. यावेळी मुख्याध्यापिका स्मिता ढगे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### मानवतमध्ये उद्या रक्तदान शिबिर

**परभणी,/प्रतिनिधी-** जागतिक रक्तदान दिनानिमित्त याही वर्षी १ ऑक्टोबर रोजी खंडोबा मंदिर मित्र मंडळ मानवतच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील रक्त तुटवडा, रुग्णांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी आणि सामाजिक बांधिलकी म्हणून या रक्तदान शिबिराचे आयोजन केलेले आहे. खंडोबा मंदिरात होणाऱ्या या रक्तदान शिबिराचे उद्घाटन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मानवतचे तहसीलदार पांडुरंग माचेवाड, सहा. पो.नि. संदीप बोरकर, मुख्याधिकारी कोमल सावरे यांची उपस्थिती राहणार आहे. या शिबिरामध्ये खंडोबा मित्र मंडळासह ओम भगवती मित्र मंडळ, श्री संत सावता माळी मित्र मंडळ, रामनगर मित्र मंडळ, मॉर्निंग बॉईज ग्रुप, आदिशक्ती मित्र मंडळ, मृत्युंजय प्रतिष्ठान, शिव मित्र मंडळ, आर्ट ऑफ लिविंग परिवार, मोरेश्वर मित्र मंडळ, जय अंबे ग्रुप, शिवनेरी मित्र मंडळ, राजपूत मित्र मंडळ, माय लाईफस्टाईल परिवार आदी मित्र मंडळाचे सदस्य या रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान करणार आहेत.

या रक्तदान शिबिरामध्ये मानवत तालुक्यासह शहरातील जास्तीत जास्त युवकांनी सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन अनिल जाधव, पांडुरंग जाधव यांच्यासह खंडोबा मंदिर मित्र मंडळाच्या सर्व सदस्यांनी केले आहे.

### लैंगिक छळाच्या तक्रारीची चौकशी व निराकरण करण्यासाठी अंतर्गत तक्रार समिती गठीत करावी

**परभणी,/प्रतिनिधी-** कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ च्या कलम ४ (१) नुसार कार्यालयांतर्गत येणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारीची सखोल चौकशी व त्याचे निराकरण करण्यासाठी ज्या आस्थापनामध्ये १० किंवा १० पेक्षा जास्त अधिकारी, कर्मचारी कार्यरत आहेत. अशा प्रत्योक नियोक्त्याने शासकीय, निमशासकीय कार्यालये, संघटना, महामंडळे, आस्थापना, संस्था, शाखा ज्याची शासनाने स्थापना केली असेल किंवा पूर्ण अथवा अंशतः, प्रत्याक्ष अथवा अप्रत्याक्ष निधी शासनामार्फत किंवा स्थानिक प्राधिकरणामार्फत किंवा शासकीय कंपनी किंवा खाजगी उपक्रम, संस्था, इंटरप्रायजेस, अशासकीय संघटना, सोसायटी, ट्रस्ट, उत्पादक, पुरवठा व विक्री यासह वाणिज्य, व्यावसायिक, शैक्षणिक, करमणूक, औद्योगिक, आरोग्य इत्यादी सेवा किंवा वित्तीय कामकाज पार पाडणारे युनिट किंवा सेवा पुरवठादार, रुग्णालये, सुश्रुषागृहे, क्रीडा संस्था, प्रेक्षागृहे, क्रीडा संकुले, एमआयडीसी, धर्मादाय आयुक्त, आरोग्य विभाग, कामगार कल्याण, शिक्षण विभाग, शासकीय, निमशासकीय व खाजगी शिक्षण संस्था, नगरपालिका, सहकार विभाग, बँकींग विभाग, सहकारी पतसंस्था, पतपेढी, शासकीय रुग्णालये, खाजगी रुग्णालये, शॉपींग मॉल, व्यापारी महामंडळ, मार्केट किमती, कोचिंग क्लासेस इत्यादी ठिकाणी किंवा अधिनियमात नमूद केलेल्या शासकीय व खाजगी क्षेत्रातील कार्यालयात अधिनियमातील कलम ४ (१) नुसार अंतर्गत तक्रार निवारण समिती गठीत करणे आवश्यक आहे.
बदली किंवा अन्य कारणाने समितीमधील एखादे पद रिक्त झाल्यास, अधिनियमातील तरतुदीनुसार नव्याने अंतर्गत तक्रार निवारण समितीचे गठन करावे. अधिनियमातील कलम २६ नुसार जर एखाद्या मालकाने अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली नाही, अधिनियमातील कलम १३, १४, २२ नुसार कारवाई केली नाही, या कायद्यातील व नियमातील विविध तरतुदीचे व जबाबदाऱ्यांचे पालन न केल्यास मालकाला ५० हजार रुपये दंड आकारण्यात येईल. तसेच हाच प्रकार पुन्हा केल्यास आस्थापनेचा परवाना रद्द, दुप्पट दंड अशी तरतूद आहे. ज्या आस्थापनेत १० किंवा १० पेक्षा अधिक अधिकारी, कर्मचारी कार्यरत असतील अशा सर्व आस्थापनांनी अधिनियमातील तरतुदीनुसार तात्काळ अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करावी. तसेच समिती स्थापन केल्याचा आदेश जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, परभणी येथे करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्राकाद्वारे केले आहे.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## मराठा समाजास इडब्लुएसचे आरक्षण सुरु ठेवा- सुभाष जावळे यांची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी-** मराठा समाजास ओबीसीतून जोपर्यंत आरक्षण लागू होणार नाही, तोपर्यंत इडब्लुएस या कोट्यातून पूर्ववत आरक्षण सुरु ठेवावे, अशी मागणी मराठा आरक्षण संघर्ष समन्वय समितीचे अध्यक्ष सुभाष जावळे यांनी शनिवारी एका पत्रकार परिषदेतून केली.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जावळे हे गेल्या चार दिवसांपासून या मागणीसाठी बेमुदत उपोषणास बसले आहेत. शनिवारी जावळे यांनी पत्रकार परिषदेतून यामागील भूमिका विशद करतेवेळी आम्ही मागत असलेले ओबीसी आरक्षणाऐवजी सरकारने एसईबीसीचे आरक्षण दिल्यामुळे इडब्लुएसचे आरक्षण काढून घेतले. त्यामुळे मराठा समाजातील अनेक विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान झाले आहे. तसेच अन्य प्रकारच्या अडीअडचणीसुध्दा मोठ्या प्रमाणावर उद्भवत आहेत. त्याामुळे जोपर्यंत मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत इडब्लूएसचे आरक्षण सुरुच ठेवावे, अशी मागणी केली. मराठवाड्यातील मराठा समाजात निजाम गॅजेट ग्राह्य धरुन कुणबी प्रमाणपत्र द्यावे, सर्व मुला, मुलींना मोफत शिक्षण द्यावे, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातील जाचक अटी रद्द कराव्यात, यासह अन्य मागण्याही जावळे यांनी केल्या.

## आ.बोर्डीकर यांच्याहस्ते सेलू येथे तीसहजार महिलांना साहित्याचे वाटप



**सेलू,/प्रतिनिधी-** आमदार मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते सेलु येथे ३०००० लाभार्थ्यांना संसार उपोयोगी साहित्याचे वाटप.
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळाच्या वतीने बांधकाम कामगारांना गृहउपयोगी वस्तु संचाचे वाटप आमदार मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते झाले.

भाकरीचा प्रश्न सोडविण्यासाठी अहोरात्र परिश्रम करणारे बांधकाम कामगार जीव मुठीत ठेऊन काम करतात. अशा कामगारांना संसार उपयोगी साहित्या मिळाले पाहिजे, या भावनेतून महाराष्ट्र इमारत व बांधकाम कल्याणकारी मंडळांनी ही योजना हाती घेतली आहे. त्याा योजनेनुसार सेलु तालुक्यातील ३००० कामगारांना गृहपयोगी साहित्या संच वाटप करण्यात आले.

या भव्य दिव्य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष डॉ.संजय रोडगे,तालुकाध्यक्ष दत्ता कदम,शहराध्यक्ष अशोक अंभोरे,,प्रकाश गोरे,कपील फुलारी,अजय डासाळकर,गणेश काटकर,संदीप बोकान,बाळासाहेब काजळे,दत्ता तांबे,शिवहारी शेवाळे,भागवत दळवी,जयसिंग शेळके,कृष्णा मगर,अमोल मोगल,अर्जुन बोरूळ,गुड्डु दिक्षीत,प्रकाश शेरे,जोगदंड महाराज,दत्ता पवार,प्रकाश शेरे,शिवम गटकळ आदी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थीत होते.

## यशासाठी प्रामणिक प्रयत्न आवश्यक- डॉ.खोडके

**परभणी,/प्रतिनिधी-** यशासाठी प्रामाणिक प्रयताची आवश्यकता आहे. याशिवाय जिद्द आणि चिकाटी जोड द्यावी लागते. याकरिता कृषी अभियंत्याांमध्ये जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक प्रयत ठेवून यश संपादन करावे, असे आवाहन शिक्षण संचालक डॉ. उदय खोडके यांनी केले.




नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार दीक्षारंभ कार्यक्रमाचे नव्याने प्रवेशीत प्रथम वर्षीय विद्यार्थ्यांसाठी आयोजन करण्यात येते. दीक्षारंभ कार्यक्रम विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर त्यांना महाविद्यालयातील विविध विभागांची आणि शिक्षक तसेच शिक्षकेतर अधिकारी कर्मचाऱ्यांची ओळख होवून विद्यार्थी महाविद्यालयात रूळण्यासाठी महत्वाचा आहे. याकरिता दीक्षारंभ कार्यक्रमांतर्गत वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कृषी अभियांत्रिकी व तंत्राज्ञान महाविद्यालयात २५ सप्टेंबर रोजी मार्गदर्शन आयोजित केले होते. यावेळी अध्यक्षस्थानी शिक्षण संचालक डॉ. उदय खोडके हे होते. रेवाडी (हरियाणा) येथील वरिष्ठ कृषी अभियंता आणि उद्योजक इजि. रामबीर यादव हे प्रमुख पाहुणे होते. व्यासपीठावर जिमखाना उपाध्यक्ष डॉ. राहुल रामटेके, रेवाडी (हरियाणा) येथील सेवा निवृत्त लेखा अधिकारी दीपक यादव, राष्ट्रीय विमा योजनेचे सेवा निवृत्त विपणन व्यवस्थापक श्री. जगजित सिंग, विभाग प्रमुख डॉ. स्मिता खोडके आणि डॉ. मदन पेंडके आदींची उपस्थिती होती. यावेळी इंजि. रामबीर यादव यांनी कृषी अभियंत्याांचे समाजात असलेले महत्व सांगितले. याबरोबरच कृषी क्षेत्राच्या विविध बँक संबंधीत व औद्योगिक क्षेत्रातील कृषी अभियंत्यांना रोजगाराच्या संधींबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या जिमखाना विभागाद्वारे करण्यात आले. सूत्र संचालन प्रिया देशमुख यांनी तर आभार जिमखाना सचिव डॉ. गजानन वसु यांनी मानले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## आत्महत्या प्रतिबंधासाठी जनजागृती हेच लसीकरण- नाईक

**परभणी,/प्रतिनिधी-** येथील शारदा महाविद्यालयात मानसशास्त्र विभागाच्यावतीने जागतिक आत्महत्याा प्रतिबंध दिन(१०सप्टेंबर) व जागतिक अल्झायमर दिन (२१सप्टेंबर ) या निमित्ताने मनोविश्व भित्तीपत्राकाच्या विमोचन प्रसंगी परभणी जिल्ह्यातील प्रसिद्ध मनोविकार तज्ञ डॉ. जगदीश नाईक बोलताना म्हणाले की, जगात दर ४० सेकंदाला एक आत्महत्याा घडत असते या नोंदणीकृत आकड्या वरूनच आत्महत्याा प्रतिबंध किती महत्वाचा आहे हे लक्षात येते. आत्महत्याा करणाऱ्या व्यक्ती आत्महत्याा करण्यापूर्वी अनेक संकेताद्वारे आत्महत्यांचे विचार प्रकट करतात मला जीवन नकोसे झाले आहे, जीवन संपवावे वाटत आहे, सतत उदास वाटत आहे, मी एकटा आहे, गुड बाय फॅमिली असे स्वतःच्या भ्रमणध्वनीवर स्टेटस ठेवतात किंवा इतरांजवळ कळत नकळत बोलतात, अशावेळी वेळीच मदत मिळायला हवी तर आपण त्यांना वाचवू शकतो. आपल्या समाजातील जवळच्या व्यक्तींचे, प्रियजनांचे जीव वाचवायचे असतील तर प्रत्योकानी आत्महत्याा रोखण्यासाठी, प्रतिबंध करण्यासाठी समाजात याबाबत जाणीव जागृतीचे मानसिक लसीकरण करून घ्यावे असे आव्हान केले. अल्झायमर हा वृद्धांना होणारा स्मृतिरहासाशी संबंधित आजार असून ह्याच्यावर उपचार नाहीत परंतु होणारा स्मृतीचारहास वेळीच मिळालेल्या उपचाराने थांबवू शकतो. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. वैशाली देशपांडे म्हणाल्या की आत्महत्याा, अल्झायमर या विकृतीला बळी पडणाऱ्या व्यक्तींना उपाचारासोबत मानसिक आधाराची गरज असते. मनिविश्व या भित्ती पत्राकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते झाले.यावेळी विचारपिठावर मान्यवरांसह आय क्यू ए सी समन्वयक डॉ.संतोष नाकाडे, डॉ . एन.व्ही. सिंगापुरे उपस्थित होते.

## फुटबॉल खेळामुळे शरीर व मनाचा व्यायाम होतो- कांबळे

**परभणी,/प्रतिनिधी-** जागतिक स्तरावर फुटबॉल खेळाला महत्व असून शालेय विद्यार्थ्यांनी या खेळाकडे आवडीने पाहिले पाहिजेत, संपूर्ण शरीराचा आणि मनाचा व्यायाम या खेळामुळे होतो, असे प्रतिपादन महापालिकेचे सहाय्यक आयुक्त प्रज्ञावंत कांबळे यांनी केले.



महानगरपालिकेच्या वतीने जिल्हास्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धा २०२४-२५ अंतर्गत २० सप्टेंबर रोजी डॉ. झाकेर हुसेन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन सहाय्यक आयुक्त प्रज्ञावंत कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फुटबॉल असोसिएशन मोहम्मद इकबाल, म.न.पा. क्रीडा प्रमुख राजकुमार जाधव, शेख मुजाहीद, नरेंद्र गवळी, रवी उबाळे, मेड, आदिल खान, काजल भुसारे, सय्यद माजीद, बशीर अहेमद, व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन मेड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सय्यद मुनीर, सय्यद शकील, असलम शेख, अब्दुल मुजीब खान, मो. इस्तीयार पांडुरंग दुधाटे, कैलास काकडे, सय्यद सादेक आदींनी परिश्रम घेतले.

## गुन्हेगारी मुक्त समाज घडवा : न्यायाधीश. एस.व्ही. मुंडे यांचे प्रतिपादन

**जिंतूर,/प्रतिनिधी:** गुन्हेगारी महिला अत्याचाराच्या संदर्भात भारतीय कायद्यांमध्ये अनेक चांगल्या तरतुदी आहेत, ज्या मधून महिलांना योग्य न्याय मिळेल अशा पद्धतीची न्याय रचना केलेली आहे, परंतु महिला संदर्भात घडणारे गुन्हे कसे होणार नाहीत असा सामाजिक जबाबदारीचे भान असणारा समाज निर्माण करणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे, असे मत सोनपेठ तालुका न्यायालयाचे न्यायाधीश. एस. व्ही. मुंडे यांनी व्यक्त केले.

कै. रमेश वरपुडकर महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी दिक्षारंभ : विद्यार्थी प्रेरण कार्यक्रम व महिलांची समाजातील सुरक्षा व गोपनीयता या विषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. ज्योतीताई कदम, प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. वसंत सातपुते, रामेश्वर कदम, अॅड. के. डी. मोकाशे, अॅड. एस.एस. भिसे, अॅड. ए. पी. तिरमले, प्रा. डॉ. मुकुंदराज पाटील हे मंचावर उपस्थित होते.

याप्रसंगी महिला सुरक्षे संदर्भात, पीडित महिलेच्या बाबतीत गोपनीयतेच्या नियमाविषयी न्यायायाधिश मुंडे यांनी सविस्तर विवेचन केले. सध्या घडत असलेल्या महिला अत्याचाराबाबतीतील घटना बद्दल खंत व्यक्त करून समाजामध्ये होत असलेले गुन्हे कसे घडणार नाहीत, याची काळजी घेणारा समाज आणि सामाजिक भान असणारे नागरिक निर्माण करणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात ज्योतीताई कदम यांनी योग्य संस्कार आणि खरी भारतीय संस्कृती यामधून स्त्रियांच्या आदराची भावना प्रत्योक व्यक्तीच्या मनात निर्माण होते, अशी भावना निर्माण करून एक संस्कारक्षम पिढी येणाऱ्या काळामध्ये निर्माण करणे आवश्यक आहे त्यासाठी शैक्षणिक संस्था मधून विशेष प्रयत झाले पाहिजे असे प्रतिपादन केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. वसंत सातपुते यांनी महाविद्यालयातील विविध सुविधा, विविध समित्यांची कार्यपद्धती, महाविद्यालयीन आचारसंहिता याबाबत मार्गदर्शन केले, तसेच गुणवत्तेच्या आधारावरील शिक्षणाचा जीवनात पडणारा प्रभाव याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. एम. जी. सोमवंशी यांनी केले, प्रास्ताविक प्रा. डॉ. एम. बी. पाटील यांनी तर आभार प्रा. डॉ. बी. एम. काळे यांनी मानले. तालुका विधी सेवा समिती कार्यालयाचे समन्वयक विनोद शुक्ला, प्रा. डॉ. सा.द. सोनसळे, प्रा. डॉ. एम. डी. कच्छवे, प्रा. डॉ. एस. डी. अंभुरे, प्रा. डॉ. ए. बी. सरकाळे, प्रा. डॉ. व्हि. डी. रागोले उपस्थित होते.

# माझ्या नादी लागू नका नाही तर स्क्रीन लावून कारनामे बाहेर काढील-मोहनराव जगताप

## निर्धार मेळाव्यात जगताप यांचा प्रकाश सोळंके यांना नाव न घेता इशारा

## सभेत तुतारीचे संकेत ;राष्ट्रवादी शरद पवार गटाचे सहाल चाऊस, अर्जुन गायकवाड व्यासपीठावर

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२९ सप्टेंबर**

बाजार समिती निवडणुकीवेळी मी दारू पिऊन आलो असा अपप्रचार करत माझी बदनामी केली.परंतु याद राखा अन् माझ्या नादी लागू नका नाही तर स्क्रीन लावून तुमचे कारनामे बाहेर काढील मग बाया बापड्या चपलेने मारायला कमी करणार नाहीत असा इशारा निर्धार मेळाव्यात मोहन जगताप यांनी आमदार प्रकाश सोळंके यांना नाव न घेता दिला.ते निर्धार मेळाव्यात दि.२९ रविवार रोजी माजलगाव येथील मोंढा मैदान येथून बोलत होते.यावेळी व्यासीठावर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नूतन प्रदेश सचिटणीस सहाल चाऊस तसेच अर्जुन गायकवाड देखील उपस्थीत असल्याने मेळाव्यात तुतारीचे स्पष्ट संकेत दिसून आले आहेत.

यावेळी व्यासपीठावर माजी नगसेवक डॉ.सुशील लोढा, संतोष यादव,अर्जुन गायकवाड,फिरोज इनामदार,श्रीकृष्ण सोळंके,उमेश मोगरेकर,विलास बडे यांच्यासह मान्यवरासह कार्यकर्ते उपस्थीत होते.सदर मेळाव्यात नेत्यांची समायोची-त भाषणे झाली.पुढे बोलतांना मोहन जगताप म्हणाले की, वीस वर्षापासून सत्ता असताना देखील विद्यमान आमदार माजलगाव शहरातील बाजार प्रश्न मार्गी लावला नाही, तसेच शहरातील ड्रेनेज लाईन ही सिंदफना नदी पर्यंत होती ते काम केलं नाही त्यामूळे शहरात दुर्गंधी पसरली आहे, गत विधानसभेवेळी बेरोजगार तरुणांना रोजगाराची संधी उलब्ध करुन देतो म्हणले परंतु



अद्याप तरी एमआयडीसीचे काम पूर्ण झाल नसल्यामुळे बेरोजगारी दुर होणार कधी असा प्रश्न पडतो आहे, तर दुसरीकडे टेक्सटाइल पार्क मंजूर झाली होती परंतु ती देखील चाटगावला म्हणुन बंद पडली असल्याचे बोलतांना सांगितले आहे, तर कार्यकर्त्यांना कामं न देता बाहेरील गुत्तेदार आणून टक्केवारी घेण्याचे काम केले असा आरोप यावेळी बोलताना केला.झेंडा कोणताही असो पक्षाचे तिकिट मिळो अथवा न मिळो पण विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.प्रास्तविक रामदिप डाके यांनी केले तर आभार डॉ.सुशील लोढा यांनी मानले.

मोहन मागच्या वेळीच आमदार असता परंतू पंकजा मुंडेंची महत्वाकांक्षा नडली-माजी आमदार बाजीराव जगताप

मागील २०१९ च्या विधनसभा निवडणुकीत मोहन आमदार झाला असता परंतु पंकजा मुंडेंची महत्वाकांक्षा नडली अन् पक्षाने तिकीट दिलं नाही त्यामुळे संधी हुकली आणि आमचं राजकीय शटर खाली ओढण्यात आले.परंतू आता तुमच्या मनातील इच्छा पूर्ण होईल.तालुक्यासह मतदार संघाला लागलेला शनी तुम्हाला काढून टाकण्याची संधी आहे.फक्त ते तुम्ही जनताच करु शकता.एकाच घरात हातात सत्ता दिली तर ते धोक्याचे ठरणार असे मत माजी आमदार बाजीराव भाऊ जगताप यांनी माजलगाव येथील आयोजित निर्धार मेळाव्यात बोलतांना व्यक्त केले आहे.

## माजलगाव मध्ये १ ऑक्टोबर रोजी उपमुख्यमंत्री अजित पवारांची जनसन्मान यात्रा

### विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी व लाडक्या बहिणींनी उपस्थिती राहावे- आ.प्रकाश सोळंके





**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२९ सप्टेंबर**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्रात विविध विकासकामांची माहितीसाठी व विवीध योजनांची जनजागृती करण्यासाठी जनसन्मान यात्रेच्या माध्यमातून विधानसभेचा प्रचाराचा धुमधडाका सुरू केला असुन याचाच एक भाग म्हणून माजलगाव विधानसभा मतदारसंघ संघात दि ०१ ऑक्टोबर मंगळवार रोजी सकाळी ११:०० वाजता शहरातील मंगलनाथ मैदानावर जनसन्मान यात्रा निमित्ताने उपमुख्यमंत्री अजित पवार व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत जनसन्मान यात्रा होणार असुन या जनसन्मान यात्रेच्या कार्यक्रमांस माजलगाव विधानसभा मतदारसंघातील नागरीकांना व लाडक्या बहिणींनी उपस्थित राहण्याचे आवाहन आमदार प्रकाश सोळंके यांनी पत्रकार परिषदेत केले आहे.

आ.प्रकाश सोळंके यांच्या निवासस्थानी परीषदेत बोलताना आ.प्रकाश सोळंके म्हणाले की उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सरकारच्या माध्यमातून माजलगाव विधानसभा मतदारसंघात कोट्यवधी रुपायांची विविध विकास कामे करण्यात आली त्यामध्ये पैठण येथील जायकवाडी धरणाच्या १३२ कि.मी उजव्या कालवाच्या दुरुस्तीचे काम सध्या प्रगतीपथावर असुन लोणी-सांवगी उपसा जलसिंचन योजनेचे ९५% काम पुर्ण झाले आहे तर उपजिल्हा रुग्णालयाचे काम देखील प्रगतीपथावर असल्याचे सांगितले,तसेच राज्यशासनाने लाडकी बहिण,लाडका भाऊ, वयोवृद्ध योजना,मातृतिर्थ योजनेची मोठ्या प्रमाणात अंमलबजावणी केली जात आहे,त्याचाच एक म्हणून माजलगाव,धारुर व वडवणी विधानसभा मतदारसंघात लाडकं बहिण योजने अंतर्गत ६० हाजार बहिणींना प्रत्यक्ष लाभ झाला तर आजुन या योजने अंतर्गत माजलगाव विधानसभा मतदारसंघातील ८० हाजार महिलांना लाभ मिळेल अशी ग्वाही आ.प्रकाश सोळंके यांनी दिली,राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या योजनेची जनजागृती करण्यासाठी राज्यात जनसन्मान यात्रा काढली असुन या जनसन्मान यात्रेस राज्यात चांगला प्रतिसाद मिळत असून याचाच एक भाग म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जनसन्मान यात्रा माजलगाव विधानसभा मतदारसंघात दि ०१ ऑक्टोबर मंगळवार रोजी सकाळी ११:०० वाजता शहरातील मंगलनाथ मैदानावर जनसन्मान यात्रा होणार असुन या जनसन्मान यात्रेस माजलगाव,धारुर व वडवणी विधानसभा मतदारसंघातील नागरीकांना व लाडक्या बहिणींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन या पत्रकार परिषदेत आमदार प्रकाश सोळंके यांनी केले.या पत्रकार परिषदेला जि.प.चे माजी सभापती जयसिंग सोळंके, बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे,माजी सभापती संभाजी शेजुळ,पं.स.उपसभापती, शहरध्याक्ष खालील पटेल,डॉ.वसिम मनसबदार,अच्युत लाटे,माजी नगराध्यक्ष नासेर खॉ.पठाण उपस्थिती होती.

## संवाद बैठकीतुन अशोक डक यांचे शक्तिप्रदर्शन

### अशोक डक यांनी विधानसभेसाठी थोपटले दंड

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२९ सप्टेंबर**

तुमची दिसणारी ताकत आणि सपोर्ट पाहता या वेळी मला विधानसभा निवडणूक लढवावीच लागेल असे स्पष्ट करत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघातुन निवडणूक लढवण्याचे संकेत दिले.पक्ष आणि नेता डक यांनी स्पष्ट केला नसला तरी शरद पवार आणि अजित पवार यांच्या आशीर्वादाने मुंबई बाजार समितीत माजलगावचा झेंडा फडकवला हे सांगून आताही असेच आशिर्वाद मिळाले तर माजलगाव मतदारसंघावरही झेंडा फडकवू असा विश्वास अप्रत्यक्षरित्या व्यक्त केला.

यासंवाद बैठकीत पुढे बोलताना अशोक डक असेही म्हणाले की,माझ्याकडे साधी पिठाची गिरणी नाही.परंतु कार्यकर्त्यांची ताकद माझ्या पाठीशी आहे. राजकीय फडातील विधानसभेची कुस्ती लढण्याची आपली ताकत आहे का नाही चाचपडण्याचा हा निर्णय आहे. आपली इच्छा प्रकट करणे हे काही गैर नाही आपल्या शक्तीची दखल निश्चित राजकीय पक्ष घेतील असा विश्वास व्यक्त करत तुम्हाला आवडेल असाच निर्णय घेईल असेही अशोक डक यांनी कार्यकर्त्यांना सांगितले.



मुंबई बाजार समितीचे सभापती, अशोक डक यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची चाचपणी सुरू केली आहे.त्याच अनुषंगाने त्यांनी दि २८ सप्टेंबर शनिवार रोजी येथील राजस्थानी मंगल कार्यालयात सकाळी ११:०० वाजता कार्यकर्त्यांची संवाद बैठक आयोजित केली होती.या बैठकीला कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संवाद बैठकीच्या माध्यमातून अशोक डक यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन केले असून हक्काचा माणूस म्हणत डक यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी दंड थोपटल्याचे चित्र संवाद बैठकीच्या माध्यमातून पाहायला मिळाले. विशेष म्हणजे व्यासपीठावर लावण्यात आलेल्या बॅनरवर केवळ महापुरुषांचे फोटो होते.कोणत्याही राजकीय पक्षनेत्याचा फोटो किंवा नावाचा उल्लेख बॅनरवर नव्हता.त्यामुळे अशोक डक नेमके कोणत्या पक्षाकडून निवडणुकीच्या आखाड्यात उतरतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.स्वतः अशोक डक यांनी विधानसभेच्या मैदानात उतरण्याचे संकेत दिल्याने माजलगाव मतदार संघातील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे आहेत.

## केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ प्रदान कार्यक्रम निमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मार्गदर्शन कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२९ सप्टेंबर**

केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ प्रदान कार्यक्रम निमित्त पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांचे मार्गदर्शन कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण कार्यक्रम जन शिक्षण संस्थान बीड कार्यालयात संपन्न झाला.

जन शिक्षण संस्थान बीड कार्यालय येथे आयोजित कार्यक्रमात प्रमुख उपस्थित जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी डी व्ही फताटे, आर सी इ टी आई चे संचालक श्री आत्माराम दगडे, विश्वकर्मा योजनेचे जिल्हा समन्वयक श्री अनिरुद्ध काळे,आय टी आय च्या पवार मॅडम, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जन शिक्षण संस्थान बीड कार्यक्रम अधिकारी सौ सीमाताई मनूरकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.डी व्ही फताटे यांनी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेचे बीड जिल्ह्यातील कार्याबद्दल माहिती दिली.

आत्माराम दगडे यांनी जन शिक्षण संस्थान बीडच्या माध्यमातून कौशल्य विषयक प्रशिक्षण बरोबरच चालणाऱ्या विविध योजनेची माहिती सांगून पी एम विश्वकर्मा योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यात उत्तम प्रशिक्षण सुरू असल्याचे सांगितले.अध्यक्षीय मार्गदर्शन प्रसंगी सौ सीमा ताई मनुरकर यांनी जन शिक्षण संस्थान बीड द्वारा सुरू असलेल्या प्रशिक्षणाबरोबरच इतर उपक्रमांची माहिती दिली.ग्रामोदय गीत सौ स्नेहल केवडकर यांनी सादर केले तर सहायक कार्यक्रम अधिकारी श्री सुदाम पालकर यांनी विश्वकर्मा योजनेवर आधारित कविता सादर केली.पी एम विश्वकर्मा योजनेचे यशोगाथा राजेंद्र घोडके यांनी आपले मनोगत व्यक्त केले, विश्वकर्मा योजनेचे सध्या सुरू असलेल्या बॅच चे प्रशिक्षार्थी शरद रत्नपारखे , गणेश पांचाळ, यांचे मनोगत झाले. याच कार्यक्रमात पी एम विश्वकर्मा योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या प्रशिक्षार्थ्यांस मान्यवरांच्या हस्ते प्रमाण प्रदान करण्यात आले. सुत्रसंचलन सहायक कार्यक्रम अधिकारी सौ स्वाती जैन यांनी केले तर आभार सुदाम पालकर यांनी व्यक्त केले.कार्यक्रमासाठी २५० पी एम विश्वकर्मा प्रशिक्षणार्थी, जन शिक्षण संस्थान बीडच्या विविध प्रशिक्षणाच्या ७० प्रशिक्षणार्थी अशी ३२० महिला पुरुषांची उपस्थिती होती.या कार्यक्रमानंतर सर्वांनी वर्धा येथील कार्यक्रमात प्रधानमंत्री आदरणीय नरेंद्र जी मोदी यांच्या हस्ते ७५००० हजार लाभार्थी यांना विविध योजनांचे लाभ उद्धठण व काहीना प्रत्यक्ष लाभ प्रदान विविध योजनांचा शुभारंभ व त्यांचे मार्गदर्शनाचा लाभ घेतला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जन शिक्षण संस्थान बीड चे सर्व कार्यकर्ते, प्रशिक्षक नितीन क्षीरसागर,महेश सोनवणे, विशाल वाघमारे व प्रशिक्षणार्थी यांनी सहकार्य केले.



## सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मुलींचा संघ जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम

**विभागीय स्पर्धेसाठी निवड**
**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२९ सप्टेंबर**

२९ सप्टेंबर रोजी क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व बीड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत अंबाजोगाई संघाचा २-० ने पराभव करून प्रथम क्रमांक पटकावला व विभागीय स्पर्धेसाठी हा संघ पात्र ठरला.विजयी खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रा. प्रविण कोरडे, प्रा नवनाथ आवारे, प्रा. सुखदेव माने, प्रा डॉ. सी. डी.फड यांचे मार्गदर्शन लाभले.यशस्वी खेळाडूंचे म. शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके, यांच्यासह ॲड.बी.आर. डक, सत्यप्रकाश रुद्रवार, निळकंठ साबळे, डॉ. सुनील गरड, वगरे नाना, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए कव्हळे, प्रा. प्रकाश गवते, प्रा. पवनकुमार शिंदे, प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधीक्षक सतीश एरंडे, यांनी अभिनंदन केले.




## २ ऑक्टोबर रोजी होणारी निर्णयाक बैठक स्थगित

### पुढील तारीख लवकरच कळवली जाईल- आ.लक्ष्मण पवार

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२९ सप्टेंबर**

विधानसभा मतदारसंघातील सर्व मित्र परिवार समर्थक यांनी मी विधानसभा लढवावी म्हणून आग्रह केलेला आहे तरी मला विचार करण्यासाठी काही वेळ द्या असे मि सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी यांना सागितले होते.

त्या अनुषंगानेच दि.२ ऑक्टोबर रोजी बैठक घेण्याचे ठरले होते पण काही कारणास्तव २ ऑक्टोबरची बैठक स्थगित करण्यात येऊन नवीन तारीख लवकरच कळवण्यात येईल असे आ.लक्ष्मण पवार यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात ते म्हणाले की २ ऑक्टोबर रोजी होणारी बैठक सध्या स्थगित करण्यात आली आहे तरी पुढील तारीख लवकरच कळवण्यात येईल असे आ.लक्ष्मण पवार यांनी दिलेल्या प्रसिद्धि पत्रकात म्हटले आहे.



कार्यालय
कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई
जा.क्र.३४४/२४-२५ दि.२८/०९/२०२४

कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई
**ई निविदा क्र. ०१/२०२४**

कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई. वतीने महाराष्ट्र शासन सार्वजनिक विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत अनुभवी कंत्राटदार यांच्या कडून ब-१ नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहेत तरी सदर निविदेसोबत सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.३०/०९/२०२४ रोजी ११.०० वाजेपासून दि ०७/१०/२०२४.११.०० वाजेपर्यत पाहता व डाऊनलोड करता येईल.

सल्लागार अभियंता, कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई
सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई
सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भाजप कार्यकर्त्यांनी आत्मपरीक्षण करणे गरजेचे

## राज्याचे निवडणुक प्रमुख रावसाहेब दानवे यांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ सप्टेंबर**

राज्यात नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये निरूत्साह निर्माण झाला आहे. वास्तविक देशात आणि राज्यात महामार्गाचे जाळे, विमानतळे, रेल्वेचे जाळे, जनधन योजना, प्रधानमंत्री आवास योजना यासारख्या असंख्य महत्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहेत. देशाचा आणि राज्याचा विकास होत आहे. लोकसभा निवडणुकीत एकट्या भाजपला २४० जागा मिळाल्या. काँग्रेसला मागील तीन लोकसभा निवडणुकीत मिळून एवढ्या जागा निवडून आणता आल्या नाहीत. खरा विजय भाजप आणि मित्र पक्षाचाच झाला आहे. परंतु विरोधक आपणच विजयी झालोत आणि राज्याच्या निवडणुकीत आपण विजयी होणार आहोत या अविर्भावात वावरत आहेत. ही बाब भाजपच्या कार्यकर्त्यांनी समजून घेतली पाहीजे आणि आगामी विधानसभा निवडणुकीत जोमाने कामाला लागले पाहीजे. लोकसभा निवडणुकीत आपण कुठे कमी पडलोत याचे आत्मपरिक्षण करून त्यामध्ये सुधारणा केली पाहीजे असे आवाहन भाजपचे राज्याचे निवडणुक प्रमुख रावसाहेब दानवे यांनी भाजपच्या मेळाव्यात कार्यत्यांना केले आहे

येथील मधुरदीप पॅलेसमध्ये रविवारी भाजपचे राज्याचे निवडणुक प्रमुख रावसाहेब दानवे यांच्या उपस्थितीमध्ये बुथ प्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष गजाननराव घुगे, संघटनमंत्री संजय कौडगे, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी खा ॲड शिवाजीराव माने, माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, महिला जिल्हाध्यक्षा उज्ज्वला तांभाळे, लोकसभा प्रमुख रामदास पाटील सुमठाणकर, युवाजिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण, मिलींद यंबल आदींची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलतांना दानवे म्हणाले की, राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेंतर्गत आता महिलांना वर्षाला १८ हजार तर शेतकरी सन्मान निधीमधून वर्षाला १२ हजार म्हणजे एका घरात ३० हजार रूपये वाटप होत आहेत. महिलांना बसचा प्रवास, ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, तीर्थदर्शन योजना, तीन गॅस सिलेंडर मोफत आदी अनेक कल्याणकारी योजना आमलात आणल्या आहेत. परंतु भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी या योजना लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम केले पाहीजे. पक्षाचे काम करीत असतांना स्वत:ला झोकून द्या. गावागावात बैठका घ्या, कामाबरोबर तुमचे वागणे, बोलणे, तुमचा व्यवहार, सरकारचे धोरणे तुम्ही लोकांना कसे पटवून देतात यावर तुमचे यश अवलंबून आहे. पक्षाच्या आदेशाची वाट न पाहता जेथे आपले मतदान कमी झाले त्याठिकाणी जाऊन लोकांशी संपर्क साधा, गावातील बुथ सांभाळा. पुन्हा एकदा महायुतीचेच सरकार येणार, असा विश्वासही यावेळी रावसाहेब दानवे यांनी व्यक्त केला. यावेळी आ. मुटकुळे, घुगे, माने यांनी मार्गदर्शन केले.

# अंगणवाडी सेविकांचे एचआयव्ही, एड्स संवेदीकरण प्रशिक्षण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ सप्टेंबर**

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय हिंगोली यांच्या तर्फे पंचायत समिती कळमनुरी येथील सभागृहात अंगणवाडी सेविकांचे एचआयव्ही, एड्स संवेदिकरण प्रशिक्षण घेण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य संपर्क) डॉ शैलजा कुप्पास्वामी या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून गणेश बोथिकर, गट विकास अधिकारी, राजकुमार धापसे, बाल विकास प्रकल्प अधिकारी, डॉ विठ्ठल करपे, वैद्यकीय अधीक्षक हे होते. तर व्याख्याते ज्ञानेश्वर चौधरी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी हे होते. यावेळी सर्व अंगणवाडी सेविकांची पूर्व चाचणी घेण्यात आली. यावेळी डॉ शैलजा कुप्पास्वामी व वैद्यकीय अधीक्षक डॉ विठ्ठल करपे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यानंतर उपस्थितांना ज्ञानेश्वर चौधरी यांनी एचआयव्ही आणि एड्स विषयी सखोल मार्गदर्शन करून सर्व गरोदर मातांची नोंदणी व एचआयव्ही चाचणी ही पहिल्या तिमाहीत करून घेणे किती गरजेचे आहे हे सांगितले.

प्रशिक्षणानंतर सर्व प्रशिक्षणार्थींची पश्चात चाचणी घेऊन सर्वांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन चंद्रकांत कोलते यांनी तर प्रास्ताविक आनंद चारण यांनी केले. सदरील प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी आशिष पाटील, संजय पवार, श्रीमती टिना कुंदणानी, आनंद चारन, चंद्रकांत कोलते व श्रीमती ज्योती पारसकर यांनी परिश्रम घेतले.

# स्वच्छता ही सेवा अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांची वॉकींग स्पर्धा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ सप्टेंबर**

नगर परिषद हिंगोली व राजुरी स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने जेष्ठ नागरिकांकरिता वॉकींग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेचे उदघाटन नगर परिषदेचे स्वच्छता व पर्यावरण दूत रत्नाकर महाजन व ज्ञानबा मुसळे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर ठिकाणी हिरवी झेंडी दाखवून करण्यात आले.सदर स्पर्धा हि ६० वर्षे पूर्ण किंवा त्यापेक्षा जस्त वयोगटातील महिला व पुरुषांकरिता आयोजित करण्यात आली होती.सदर स्पर्धेमध्ये स्पर्धकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून आपली उपस्थिती दर्शविली. यामध्ये महिला गटामध्ये प्रथम क्रमांक कांताबाई कल्याणकर, द्वितीय क्रमांक शितल तापडिया, तृतीय क्रमांक पुष्पा बांगर यांनी पटकावला तसेच महिला गटामध्ये राजुरी स्टील मार्फत प्रथम क्रमांकाला २१००रु., द्वितीय क्रमांकाला १५००रु. रोख रक्कम तसेच तृतीय क्रमांकाला ११०० रु. रोख रक्कम प्रदान करून सन्मान करण्यात आला. तसेच पुरुष गटामध्ये प्रथम क्रमांक बाळासाहेब हरण, द्वितीय क्रमांक बाबुराव ढाकणे, तृतीय क्रमांक कलानंद जाधव यांनी पटकाविला. सदर स्पर्ध्येमध्ये जेष्ठ नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला यावेळी नगर परिषदेचे स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, शहर समन्वयक आशिष रणसिंगे, दिनेश वर्मा, आकाश गायकवाड, अथर्व वर्मा, रवी जोंधळे, चेतन भूजवने तसेच योग विद्याधाम ग्रुप, हरिओम योगा ग्रुप, जायंट्स ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.



**हिंगोली–.कळमनुरी तालुक्यातील पार्डीमोड येथे रविवारी भदंत महास्थवीर चंद्रमणी विपश्यना केंद्राचे भूमीपून करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे आ. संतोष बांगर, भीमराव आंबेडकर यांच्यासह भदंत उपस्थित होते. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने बौध्द समाजातील महिला, पुरूष उपस्थित होते. छाया– सुनील पाठक**

# माझी वसुंधरामध्ये कुरूंदा ग्रामपंचात सलग तिसऱ्यांदा विभागस्तरावर प्रथम



**तभा वृत्तसेवा**
**कुरूंदा, २९ सप्टेंबर**

कुरुंदा ग्रामपंचायतने माझी वसुंधरा अभियान १० हजार पेक्षा जास्त लोकसंख्या गटातून छत्रपती संभाजीनगर विभागातून प्रथम क्रमांक पटकवला आहे. त्या बक्षीस स्वरूपाची रक्कम ५० लक्ष रुपये निधीस शासन मान्यता मिळाल्याने मंजुर झाला आहे.

पृथ्वी,वायू, जल, अग्नी, आकाश या निसर्गाशी आधारित पंचत्वावर माझी वसुंधरा अभियान हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्यास ०२ ऑक्टोबर २०२० मध्ये सुरुवात झाली. माझी वसुंधरा अभियान ०.१ मध्ये कुरुंदा ग्राम पंचायतीस सहभागप्रमाणपत्रदेऊन गौरविण्यात आले होते. त्यानंतर माझी वसुंधरा अभियान ०.२ मध्ये ७५ लक्ष रु, माझी वसुंधरा अभियान ०.३ मध्ये ७५ लक्ष रु तसेच माझी वसुंधरा अभियान ०.४ मध्ये ५० लक्ष रु उत्कृष्ट कार्य केल्या बदल सलग तीन वेळेस विभागातून प्रथम क्रमांक निवड झाली आहे. तत्कालीन राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पर्यावरण मंत्री यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन मुंबई येथे गौरविण्यात आले.

कुरुंदा ग्रामपंचायतीस सलग तीन वर्षे माझी वसुंधरा अभियान पुरस्कार छत्रपती संभाजीनगर विभागस्तर प्रथम क्रमांक पटकावला असून एकूण २ कोटी रुपये बक्षीस रक्कमेतून विविध कामे ग्रामपंचायत कुरुंदा अंतर्गत असणाऱ्या ठिकाणी पर्यावरण पूरक, हरित क्षेत्र निर्माण करणे, सौर ऊर्जा वापर करणे रेन वाटर हार्वेस्टिंग करून पाण्याची बचत करणे तसेच पंच महाभूतांवर आधारित पर्यावरण संवर्धनासाठी अत्यावश्यकनेमूनदिलेलीकामे करणे इत्यादी कामाचे अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मन्यता मिळणे साठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग मंत्रालयाकडून मान्यता घेऊन लवकरच कामे सुरू करून बक्षीस रक्कम खर्च करण्यात येईल.सरपंच राजेश पाटील इंगोले, उपसरपंच वामनराव दळवी, ग्रामविकास अधिकारी रामदास पवार, सर्व सदस्य, कर्मचारी गणेश वटमे, फुलाजी इंगोले, मंगेश इंगोले, वैभव कंचले यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### अ.भा. वैद्यक संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. पवार





हिंगोली– अखिल भारतीय वैद्यक संघटनेच्या हिंगोली शाखेच्या अध्यक्षपदासाठीची निवडणूक सह्याद्री हॉस्पिटल येथे दि २८ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत अतिशय सलोख्याच्या आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.निवडणुकीनंतर लगेचच १२ वाजून ५ मिनिटांनी उमेदवारांच्या आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्याउपस्थितीत तसेच निवडणूक अधिकारी माडॉ अशोक पातुरकर, माजी अध्यक्ष डॉ सचिन बगडीया, माजी सचिव डॉ यशवंत पवार यांच्या देखरेखीखाली पार पडली. निवडणूक प्रक्रियेत एकूण १०७ सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावलात्यापैकी डॉ राजेश पवार याना ७७ मते मिळाली तर डॉ श्रिनिवास कंदी याना २९ मते मिळाली. डॉ राजेश पवार याना अध्यक्ष म्हणून विजयी घोषित करण्यात आले तर डॉ राम मुंढे यांची सचिव म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.

### आई जगदंबा नवरात्र उत्सावाची जय्यत तयारी



हिंगोली– आई जगदंबा नवरात्र उत्सव समिती एनटीसी हिंगोलीच्या वतीने नवरात्र उत्सवाची जय्यत तयारी करण्यात येत असुन गरबा व दांडिया समितीची बैठक मंदिर प्रागंणात संपन्न झाली. यावेळी समिती सदस्या उपस्थित होत्या. त्या अनुषंगाने शनिवार दि.२८ सप्टेंबर रोजी छत्रपती शिवाजी राजे उद्यान, आई जगदंबा मातेच्या प्रागंणात गरबा व दांडिया महिला समितीची बैठक संपन्न झाली. मातेचे मंदिराचे काम सुरु असुन दांडिया व गरबा महोत्सवाच्या अनुषंगाने महिला समितीची बैठक घेण्यात आली. यंदा प्रथमच हॉटेल शिवलिला पॅलेस येथे दांडिया व गरबा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या महिला बैठकीला समितीच्या सदस्या मोठया संख्येने उपस्थित होत्या.

# माझी वसुंधरा अभियानात हिंगोली पालिका राज्यात दुसऱ्या क्रमांकावर


**तभा वृत्तसेवा**
**कुरूंदा, २९ सप्टेंबर**

महाराष्ट्र शासन मार्फत दरवर्षी राबविण्यात येत असलेल्या माझी वसुंधरा अभियानामध्ये नगर परिषद हिंगोली मार्फत सातत्य राखत चौथ्यांदा उल्लेखनीय कामगिरी करीत माझी वसुंधरा ४.० मध्ये राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरीकरीत नगर परिषद गटामध्ये दुसरा क्रमांक प्राप्त करीत ४.०० कोटी रुपयांचे बक्षीस मिळविले आहे.

हिंगोली नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक प्रमाणात आणि मोठ्या प्रमाणात माझी वसुंधरा व स्वच्छ सर्वेक्षणची अंमलबजावणी करीत आहे.याचेच फळ म्हणून हिंगोली नगर परिषदेस माझी वसुंधरा अभियानामध्ये नगर परिषद गटामध्ये राज्यातून द्वितीय क्रमांक व ४ कोटी रुपयांचा पुरस्कार जाहीर झाला.याआधी सुद्धा नगर परिषदेने माझी वसुंधरा १.० मध्ये राज्यात प्रथम व ५ कोटी रुपयांचा पुरस्कार तर माझी वसुंधरा २.० आणि ३.० मध्ये विभागात प्रथम क्रमांक पटकावून रु.१.५ कोटींचा पुरस्कार प्राप्त केला आहे.

हिंगोली शहरात पालिकेने नर्सरी तयार करून २५ हजार रोपांची लागवड करून त्यांचे संगोपन केले आहे. याशिवाय कोरोना काळातील ऑक्सीजनचे महत्व लक्षात घेऊन चार ठिकाणी घनवन तयार करून ऑक्सिजन हब तयार केले आहेत. शहरातील १७ प्रभागातील कचरा एकत्रित करून डंपींग ग्राऊंडवर त्यावर प्रक्रिया करून खत तयार केले असून त्याचा वापर शहरात लावलेल्या रोपांसाठी करण्यात येत आहे. हवेचे प्रदुषण मोजण्यासाठी यंत्र उभारले असून ज्या भागात प्रदुषण जास्त आहे त्याठिकाणी वृक्षलागवड केली. सुका कचऱ्याची विल्हेवाट लावून त्याची प्रयोगशाळेला विक्री करून पालिकेच्या उत्पन्नात भर पडली आहे. शहरातील नागरिकांना शुध्द पाणीपुरवठा होण्यासाठी जलशुध्दीकरण केंद्राला आवश्यक साहीत्य उपलब्ध करून दिले आहे तसेच जलेश्वर तलावातील पाण्याचे शुध्दीकरण केले आहे.

# गोदामात पोत्यांची सील फोडून धान्य मायनस–प्लस करण्यामागचे गौडबगाल समजेना



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २९ सप्टेंबर**

तहसीलच्या गोदामात पोत्यांची सील फोडून त्यातील धान्य कमी करत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे कशासाठी? शासनाने पाठवलेल्या सीलबंद धान्याच्या पोत्यांना गोडाऊनमध्ये आल्याच्या नंतर त्याची शील फाडून त्यातील धान्याचे वजन मायनस–प्लस करण्याचे नेमके कारण काय आहे? किंवा अशी काही तरतूद आहे का? हे मात्र समजेना.

येथील स्वस्त धान्य दुकानदारांचा कारभार चव्हाट्यावर आले असल्याचे पहावयास मिळत आहे. शहरातील काही स्वस्त धान्य दुकानदार दर महिन्याला राशन लाभार्थ्यांना मिळत नसल्याचे सूर ऐकावयास मिळत आहे. शासन मार्फत गोरगरीब जनतेसाठी विविध योजना आणत आहे परंतु या योजनेची अंमलबजावणी तळागाळापर्यंत पोहाचतच नाही जरी ती पोहोचली तर ती योग्य वेळी मिळत नाही नुकतेच सणावाराला आलेली आनंदाची शिदोरी ही योग्य वेळी न मिळाल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजी आहे. स्वस्त धान्य दुकानात आलेल्या लाभार्थ्यांना एक तर दुकानात बसण्यासाठी कुठली सोय नसल्याने ताटकळत रांगेत उभे राहावे लागते. दुसरीकडे लाभार्थ्यांना योग्य वेळी राशन मिळत नाही तर हे गोर गरिबाचे राशन जाते कुठे? याचा पत्ताच लागेना. शासना मार्फत आलेल्या तहसीलच्या सीलबंद पोत्यांना गोडाऊन मध्ये फोडून धान्य कमी करत असल्याचे एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यातील काढण्यात आलेले धान्याचा काळ्या बाजारात जात नाही ना? असा प्रश्न निर्माण होत आहे. मागील काही दिवसापूर्वी वसमत ग्रामीण पोलीस यांच्यामार्फत धान्याची गाडी पकडण्यात आली होती यात धान्य देखील होते परंतु हे धान्य राशन चे आहे का याची तपासणी करण्यासाठी पुरवठा अधिकारी यांना कळवले होते परंतु तहसील कार्यालयामार्फत सदरील धान्याचे सॅम्पल घेऊन चाचणीसाठी लॅबला पाठवण्यात आले होते काही दिवसानंतर लॅबमधून आलेला अहवाल सदरील धान्य हे राशनचे नसल्याचे कळाले. पोलीस मात्र राशनच्या काळ्या बाजाराचे वाहन पकडत असते कारवाई करत असते व नियमाप्रमाणे ते तहसीलमार्फत चाचणी करण्यासाठी लॅबला देखील जाते मात्र लॅबचा अहवाल राशनचा माल नसल्याचा येतो. या धान्य गोदामावर जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष पथक पाठवून याची चौकशी केल्यास गोरगरिबांच्या घशातील घास धनदांडग्याच्या घशात जाणार नाही व गरिबांचे हक्काचे राशन गरिबाला योग्य वेळी कसे मिळेल यावर उपाययोजना होईल.

# आज कृषी विवेकचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ सप्टेंबर**

शहरातील शिवाजीराव देशमुख सभागृहात दि ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी हिंगोलीच्या उद्योग विश्वाचा धांडोळा घेणाऱ्या विवेक समूह प्रकाशित कृषी विवेक विशेष पुरवणीचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचे सदस्य सचिव डॉ दिलीप बोराळकर, तर भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष शीलचंद्र देशमुख, विभाग संघ चालक डॉ रामेश्वर नाईक, कृषी विवेकचे संचालक आदीनाथ पाटील यांचेहस्ते प्रकाशन होणार आहे. यावेळी इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# उमेदवारांची घोषणा होईपर्यंत कमळ हेच उमेदवार मानून जोमाने कामाला लागा

## किनवट येथील संवाद बैठकीत माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. २९ सप्टेंबर -**

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सर्वव्यापी विकासकार्यामुळे शेतकरी शेतमजूर कामगार तसेच महिलावर्ग स्वयंस्फूर्तीने भाजपाशी जुडत आहे.किनवट विधानसभा मतदारसंघासाठी जोपर्यंत उमेदवाराचे नाव निश्चित होत नाही तोपर्यंत कमळ हेच उमेदवार समजून जोमाने कामाला लागा केंद्र आणि राज्य सरकारच्या महत्वकांक्षी योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी परिश्रम घ्या असे आवाहन माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा महाराष्ट्र विधानसभा निवडणूक संयोजन समितीचे अध्यक्ष रावसाहेब दानवे पाटील यांनी किनवट येथे केले आहे.



आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने गोकुंदा येथील गोपीकिशन मंगल कार्यालयात कार्यकर्ता संवाद बैठक आयोजित केली होती त्यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन ते बोलत होते.

या कार्यक्रमास प्रदेश कार्यकारणी सदस्य अशोक पाटील सूर्यवंशी,अनिल तिरमनवार,अशोक नेम्मानीवार,सौ संध्याताई प्रफुल राठोड, तालुकाध्यक्ष बालाजी आलेवार,विधानसभा निवडणूक प्रमुख बाबुराव केंद्रे,जेष्ठ कार्यकर्ते शिवराज राघू मामा, दीपक नेम्मानीवार,माजी नगराध्यक्ष व्यंकटराव नेम्मानीवार,माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार, दिनकर चाडावार, अजय चाडावार,संदीप केंद्रे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य बाळकृष्ण कदम,भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष स्वागत आयनेनीवार, आशुतोष बेद्रे, माजी नगरसेवक शिवा आंधळे, माहूरचे नगरसेवक गोपू महामुने,बालाजी धोत्रे, शिवा क्यातमवार, विवेक केंद्रे महिला आघाडीच्या उषाताई धात्रक, सौ. भावना दीक्षित, शोभाताई सानप आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

पुढे बोलताना दानवे म्हणाले की महायुती सरकारने वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून देशातील शेतकरी, शेतमजूर, कामगार, कष्टकरी महिला व युवावर्गाचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला. पी एम किसान निधी, उज्वला गॅस योजना, पंतप्रधान घरकुल आवास योजना, मोदी घरकुल आवास योजना युद्धस्तरावर राबवून थेट लाभार्थ्यापर्यंत पोहोचल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावला आहे.

राज्याने सुरू केलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना गोरगरीब महिलांसाठी वरदान ठरली.मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण तसेच मुख्यमंत्री योजना दूतमुळे युवक-युवतींना भविष्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. किनवट मतदारसंघावर भाष्य करताना दानवे म्हणाले की लोकसभेच्या निवडणुकीत किनवट विधानसभेत साधारणता १३ हजार मताधिक्याचा फरक पडला. आपले मत किंचितही घटले नाही,त्यामुळे चिंता करण्याचे कारण नाही. विधानसभा निवडणुकांची घोषणा कोणत्याही क्षणी होऊ शकते. पक्षाकडून उमेदवाराच्या नावाची घोषणा होत नाही तोपर्यंत कमळ हेच उमेदवार समजून जोमाने कामाला लागा. आपसातील मतभेद, हेवेदावे विसरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकासकार्य व योजना लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्यासाठी परिश्रम घ्या. जनतेचे भरभक्कम पाठबळ हेच आपल्या यशाचे गमक आहे.

प्रारंभी किनवट नगरपालिकेच्या वतीने माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांनी सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन रावसाहेब दानवे यांचा भव्य पुष्पहार घालून यथोचित सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपायुवा मोर्चाचे माजी तालुका अध्यक्ष उमाकांत कराळे यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. विश्वास कोल्हारीकर यांनी केले या संवाद बैठकीला किनवट माहूर तालुक्यातील भाजपाचे पदाधिकारी, महिला आघाडी, युवकआघाडी, शक्ती केंद्रप्रमुख बूथप्रमुख व कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

**दानवे यांनी भाषण आटोपते घेतले**

दरम्यान रावसाहेब दानवे यांचे भाषण सुरु असताना समोर उपस्थित असलेल्या एका कार्यकर्त्याने साहेब, गेल्या पन्नास वर्षांपासून बघत आहोत, इथे दोनच समाजातील कोणत्याही एका व्यक्तीला उमेदवारी मिळाली तरच मतदान होते. तिसरा निवडून येत नाही असे ओरडून सांगितल्याने सर्वच आश्चर्यचकित झाले. काहींनी टाळ्या देखील वाजवील्या. व्यत्यय निर्माण झाल्याने दानवे यांनी भाषण आटोपते घेतले.

# दत्ता वाले, व्वा रे..व्वा रे..

## लोकार्पण कार्यक्रम निमंत्रण देण्याचे अनेकांना टाळले

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि. २९ सप्टेंबर -**

नुकतेच शनीवारी शहरात १२ कोटी रुपयांच्या कामांचा शुभारंभ झाला. काही कामांचे लोकार्पण करण्यात आले. परंतु लोह्याचे स्वयंघोषीत सर्वेसर्वा असलेल्या दत्ता वाले यांनी भाजपाच्या अनेक कार्यकर्त, पदाधिकाऱ्यांना कार्यक्रमाचे निमंत्रण दिले नसल्याचा प्रकार उघडकिस आला आहे. या प्रकारामुळे अनेक कार्यकर्ते पदाधिकारी नाराजी व्यक्त करीत असुन दत्ता वाले यांची उपहासात्मक रित्या वाहवा करताना दिसुन येत आहेत. माजी खा. प्रताप पाटील चिखलीकर यांनी वेळीच अशा प्रकारावर आवर घालावा अशी मागणी करत आहेत.



माजी खा. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोहा येथे शनीवारी विविध कामांचे लोकार्पण करण्यात ओले. कार्यक्रमाचे निमंत्रण देण्याची जबाबदारी लोह्याचे भाजपाचे स्वयंघोषीत सर्वेसर्वा दत्ता वाले यांच्यावर सोपवण्यात आली होती. माजी खा. प्रताप पाटील चिखलीकर यांचे ते खंदे समर्थक असले तरी माजी खासदारांच्या कार्यक्रमाचे निमंत्रण भाजपाच्याच पदाधिकारी, कार्यकर्त्यांना देणे त्यांनी टाळले. हा प्रकार कार्यक्रमानंतर उघड झाला. दरम्यान मागील काही दिवसांपासुन आरक्षणासंदर्भाने मराठा व ओबीसी यांच्यात वाद सुरु असुन दत्ता वाले यांच्या अंगवळणी ओबीसी फॅक्टर पडला असल्याची चर्चा सुरु आहे. ही चर्चा मागील काही दिवसांपासुन सुरु असली तरी माजी खा. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या कार्यक्रमाचे निमंत्रण अनेकांना देण्याचे टाळल्याने दत्ता वालेंच्या ओबीसी फॅक्टरवर शिक्का मोर्तब झाले. त्यामुळे अनेकांनी इच्छा असुनही या कार्यक्रमास येणे टाळले. माजी खा. प्रताप पाटील यांच्यावर प्रेम करणारे कार्याकर्ते देखील दत्ता वाले यांना न जुमानता कार्यक्रमास उपस्थित राहीले हे विशेष.

मागील काही दिवसापासुन ओबीसी फॅक्टर अंगवळणी पडल्याने दत्ता वाले यांच्यात कमालीचा बदल झाला असुन माजी खा. प्रताप पाटील चिखलीकर यांच्यावर प्रेम करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना ते डावलत असल्याची तक्रार होत आहे. त्यामुळे या प्रकाराचा फटका येणाऱ्या काळात बसण्याची शक्यता असुन ही बाब अनेक कार्यकर्त्यांनी बोलुन हा दाखवली. दत्ता वालेंच्या या कारभारामुळे भाजपाचे निष्ठावान पदाधिकारी, कार्यकर्ते दुर होत असुन युवा नेते प्रविण पाटील चिखलीकरांनी या वृत्तीला वेळीच आवर घालावा अशी मागणी होत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### प्रा. लक्ष्मण डाके तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**हिमायतनगर** -पंचायत समिती कार्यालय व कै.पंजाबराव पाटील जळगावकर प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन दिं.२६ सप्टेंबर रोज शुक्रवारी हिमायतनगर येथील मंगल कार्यालयाच्या सभागृहात प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी आमदार माधवराव पाटील जवळगांवकर यांच्या हस्ते तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने हुतात्मा जयवंतराव पाटील उच्च माध्यमिक व माध्यमिक विद्यालयाचे प्रा. लक्ष्मण डाके यांना गौरविण्यात आले. या तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार कार्यक्रमाचेअध्यक्ष म्हणुन लोकप्रियआमदार माधवराव पाटील जवळगांवकर तसेच पल्लवी टेमकर तहसीलदार, प्रल्हाद जाधव गटविकास अधिकारी पंचायत समिती,गटशिक्षणाधिकारी शिवानंद शिवाचार्य,केशव मेकाले अरुण पाटील सह विविध शैक्षणिक,सामाजिक,राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते.



### अकार्यक्षम प्रभारी कुलसचिव यांना तात्काळ हटवा : डॉ.महेश मगर

**नांदेड**-येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सध्याच्या प्रभारी कुलसचिव पदाचा कारभार मागील नऊ महिन्यापेक्षा जास्त कालावधीपासून प्रभारी व्यक्तीकडे आहे. ते फार्मसी विभागाचे प्राध्यापक असून त्यांना प्रशासनाचा अनुभव शून्य आहे.मागील नऊ महिन्याच्या कार्यकाळात त्यांनी दखलपात्र एकही काम केलेले नसून जास्तीत जास्त कामे हे लाल फितीत अडकवलेले आहेत अशा विविध आरोपांसह प्रभारी कुलसचिव यांना पदावरून तात्काळ हटविण्याची मागणी निवेदनाव्दारे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ.महेश मगर यांनी कुलगुरू यांच्याकडे केली आहे. निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, विद्यापीठ कायदा २०१६ अन्वये परिनियम १४ मुद्दा क्रमांक पाच नुसार कोणत्याही व्यक्तीला प्रभारी पदाचा कारभार हा सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी करिता उपभोगता येत नाही असे नमूद केलेले आहे. परंतु हे कुलसचिव नऊ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी अकार्यक्षमपणे विद्यापीठाचा कारभार हाकलत आहेत. चुकीचे उत्तर देणे दिशाभूल करणाऱ्या अधिकारी वर कारवाई न करणे, गैरकारभार करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पाठीशी घालणे अशा पद्धतीचा कारभार हे कुलसचिव करीत असुन त्यांना तातडीने पद मुक्त करण्यात यावे अशी मागणी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. महेश आनंदराव मगर यांनी केली आहे.



# माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनी घेतले माहूरगडावरील श्री रेणुकादेवीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, दि. २९ सप्टेंबर -**

सध्या एकिकडे हिंदू धर्मातील सर्वात मोठा नारीशक्ती महोत्सव असलेल्या नवरात्रोत्सवाला सुरुवात होणार आहे.तर,दुसरीकडे विधानसभा निवडणूकीची राजकीय दंगल देखील सुरू होणार आहे.अशा या दुग्धशर्करा योगावर सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी कंबर कसली आहे.अनेक नेत्यांचे राज्यभर दौरे सुरु आहेत. याचपार्श्वभूमीवर भाजपाचे नेते तथा माजी मंत्री तर भाजपचे विद्यमान विधानसभा निवडणूक संयोजक रावसाहेब दादाराव दानवे यांनी आज रविवार दि.२९ सप्टेंबर रोजी सकाळी माहूर येथे येऊन गडावरील श्री रेणुकादेवीचे दर्शन घेतले.



म्हणतात ना कोणत्याही राजकीय निवडणूका लागल्या कि, नेत्यांना सर्वात आधी सर्वतारी दुख:हारी देवीदेवता आठवतात.मी निवडून येऊ दे, माझ्या पक्षाला, युती, आघाडीला बहुमत मिळु दे अन् आमचेच सरकार सत्तेत येऊ दे! असे प्रार्थनारुपी साकडे, ईश्वराचा कृपाशीर्वाद प्राप्त करण्यासाठी मग ते आपापले आराध्यदैवत कुलदैवत, कुलदेवता,कुलस्वामिनीचे मंदीरं गाठतात. याच हेतूने माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनी आज माहूरगडावरील श्री रेणुकामातेचे दर्शन घेऊन महाआरती केली.धार्मिक विधी पश्चात दानवे यांचा मंदिर संस्थान विश्वस्तांच्या हस्ते मातेचा प्रसाद देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. एकीकडे महायुतीमधील नेत्यांचे दौरे तर दुसरीकडे महाविकास आघाडीच्या नेत्यांचे दौरे सुरु आहेत.या दौऱ्यांच्या माध्यमातून नेते मंडळी मतदारसंघाचा आढावा घेत आहेत.तसेच विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची चाचपणीही सुरु असून मॅरेथॉन बैठकांचा धडाका पाहायला मिळत आहे. या बैठकांच्या माध्यमातून आगामी निवडणुकीची रणनीती आखली जात आहे.

नवरात्र उत्सवादरम्यान माहूरगडावर मातेच्या दर्शनासाठी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषी मंत्री धनंजय मुंडे, माजी मंत्री पंकजाताई मुंडे, माजी खा.भास्करराव खतगावकर, काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आदी नेतेमंडळी रेणुकादेवीच्या दरबारात दर्शनासाठी आवर्जून हजेरी लावत असतात.तर यावर्षी नवरात्र सुरू होण्याआधी माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनी आज मातेचे दर्शन घेऊन आशिर्वाद प्राप्त केला.

# श्री.भगवान बालाजी मंदिराच्या नवरात्र महोत्सवास ३ ऑक्टोबर पासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. २९ सप्टेंबर -**

नायगाव तालुक्यातील नरसी येथील ख्यातकीर्त श्री.भगवान बालाजी मंदिराच्या २८ व्या नवरात्र महोत्सवास ३ ऑक्टोबर पासून मोठ्या थाटात प्रारंभ होणार आहे.व्यंकट रमणा गोविंदाच्या जयघोषात व हजारो भाविकांच्या उपस्थितीत विजयादशमी पर्यंत चालणाऱ्या या विलोभनीय भक्ती सोहळ्यात विविध धार्मिक उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.



पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या नरसी ता.नायगाव येथील भगवान बालाजी मंदिरात प्रतिवर्षी नवरात्र महोत्सव प्रचंड उत्साहात साजरा केला जातो. हजारो भाविकांच्या सानिध्यात नऊ दिवस अनेक धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते. मंदिरावरील आकर्षण रोषणाई व फुलांची नयन मनोहर सजावट देखील लक्षवेधी असते. यंदा देखील श्रीक्षेत्र काशी येथील वेदशास्त्र संपन्न गणेश्वरशास्त्री द्रविड व गुरुवर्य नागनाथशास्त्री कोडगीरकर यांच्या मार्गदर्शनाखाली येथील सुप्रसिद्ध नवरात्र महोत्सवाला सुरुवात होणार आहे. दि.३ऑक्टोबर पासून ते १२ ऑक्टोबर, विजयादशमी पर्यंत हा उत्सव चालणार आहे. यनिमित्त महाभिषेक, तीर्थप्रसाद गोष्टी, विष्णुयाग, कल्याण उत्सव, वसंतोत्सव, रथोत्सव, सहस्त्र दीप अलंकार, सामूहिक भजन, सिमोलंघन यासह इतर उपक्रम पार पडणार असून दररोज सायंकाळी भगवंताच्या वाहनांची भव्य मिरवणूक निघणार आहे. ४ ऑक्टोबर रोजी मुखेड येथून हजारो भाविकांची पायी दिंडी नरसीत येणार असून यावेळी मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.१२ रोजी विजयादशमी साजरी होणार असून १३ ऑक्टोबरला सकाळी चक्रस्नान होईल.

# शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाला पुर्वीचे वैभव प्राप्त करुन देणार : माजी खा. चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, दि. २९ सप्टेंबर -**

कंधार कंधार तालूका शेतकरी खरेदी विक्री संघाला पुर्वीचे वैभव प्राप्त करून देणार असल्याचे प्रतिपादन नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय माजी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सर्व सभासदाना ग्वाही दिली आहे. ते कंधार तालूका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाच्या वार्षिक सर्वसाधारन सभेचे ऊदघाटन त्यांच्या हास्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलताना म्हणाले.

कंधार तालूका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाची वार्षिक सभा २८ सप्टेबर रोजी खरदे विक्री संघाच्या कार्यालयात घेण्यात आली.

या वार्षिक सभेच्या अध्यस्थानी कंधार तालूका शेतकरी खरेदी विक्री संघाचे सभापती प्राचार्य किशनराव डफडे सर होते तर उद्घाटक म्हणून नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय माजी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर होते. तर प्रमख पाहुने म्हणून बाबुराव केंद्रे उमरगेकर, दत्ता चंदनफूले, भगवान राठोड, संजय देशमुख, आण्णा साहेब कदम,दत्ता घोरबांड , राजू मुकनर नंदनशिवणीकर, कालीदास गंगावरे, अंगत केंद्रे, राजकुमार केकाटे यांच्यासह मोठ्या प्रमाणात खरेदी विक्री संघाचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते. प्रथम कंधार तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाचे सभापती प्राचार्य किशनराव डफडे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन करुन दाखवले आणि खरेदी विक्री संघावर मध्येवर्ती बॅकेचे मोठ्या प्रमाणात कर्ज असल्याचे माजी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या निदर्शनास आनुन दिले. आहे.



आपल्या भाषणात पुढे बोलताना माजी खा. चिखलीकर म्हणाले की कंधार तालुका खरेदी विक्री संघ बंद पाडण्याचा घाट कोणी घातला त्याच्या खोलात मी जाणार नाही. परंतू मराठवाड्यात सगळ्यात चांगला संघ कोणता तर कंधारचा असे खरेदी विक्री संघाचे नाव लौकीक करण्यासाठी सगळ्यानी मिळून आपणाला भूमिका वटवायची आहे.या खरेदी विक्री संघाचे वैभव जे मागच्या काळात होत. शेतकऱ्यासाठी सगळ्या सुविधा मिळवून देणे कै. शंकरराव चव्हाण आणि कै. श्यामरावजी कदम यांच्या पाऊलावर पाऊल ठेवून सगळ्या संस्था पुर्णजिवित करुन चांगल्या चालवून शेतकऱ्याना न्याय देणार असल्याचे शेवटी चिखलीकरांनी सांगीतले. यावेळी सर्व संचालक मंडळ, सर्व सहकारी सोसायटीचे चेअरमन बहूसंख्येनी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आर .के वरपडे यानी केले आहे. या कार्यक्रमास संघाचे व्यवस्थापक बी.आर बनसोडे, त्र्यंबकराव भोसीकर, श्यामसुंदर शिंदे मांजरमकर,साईनाथ कोळगीरे, आकाश मठपती, यांच्यासह मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## श्रीदेवी मस्के यांना एम.एस.सी. पदवी

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि. २९ सप्टेंबर -**

तालुक्यातील मौजे येथील श्रीदेवी प्रदीप शेंडगे यांनी एम.एस.सी. नर्सिंग विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्याने त्यांना नागपूर येथे एका विशेष समारंभात पदवी प्रदान करण्यात आली.

डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालय विष्णुपुरी नांदेड येथे शासकीय सेवेत परिचर्या म्हणून कार्यरत असताना आपला कौटुंबिक भार सांभाळत पुढील शिक्षणासाठी एम एस सी नर्सिंग कोर्स करण्यासाठी शासकीय वैद्यकीय रुग्णालय नागपूर येथील परिचर्या महाविद्यालयात सायकिया ट्रिकचे पदवी आपल्या कुशाग्र बुद्धीच्या जोरावर व मेहनतीच्या बळावर मिळविले २७ सप्टेंबर रोजी नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रुग्णालयाचे अधीक्षक राज गजभिये प्राचार्य प्रकाश मकासरे व अन्य मान्यवरांच्या हस्ते सायकिया ट्रिकची पदवी प्रदान करण्यात आली. त्या ओबीसी नेते नागोराव शेंडगे बापू यांच्या स्नुषा असून या घवघवीत यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# डॉ.आण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्यावतीने आत्महत्याग्रस्त कुटूंबास आर्थिक मदत

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. २९ सप्टेंबर -**

उमरी तालुक्यातील शिवनगाव येथे दि.२६ ऑगस्ट रोजी मातंग समाजातील तरुण कै. गणपत सुर्यवंशी यांनी गरीब परिस्थितीत आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करत असताना स्वतः आत्महत्या करून आपलं जीवन संपवले आहे त्यांच्या कुटुंबात पत्नी दोन मुले एक मुलगी असे कुटुंबातील सदस्य आहेत सुर्यवंशी कुटुंबातील प्रमुख गेल्यानंतर त्या कुटूंबावर दुःखाचा डोगर कोसळला असून त्या दुःखाचा भाग म्हणून आपल्या समाजाचे काही देणे लागते म्हणून डॉ.आण्णाभाऊ साठे क्रांती सेना मुदखेडचे तालुकाध्यक्ष भुजंगराव गायकवाड व त्यांच्या सर्व टीमच्या संकल्पनेतुन मराठवाडा उपाध्यक्ष विलास झिंजोरे, मराठवाडा सचिव किशोर कवडीकर, नांदेड जिल्हा अध्यक्ष सखाराम वाघमारे, जिल्हा कार्याध्यक्ष संजय वाघमारे बोथिकर, जिल्हा उपाध्यक्ष आकाश सोनटक्के, जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर वाघमारे, जिल्हा प्रवक्ते प्रा. पी एन धसाडे, जिल्हा सचिव चंद्रकांत बाबळे, आकाश बाबळे, मुदखेड तालुक्याचे उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड, मुदखेड संपर्क प्रमुख साहेबराव गोरकवाड, युवक तालुकाध्यक्ष ग्यानेश्वर सोनटक्के, दत्ता गायकवाड, त्यांचे सहकार्य सोनटक्के बंधू, यांनी दि.२२ सप्टेंबर रोजी डॉ.आण्णाभाऊ साठे क्रांती सेना नांदेड व मुदखेड टीमच्या सर्व पदाधिकारी यांच्या सहकार्याने फुल नाही फुलाची पाकळी म्हणून आर्थिक मदत करण्यात आली.




## हदगांव नगरपरिषद हदगांव

ता. हदगाव जि. नांदेड

०२५६८ ऑफिस २२८१९५४

Email- id-cohadgaon@gmail.com स्थापना १९५४ दिनांक .:- २७/०९/२०२४

ह.न.प.जा.क्र.:- जा.क्र. /बा. वि./३६२३/२०२४

### ई-निविदा प्रसिद्धीकरण सूचना
### (सर्व साधारण रस्ता अनुदान)

मुख्याधिकारी नगर परिषद हदगाव खालील विकास कामाची निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार अथवा अर्हतापत्र तांत्रीक बी १ नमुण्यात थी। नमुन्यात हिद्वी लिफाफा पद्धतीने स्पर्धात्मक निविदाद्वारे मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रक्कम | बयाणा रक्कम | सुरक्षा ठेव रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | ई निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | नगर परिषद हदगाव अंतर्गत वाटेगाव रोड ते जुने आय टी आय कॉलेज आणि तामसा रोड ते उसमानिगणी मज्जीद आणि तामसा रोड ते चांडाले यांच्या घरापर्यंत सी.सी. रस्ता बांधकाम करणे. | ७०,००,०००/- | ७०,०००/- | करार करतेवेळी १% बिलातुन ८ % | वर्ग ४ व त्यावरील | ५०००/- |

अटी व शर्तीसह सविस्तर ई-निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि ३०.०९.२०२४ से ०७.१०.२०२४ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा वरील संकेतस्थळावर दि. ०७.१०.२०२४ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

मुख्याधिकारी
न.प. हदगाव

मा. प्रशासक
न.प. हदगाव